CMYK

४२ वा वर्धापन दिन

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा

SOLAPUR TARUN BHARAT

सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित

सोलापूर | मंगळवार, ४ ऑगस्ट २०२६ । युगाब्द ५१२८ । वर्ष ४२ वे अंक २४७ । पाने १२+४ । किंमत रु. ८/-

| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |

ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही

dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com



## विचारपुष्प



पुरीच्या जगन्नाथ मंदिरात स्पृश्यास्पृश्यतेची कोणतीही परंपरा नाही. तेथील प्रसाद सर्व लोक श्रद्धेने ग्रहण करतात. सर्व जण ईश्वराचे समान भक्त आहेत. सर्व मानव एकाच ईश्वराचे पुत्र असून सर्व समान आहेत. कोणामध्येही भेदभाव केला जात नाही.

**स्व. पं. दीनदयाल उपाध्याय**
पूर्व अध्यक्ष,
भारतीय जनसंघ

# अनिवार्य वेतन मर्यादेत वाढ

## २५ हजार रुपयांच्या मूळ वेतनापर्यंत मिळणार पेन्शन; ईपीएफओकडून नियमात बदल



**नवी दिल्ली, ३ ऑगस्ट**

अर्थ मंत्रालयाने ईपीएफओ अंतर्गत अनिवार्य वेतन मर्यादा सध्याच्या १५,००० रुपयांवरून २५,००० रुपये प्रति महिना करण्याच्या प्रस्तावाला मंजुरी दिली आहे. सुरुवातीला ही मर्यादा ३०,००० रुपयांपर्यंत वाढवण्याची योजना होती, परंतु तूर्तास २५,००० रुपयांच्या प्रस्तावाला मंजुरी देण्यात आली आहे.

मनी कंट्रोलच्या वृत्तानुसार, हा नवीन बदल अद्याप अधिकृतपणे लागू झालेला नाही; पूर्ण अंमलबजावणीसाठी केंद्रीय मंत्रिमंडळाच्या अंतिम मंजुरीची आवश्यकता आहे. तथापि, ईपीएफओकडून अद्याप कोणतीही अधिकृत माहिती प्रसिद्ध करण्यात आलेली नाही.

अधिकाधिक नोकरदार लोकांना ईपीएफ आणि पेन्शन योजनेच्या सुरक्षित कवचाखाली आणणे हा या निर्णयाचा मुख्य उद्देश आहे. ईपीएफओच्या सध्याच्या नियमांनुसार, आतापर्यंत केवळ १५ हजार रुपयांपर्यंत मूळ वेतन असलेल्या कर्मचाऱ्यांनाच त्यांच्या पीएफ खात्यात योगदान देणे बंधनकारक होते, तर या मर्यादेपेक्षा जास्त मूळ वेतन असलेल्यांसाठी हा नियम ऐच्छिक होता. आता, ही मर्यादा २५,००० रुपयांपर्यंत वाढवल्याने, २५,००० पर्यंत मासिक मूळ वेतन मिळवणाऱ्या लाखो अतिरिक्त कर्मचाऱ्यांसाठी पीएफ कपात अनिवार्य होईल, ज्यामुळे त्यांना भविष्य निर्वाह निधी आणि निवृत्तीवेतन लाभांचा थेट फायदा घेता येईल. (वृत्तसंस्था)

### निर्णयाचा कंपन्यांवर होणारा परिणाम

**वेतन मर्यादेतील वाढीमुळे पीएफ आणि पेन्शन फंडातील योगदानातही वाढ होईल. त्याचा परिणाम कंपन्या आणि सरकार या दोघांवरही होईल. कर्मचारी पेन्शन योजनेअंतर्गत, नियोक्ते मूळ वेतनाच्या ८.३३ टक्के योगदान देतात, तर केंद्र सरकार १.१६ टक्के योगदान देते. सरकारने २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठी ईपीएसकरिता ११,१४४ कोटी रुपयांचे अर्थसाहाय्य मंजूर केले आहे. या मर्यादेतील वाढीमुळे सरकारवरील आर्थिक भार वाढू शकतो.**

### १ एप्रिल २०२७ पासून लागू होणार नवीन नियम?

**अर्थ मंत्रालयाच्या मंजुरीनंतर, हा प्रस्ताव आता केंद्रीय मंत्रिमंडळाच्या अंतिम मंजुरीच्या प्रतीक्षेत आहे. मंत्रिमंडळाची मंजुरी मिळाल्यानंतर, तो तत्काळ लागू केला जाईल. कंपन्यांना त्यांच्या वेतन प्रणाली आणि अनुपालन प्रक्रियांमध्ये बदल करण्यासाठी सरकार संक्रमण कालावधी देईल. अहवालानुसार, नवीन ईपीएफ वेतन मर्यादा १ एप्रिल २०२७ पासून लागू केली जाऊ शकते.**

### या कर्मचाऱ्यांना होणार लाभ

**संघटित खाजगी क्षेत्रातील २० किंवा अधिक कर्मचारी असलेल्या कंपन्यांमध्ये काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी हे लाभदायक आहे. २० पेक्षा कमी कर्मचारी असलेल्या लहान संस्था स्वेच्छेने ईपीएफओमध्ये सामील होऊ शकतात, परंतु त्यांच्यासाठी ते अनिवार्य नाही. केंद्र सरकारी कर्मचारी एका वेगळ्या पेन्शन योजनेअंतर्गत येतात, त्यामुळे हे ईपीएस नियम त्यांना लागू होत नाहीत.**

# सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत साधणार थेट 'जेन-झी'शी संवाद

## मुंबईतील वांद्रे-कुर्ला संकुलात विशेष सत्राचे आयोजन



**मुंबई, ३ ऑगस्ट**

देशातील नवी पिढी आज लोकशाही, नेतृत्व आणि राष्ट्रउभारणीच्या मंथनात सक्रिय सहभाग नोंदवत आहे. याच पृष्ठभूमीवर, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत गुरुवार, ६ ऑगस्ट रोजी मुंबईत 'जेन-झी'सोबत थेट संवाद साधणार आहेत. वांद्रे-कुर्ला संकुल येथील नीता मुकेश अंबानी सांस्कृतिक केंद्रात शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी या विशेष सत्राचे आयोजन करण्यात आले आहे.

'भारताची आंतरराष्ट्रीय संयुक्त राष्ट्र चळवळ' (आयआयएमयूएन) या संस्थेच्या १५ व्या वर्धापन दिनाचे औचित्य साधून या भव्य वार्षिक अजिंक्यपद परिषदेच्या उद्घाटन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. या तीन दिवसीय परिषदेमध्ये देशभरातील १०० हून अधिक शहरांमधील १५ ते १९ वयोगटाचे सुमारे २ हजारपेक्षा जास्त उच्च माध्यमिक व महाविद्यालयीन विद्यार्थी सहभागी होणार आहेत. ही परिषद जगातील सर्वांत मोठ्या युवा-नेतृत्वाखालील संमेलनांपैकी एक मानली जाते.

२०११ मध्ये ऋषभ शाह यांनी स्थापन केलेली ही संस्था 'भारत' या संकल्पनेचा जागतिक पातळीवर प्रसार करणारे प्रमुख व्यासपीठ आहे. गेल्या १५ वर्षांपासून १५ ते २४ वयोगटातील तरुणच ही संस्था पूर्णपणे चालवत आहेत. या व्यासपीठावरून घडलेले अनेक तरुण पुढे जाऊन लोकप्रतिनिधी, सनदी अधिकारी, पोलिस अधिकारी, वकील, लेखक आणि उद्योगपती बनले आहेत. या संस्थेच्या सल्लागार मंडळात उद्योग, न्यायव्यवस्था आणि क्रीडा क्षेत्रातील दिग्गजांचा समावेश आहे. यामध्ये उद्योगपती अजय पिरामल, दीपक पारेख, नादिर गोदरेज, खासदार डॉ. शशी थरूर, माजी सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड, चित्रपट दिग्दर्शक करण जोहर, माजी लष्करप्रमुख, ऑलिम्पिकपटू खा. पी. टी. उषा यांसारख्या नामांकित व्यक्तिमत्त्वांचा समावेश आहे. (तभा वृत्तसेवा)

## महत्त्वाचे

### सलग चौथ्या दिवशी बाजारात तेजी

**मुंबई :** मीडिया क्षेत्रातील शेअर्स वगळता इतर सर्वच क्षेत्रांमध्ये झालेल्या चौफेर खरेदीमुळे सोमवारी भारतीय शेअर बाजारात सलग चौथ्या सत्रात तेजीचे वातावरण पाहायला मिळाले. या तेजीच्या जोरावर निफ्टीने २४,७०० चा टप्पा पार करत बंद नोंदवला. ऑगस्ट महिन्याची आणि नवीन आठवड्याची सुरुवात बाजाराने अत्यंत मजबूत स्थितीत केली. संपूर्ण सत्रादरम्यान बाजारातील ही तेजी कायम राहिली आणि ६ मार्च २०२६ नंतर निफ्टीने पहिल्यांदाच २४,७०० चा टप्पा पार केला. भू-राजकीय तणाव कमी झाल्याने कच्च्या तेलाच्या किमतीत झालेली मोठी घसरण आणि परदेशी संस्थागत गुंतवणूकदारांची सुरू असलेली सततची खरेदी यामुळे बाजारातील गुंतवणूकदारांचा उत्साह वाढला. दिवसअखेर सेन्सेक्स ५४४.३९ अंकांच्या वाढीसह ७८,६३९.०३ वर बंद झाला. तर निफ्टी ३९०.७० अंकांची मोठी झेप घेत २४,७७४.३० च्या पातळीवर पोहोचला.

### पाकिस्तानात पुरामुळे जनजीवन विस्कळीत

**इस्लामाबाद :** पाकिस्तानमधील मुसळधार पावसामुळे सरकारी यंत्रणा, आपत्ती व्यवस्थापन आणि नागरी पायाभूत सुविधा पूर्णपणे निष्क्रिय ठरल्या आहे. गेल्या चार दिवसांपासून सतत सुरू असलेल्या पावसामुळे राजधानी इस्लामाबाद, रावळपिंडी, पेशावर आणि अटॉकसह अनेक भागांतील जनजीवन पूर्णपणे विस्कळीत झाले. अनेक शहरांमधील रस्ते पाण्याखाली गेले आहेत.

# गुजरातमध्ये भाजपाचे वर्चस्व; बिहार, मध्यप्रदेशात धक्का

## बांकीपूरमध्ये जन सुराजचे प्रशांत किशोर विजयी



**नवी दिल्ली, ३ ऑगस्ट**

तीन राज्यांत झालेल्या विधानसभा पोटनिवडणुकांच्या सोमवारी घोषित झालेल्या निकालात गुजरातच्या वडोदरा जिल्ह्यातील मांजलपूर विधानसभेची जागा भाजपाचे उमेदवार सतीश पटेल यांनी ३०,६३० मतांच्या फरकाने जिंकली. त्यांनी काँग्रेसचे उमेदवार भिकाभाई राबरी यांचा पराभव केला. दुसरीकडे बिहारच्या बांकीपूर पोटनिवडणुकीत जन सुराज पक्षाचे प्रशांत किशोर यांनी भाजपाचे नीरज कुमार यांचा १८,९५३ मतांनी पराभव केला, तर मध्यप्रदेशातील दतिया विधानसभा मतदारसंघात काँग्रेसचे उमेदवार घनश्याम सिंह यांनी भाजपाच्या आशुतोष तिवारी यांच्यावर सहा हजार १६ मतांनी विजय मिळवला.

गुजरात पोटनिवडणुकीत काँग्रेसला मोठ्या पराभवाला सामोरे जावे लागले. भाजपाचे उमेदवार सतीश पटेल यांनी आपले प्रतिस्पर्धी भिकाभाई राबरी यांचा ३०,६३० मतांच्या मोठ्या फरकाने पराभव करून ही जागा पक्षासाठी कायम राखली आहे. या जागेवर विरोधी पक्षाला मोठा पराभव पत्करावा लागला.

भाजपाचे ज्येष्ठ आमदार योगेश पटेल यांच्या निधनानंतर ३० जुलै रोजी या जागेसाठी मतदान झाले. विजयाच्या घोषणेनंतर भाजपा कार्यकर्त्यांनी जल्लोष केला. दुसरीकडे गेल्या अनेक वर्षांपासून भाजपाची सत्ता असलेल्या मध्य प्रदेशमध्ये काँग्रेसने सत्ताधारी भाजपाला धक्का दिला. दतिया विधानसभा मतदारसंघातील पोटनिवडणुकीत काँग्रेसचे उमेदवार घनश्याम सिंह यांनी भाजपाच्या आशुतोष तिवारी यांच्यावर सहा हजार १६ मतांनी विजय मिळवला. सोमवारी झालेल्या मतमोजणीमध्ये पहिल्या फेरीत तिवारी यांनी आघाडी घेतली. मात्र नंतर मतमोजणीच्या पुढच्या प्रत्येक फेरीत काँग्रेसचे उमेदवाराने आघाडी घेतली. १५ फेऱ्यांनंतर घनश्याम सिंह यांनी एकूण ६६ हजार ७५७ मते मिळवत ६ हजार १६ मतांनी विजय मिळवला, तर भाजपाच्या आशुतोष तिवारी यांना ६० हजार ७४१ मते मिळाली.

**बालेकिल्ल्यातच भाजपाला धक्का**

देशातील राजकीय वर्तुळाचे लक्ष लागून असलेल्या बांकीपुर विधानसभा मतदारसंघातील पोटनिवडणुकीत जन सुराज्य पक्षाचे प्रमुख प्रशांत किशोर यांनी विजय मिळवला आहे. (वृत्तसंस्था)

# माफी पुरेशी नाही; स्पष्टीकरण द्या

## पंतप्रधानांची चित्रफीत हटवल्याचे प्रकरण, मेटाला संसदीय समितीचा निर्देश

**नवी दिल्ली, ३ ऑगस्ट**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची फेसबुकवरील चित्रफीत हटविल्याप्रकरणी मेटाला माहिती तंत्रज्ञानविषयक संसदीय स्थायी समितीने स्पष्टीकरण सादर करण्याचा निर्देश दिला. कंपनीने ही एक तांत्रिक चूक असल्याचे सांगून माफी मागितली, परंतु अनेक खासदारांनी ही माफी पुरेशी नसल्याचे सांगत कारवाईची मागणी केली होती. त्यानंतर सोमवारी संसदीय स्थायी समितीने मेटाला यासंदर्भात स्पष्टीकरण देण्यास सांगितले.

भाजपा खासदार निशिकांत दुबे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या माहिती तंत्रज्ञानविषयक संसदीय स्थायी समितीच्या बैठकीदरम्यान पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची फेसबुकवरील चित्रफीत हटविण्याचा मुद्दा चर्चेत आला. समितीने मेटाच्या अधिकाऱ्यांकडून उत्तरे मागितली आणि चित्रफीत हटविण्याच्या कारणाबद्दल विचारणा केली. पंतप्रधानांची चित्रफीत चुकून हटविण्यात आल्याचे मेटाने मान्य केले आणि माफी मागितली. तथापि, अनेक समिती सदस्यांनी सांगितले की केवळ माफी मागून हे प्रकरण संपणार नाही, जबाबदारी निश्चित करणे देखील आवश्यक आहे. त्यानंतर मेटाला यासंदर्भात स्पष्टीकरण सादर करण्याचा निर्देश दिला. सोशल मीडिया आणि डिजिटल प्लॅटफॉर्मचे नियमन हा बैठकीचा मुख्य विषय होता. (वृत्तसंस्था)

### अधिकाऱ्यावर काय कारवाई केली?

**बैठकीदरम्यान, समितीच्या सदस्यांनी हे प्रकरण केवळ माफी मागण्यापुरते मर्यादित ठेवता येणार नाही. चित्रफीत हटवण्यासाठी जबाबदार असलेल्या अधिकाऱ्यावर काय कारवाई करण्यात आली, अशी विचारणा केली. काही सदस्यांनी तर संबंधित अधिकाऱ्यावर कायदेशीर कारवाई करण्याची मागणीही केली. मेटाने आपल्या प्लॅटफॉर्मवरील वादग्रस्त आणि आक्षेपार्ह मजकुराविरोधात आतापर्यंत कोणती पावले उचलली आहेत आणि अशा प्रकरणांमध्ये तिची जबाबदारी काय, असेही विचारणा केली.**

# फार्मर आयडी नसल्याने जिल्ह्यातील ३,८५६ शेतकरी कर्जमाफीपासून वंचित?

## कर्जमुक्तीचा लाभ घ्यायचा असेल तर ई-केवायसी तातडीने पूर्ण करा : जिल्हा उपनिबंधक मुकुंद पवार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ ऑगस्ट -**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेअंतर्गत सोलापूर जिल्ह्यातील पात्र शेतकऱ्यांच्या ई-केवायसी प्रक्रियेला गती मिळत असली, तरी अजूनही हजारो शेतकरी आवश्यक प्रक्रिया पूर्ण करण्यापासून वंचित आहेत. त्यामुळे कर्जमुक्तीचा लाभ मिळविण्यासाठी उर्वरित शेतकऱ्यांनी ई-केवायसी व फार्मर आयडीची प्रक्रिया तातडीने पूर्ण करण्याचे आवाहन प्रशासनाने केले आहे. जिल्ह्यात ३ हजार ८५६ शेतकऱ्यांकडे अद्याप फार्मर आयडी उपलब्ध नाही. यामध्ये जिल्हा बँकेचे ८४० आणि राष्ट्रीयीकृत बँकांचे ३ हजार १६ शेतकरी आहेत. फार्मर आयडी नसल्यास कर्जमुक्ती प्रक्रियेत अडथळे निर्माण होऊ शकतात.



सोमवार (३ ऑगस्ट) सायंकाळी ४.३० वाजेपर्यंतच्या आकडेवारीनुसार, शासनाने पात्र ठरविलेल्या २६ हजार २५३ शेतकऱ्यांपैकी १६ हजार ७८३ (६३.९३ टक्के) शेतकऱ्यांनी ई-केवायसी पूर्ण केली आहे. मात्र, ९ हजार ४८० शेतकऱ्यांची ई-केवायसी अद्याप प्रलंबित असल्याने त्यांना कर्जमुक्तीच्या लाभासाठी आवश्यक प्रक्रिया पूर्ण करावी लागणार आहे. जिल्ह्यातील विविध बँकांनी एकूण ५९ हजार ८५१ कर्जखाती शासनाकडे अपलोड केली होती. त्यापैकी २६ हजार २५३ शेतकरी कर्जमुक्तीसाठी पात्र ठरले आहेत. यामध्ये जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे ४ हजार ७६१ तर राष्ट्रीयीकृत बँकांचे २१ हजार ४९२ शेतकरी आहेत.



सर्व पात्र शेतकऱ्यांनी विलंब न करता ई-केवायसी आणि फार्मर आयडीची प्रक्रिया पूर्ण करून शासनाच्या कर्जमुक्ती योजनेचा लाभ निश्चित करून घ्यावा, असे आवाहन जिल्हा उपनिबंधक मुकुंद पवार यांनी केले आहे

ई-केवायसी पूर्ण केलेल्या शेतकऱ्यांमध्ये जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या ३ हजार ६७१ (७७.११ टक्के) तर राष्ट्रीयीकृत बँकांच्या १३ हजार ११२ (६२.०१ टक्के) शेतकऱ्यांचा समावेश आहे. दुसरीकडे, जिल्हा बँकेचे १ हजार ९० आणि राष्ट्रीयीकृत बँकांचे ८ हजार ३९० शेतकरी अजूनही ई-केवायसी प्रक्रियेपासून दूर आहेत. याशिवाय, जिल्ह्यात ३ हजार ८५६ शेतकऱ्यांकडे अद्याप फार्मर आयडी उपलब्ध नाही. यामध्ये जिल्हा बँकेचे ८४० आणि राष्ट्रीयीकृत बँकांचे ३ हजार १६ शेतकरी आहेत. फार्मर आयडी नसल्यास कर्जमुक्ती प्रक्रियेत अडथळे निर्माण होऊ शकतात.

### मोटरकारची रिक्षाला धडक; प्रवासी महिला जागीच ठार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि. ३ ऑगस्ट-**




ऑटो रिक्षाला मोटार कारणे पाठीमागून जोरदार धडक दिल्याने झालेल्या अपघातात एक प्रवासी महिला जागीच ठार झाल्याची घटना तेलगाव (ता.उत्तर सोलापूर) येथील डोणगाव रोडवर आज सोमवारी सायंकाळी साडेचारच्या सुमारास घडली. निशा रामहरी पाटील (वय ३८ रा.तेलगाव सिना (ता.उत्तर सोलापूर) असे मयत महिलेचे नाव आहे.अपघातात जखमी महिलेस जगन्नाथ पाटील (दीर) यानी येथील शासकीय रुग्णालयात दाखल केले असता डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. मयत निशा पाटील यांच्या पश्चात पती, एक मुलगा आणि एक मुलगी असा परिवार आहे.

# 'ड्रोन'चा थवा ठेवणार शत्रूंवर पाळत

## डीआरडीओ तयार करणार स्वदेशी ड्रोन

**नवी दिल्ली, ३ ऑगस्ट**

अत्याधुनिक तंत्रज्ञानाने अधिकाधिक सुसज्ज होत असलेले सुरक्षा दल हे भविष्यातील युद्धासाठी तयारी करीत आहेत. डीआरडीओने स्वदेशी स्वार्म ड्रोन प्रकल्प सुरू केला आहे. हे ड्रोन पुढील २४ महिन्यांत तयार केले जातील. एकदा तयार झाल्यावर, ५० स्वार्म ड्रोनचा थवा शत्रूंवर पाळत ठेवेल.

भविष्यातील युद्धे आणि सीमा पाळतीच्या आव्हानांना तोंड देण्यासाठी, डीआरडीओ आता ५० ड्रोनचा स्वदेशी ताफा विकसित करत आहे. या तंत्रज्ञानांतर्गत एका मास्टर ड्रोनच्या आदेशानुसार १२ ड्रोन एकाच वेळी उडतील. यामुळे कठीण परिस्थितीतही अचूक पाळत ठेवणे शक्य होईल. डीआरडीओने माहितीसाठी विनंती जारी केली आहे. यानुसार या स्वार्म प्रणालीमध्ये एकूण ५० ड्रोन असतील; ज्यात ७ बाय ७ ग्रिड रचनेत ४९ ड्रोन असतील, जे एका मास्टर ड्रोनद्वारे नियंत्रित आणि निर्देशित केले जातील. मास्टर ड्रोन थेट ग्राऊंड स्टेशनवरून आदेश प्राप्त करेल आणि इतर ड्रोन्समधील कार्यांमध्ये समन्वय साधेल. या प्रकल्पात ड्रोन उड्डाणाच्या अचूकतेवर विशेष भर दिला आहे.



प्रत्येक ड्रोन दोन किलोग्रॅमपर्यंतचा भार वाहून नेण्यास सक्षम असेल. प्रत्येक ड्रोनला केवळ पाच सेंटीमीटरच्या अचूकतेने उड्डाण करावे लागेल. ही प्रणाली ताशी ७२ किलोमीटर वेगाच्या वाऱ्यातही उड्डाण टिकवून ठेवण्यास आणि पाच हजार मीटर उंचीपर्यंत कार्य करण्यास सक्षम असेल. हे ड्रोन्स ग्राऊंड स्टेशनपासून १५ ते २५ किलोमीटरच्या परिसरात उड्डाण करून मिशन पूर्ण करून परत येऊ शकतात. प्रत्येक ड्रोन ५०० ग्रॅम ते दोन किलोग्रॅमपर्यंतचा भार वाहून नेण्यास सक्षम असेल. उड्डाणाचा कालावधी किमान ३० मिनिटे असेल. त्यांच्यामध्ये १५ मिनिटांत जलद रिचार्ज होण्याची क्षमता असेल. शत्रूच्या इलेक्ट्रॉनिक हल्ल्यांपासून संरक्षण करण्यासाठी ड्रोन्समध्ये जॅमर-प्रतिरोधक दळणवळण प्रणाली स्थापित केली जाईल. (वृत्तसंस्था)

### ७० टक्के स्वदेशी सामग्रीचा वापर

**डीआरडीओने किमान ७० टक्के स्वदेशी सामग्रीचा वापर अनिवार्य केला आहे. याव्यतिरिक्त प्रतिस्पर्धी देशांकडून खरेदी केलेल्या व्यावसायिक घटकांच्या वापरास पूर्णपणे बंदी असेल. लष्करी ड्रोनमध्ये चिनी घटकांच्या वापरामुळे डेटा गळती आणि सायबर हेरगिरीचा मोठा धोका निर्माण होतो. केवळ भारतीय एमएसएमई, स्टार्टअप्स आणि खाजगी कंपन्यांनाच ही संधी देण्यात आली आहे. या प्रकल्पाचा कालावधी २४ महिन्यांचा असून त्यात डिझाइन, प्रोटोटाइपिंग आणि अंतिम चाचणी यांचा समावेश असेल.**

# पेपरफुटीचा निषेध करणाऱ्यांवर कारवाई नाही: तुषार मेहता

## आंदोलनात सहभागी गुन्हेगारांची सुटका नाही

**नवी दिल्ली, ३ ऑगस्ट**

राजधानी दिल्लीतील जंतरमंतरवर पेपरपुटीचा निषेध करणाऱ्या विद्यार्थ्यांवर एफआयआर दाखल केला जाणार नाही अथवा त्यांच्याविरोधात कोणतीही कारवाई केली जाणार नाही. केंद्र सरकार दिलेल्या आश्वासनावर ठाम आहे, मात्र आंदोलनात सहभागी गुन्हेगारी पृष्ठभूमीच्या व्यक्तीवर करण्यात आलेली कारवाई सुरूच राहील, अशी माहिती महान्यायाअभिकर्ता तुषार मेहता यांनी सर्वोच्च न्यायालयाला दिली.

आंदोलकांवर झालेल्या लाठीमार आणि पोलिसांकडून करण्यात आलेल्या पॅलेट गनच्या वापरावर आक्षेप घेत दाखल करण्यात आलेल्या याचिकेवर सोमवारी सरन्यायाधीश सूर्य कांत आणि न्या. जॉयमाल्या बागची यांच्या न्यायासनाने सुनावणी घेतली. ज्यांच्यावर आधीपासून कोणतेही गंभीर गुन्हे दाखल नाहीत अशा आंदोलकांवरील एफआयआर बंद करण्यास किंवा खटले मागे घेण्यास दिल्लीसह देशातील सर्व राज्य सरकारांना स्वातंत्र्य आहे. मात्र, आंदोलनाच्या नावाखाली हिंसाचार करणाऱ्या आणि गंभीर गुन्हे दाखल असलेल्यांना या निर्णयाचा फायदा मिळणार नाही याची काळजी घ्यावी असे न्यायासनाने स्पष्ट केले. याचिकाकर्त्याच्या वकिलाने आंदोलकांवरील कारवाईसंदर्भात विचारणा केली असता, यावर मेहता यांनी सांगितले की, पेपरफुटीचा निषेध करणाऱ्या विद्यार्थ्यांवर कारवाई केली जाणार नाही, सरकारने यासंदर्भात आश्वासन दिले असून, त्यावर ठाम आहे. पेलेट गनने जखमी झालेल्यांच्या आरोपांची चौकशी करण्यासाठी माजी न्यायाधीशांच्या अध्यक्षतेखाली एसआयटी स्थापन करण्याचा विचार करत आहे आणि यावर पुढील सुनावणीत निर्णय घेणार असल्याचे न्यायासनाने स्पष्ट केले. (वृत्तसंस्था)

## महत्त्वाचे

### रोहित पवार रुग्णालयात दाखल

**मुंबई :** राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे युवा नेते आणि आमदार रोहित पवार यांची प्रकृती बिघडली असून त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. प्रकृती अस्वास्थ्यामुळे ते स्वतःहून मुंबईतील प्रसिद्ध ब्रीच कँडी रुग्णालयात दाखल झाले. सततचे दौरे, बैठका आणि कामाच्या प्रचंड ताणामुळे त्यांना थकवा आणि ताप आल्याचे सांगण्यात येत असून तज्ज्ञ डॉक्टरांचा सल्ला घेण्यासाठी ते रुग्णालयात पोहोचले आहेत. मागील काही काळापासून रोहित पवार हे राज्यभर विविध प्रश्नांवर सातत्याने दौरे करीत आहेत. या धावपळीमुळे दोन दिवसांपासून त्यांना ताप आणि इतर शारीरिक त्रास जाणवत होता. असे असले तरी, सोमवारी रुग्णालयात जाण्यापूर्वी त्यांनी पक्षाच्या काही महत्त्वाच्या बैठका पार पाडल्या आणि पदाधिकाऱ्यांशी चर्चाही केली.

### अभिनेते हृषीकेश कानडे यांचे निधन

**मुंबई :** मराठी रंगभूमीवरील हरहुन्नरी आणि अतुलनीय अभिनेते हृषीकेश कानडे यांचे सोमवारी पहाटेच्या सुमारास वयाच्या ३८ व्या वर्षी अल्पशा आजाराने निधन झाले. ते एक प्रगल्भ अभिनेते होते तसेच देशप्रेमी होते. 'मी भारतीय' हे देशभक्ती आणि राष्ट्रीय भावनांवर आधारित नाटक आहे. याचे जवळपास ३०० प्रयोग करताना त्यांच्या देशप्रेमाचे प्रत्यंतर यायचे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या चरित्रावर व्याख्यान देताना ते महाराजमय होऊन जायचे. हृषीकेश कानडे जीव ओतून भूमिका साकारत होते. त्यांच्या प्रत्येक भूमिकांना प्रेक्षकांकडून प्रेम आणि दाद मिळायची. प्रेक्षकांच्या हृदयात त्यांनी घर तयार केले होते. ■

# यापुढे घुसखोरांना युरोपात प्रवेश नाही

## स्पेनमधील घटनेनंतर २२ देशांची सुरक्षेसाठी योजना



### सीमा सुरक्षा करण्यासाठी उपाययोजना

- **पहिले पाऊल :** युरोपियन देशांची बाह्य सीमा मजबूत करणार
- **दुसरे :** सामायिक सीमा सुरक्षा दलाची (फ्रंटेक्स) तैनाती वाढवणे
- **तिसरे :** मोरोक्कोसारख्या ट्रांझिट देशांतील स्थलांतरितांची माहिती घेणार
- **चौथे :** मानवी तस्करी करणाऱ्या टोळ्यांवर सामायिक गुप्तचर माहिती, संयुक्त तपास आणि पोलिस कारवाई करणे
- **पाचवे :** आश्रयाचा दावा फेटाळला गेल्यास तत्काळ हकालपट्टी करणे
- **सहावे :** अंतर्गत सीमांवर तपासणी वाढवली जाणार ■

**माद्रिद/लंडन, ३ ऑगस्ट**

स्पेनमधील सेउता येथे निर्माण झालेल्या घुसखोरीच्या संकटामुळे युरोपातील राजकारण तापले आहे. युरोपियन युनियनमधील (ईयू) २७ पैकी २२ देशांनी सीमा सुरक्षा योजनेत आमूलाग्र बदल करण्याची घोषणा केली आहे. याअंतर्गत यापुढे घुसखोरांना युरोपात प्रवेश दिला जाणार नाही. यासाठी सीमेवरील तपासणी अधिक कडक करण्यात आली.

इटली, ब्रिटन, जर्मनी यांसारख्या २२ युरोपियन देशांच्या गृहमंत्र्यांच्या उपस्थितीत घुसखोरी रोखण्यावर व्यापक चर्चा करण्यात आली. या योजनेची सहा स्तरांवर अंमलबजावणी केली जाणार आहे. दुसरीकडे स्पेनसह पाच देशांनी या योजनेवर तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. मात्र २२ देशांनी घुसखोरी रोखण्यासाठी व्यापक योजना तयार करण्यावर सहमती दर्शवली आहे. २००९ ते २०२५ दरम्यान (१७ वर्षे) चार सागरी मार्गावर ३५.२५ लाख बेकायदेशीर प्रवाशांनी घुसखोरी केली. पूर्व भूमध्यसागरीय मार्ग ग्रीस आणि सायप्रसच्या दिशेने, १७.८१ लाख स्थलांतरित युरोपात आले, तर लिबिया-ट्युनिशियातून इटली आणि माल्टा पोहोचणाऱ्या मध्य भूमध्यसागरीय मार्गावरून १३.०३ लाख स्थलांतरितांनी प्रवेश केल्याचे जर्मनीच्या गृहमंत्र्यांनी बैठकीत सांगितले. युरोपियन युनियनच्या अहवालानुसार २०२५ मध्ये ७.१९ लाख नागरिक बेकायदेशीरपणे आढळले. यात अल्जारियाचे ७१,०१५ नागरिक असून सर्वाधिक आहेत. (वृत्तसंस्था)



विद्यापीठ अनुदान आयोग नियमन-२०२६ पूर्णपणे मागे घेण्यात यावा, या मागणीसाठी सोमवारी जयपूर येथे राष्ट्रीय राजपूत करणी सेनेच्या वतीने मोर्चा काढण्यात आला

# महाराष्ट्रात मुसळधार पावसाची शक्यता

### हवामान विभागाचा यलो अलर्ट

**मुंबई, ३ ऑगस्ट**

महाराष्ट्रामध्ये मान्सूनने पुन्हा एकदा रौद्ररूप धारण केले असून, राज्यात जोरदार मुसळधार पाऊस सुरू होण्याचे संकेत मिळाले आहेत. मुंबई प्रादेशिक हवामान केंद्राने वर्तवलेल्या ताज्या अंदाजानुसार, पुढील तीन दिवस राज्यातील विविध जिल्ह्यांमध्ये विजांच्या कडकडाटासह आणि ढगांच्या गडगडाटासह मुसळधार पाऊस कोसळण्याची दाट शक्यता आहे. हवामान विभागाच्या या इशाऱ्यानंतर संपूर्ण राज्य प्रशासन सतर्क झाले असून सखोल व सखल भागातील नागरिकांना तसेच प्रवाशांना विशेष काळजी घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार, कोकण आणि गोवा पट्ट्यात तुरळक ठिकाणी मुसळधार पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. तसेच मध्य महाराष्ट्रातील घाट माथ्यावर काही ठिकाणी अतिमुसळधार पाऊस पडू शकतो. या पृष्ठभूमीवर रायगड, रत्नागिरी, पुणे घाट परिसर, कोल्हापूर घाट परिसर आणि सातारा घाट परिसरात सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. (तभा वृत्तसेवा)

# बलात्काराची तक्रार करणाऱ्या पीडितेसोबत अमानवीय वर्तन

## बिहारमध्ये पंचायतीने महिलेला दिली थुंकी चाटण्याची शिक्षा

**पाटणा, ३ ऑगस्ट**

बलात्काराची तक्रार दाखल केल्याच्या रागातून बिहारमध्ये पीडितेला पंचायतीसमोर जमिनीवरील थुंकी चाटण्यास लावले. बिहारमधील बेगुसराय येथे ही घटना घडली. या घटनेचा व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर व्हायरल होत असून, नागरिकांकडून तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.

व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाल्यानंतरच हा प्रकार उघडकीस आला आहे. महिलेने पोलिस ठाण्यात बलात्काराची तक्रार दाखल केली आहे. २ जूनच्या रात्री शेजाऱ्याने घरात प्रवेश केला आणि धमकी देऊन बलात्कार केला, असे १ ऑगस्ट रोजी दाखल झालेल्या एफआयआरमध्ये म्हटले आहे. महिलेच्या तक्रारीनंतर पोलिसांनी या प्रकरणाचा तपास सुरु केला आहे. आरोपीने खिडकीतून पळून जाण्याचा प्रयत्न केला असता ग्रामस्थांनी त्याला पकडले. मात्र, पोलिसांना माहिती देण्याऐवजी ग्रामस्थांनी पंचायत बोलावली आणि दोघांनाही सार्वजनिकरीत्या अपमानित केले, असा आरोप महिलेने केला आहे. व्हायरल झालेल्या व्हिडीओच्या सुरुवातीला ती महिला पंचातीच्या मध्यभागी कान धरून उभी असल्याचे दिसते. त्यानंतर तिला जमिनीवरील थुंकी चाटण्यास लावले. बलात्काराचा आरोप असलेला पुरुष देखील कान धरून माफी मागताना आणि उपस्थितांसमोर थुंकी चाटताना दिसत आहे. याप्रकरणी तक्रार दाखल करण्यात आली आहे. दरम्यान, सदर महिला आणि आरोपी यांच्यात प्रेमसंबंध होते आणि त्यांना आक्षेपार्ह स्थितीत पकडण्यात आल्याचा दावा गावकऱ्यांनी केला. (वृत्तसंस्था)

# पादचाऱ्यांचे रस्ते अतिक्रमणमुक्त करा

### सर्वोच्च न्यायालयाचे केंद्र, राज्य सरकारांना आदेश

**नवी दिल्ली, ३ ऑगस्ट**

प्रत्येक रस्त्यावर पादचाऱ्यांसाठी योग्यरित्या चिन्हांकित केलेली आणि अतिक्रमणापासून मुक्त जागा उपलब्ध असेल, याची खात्री करावी, असा निर्देश सर्वोच्च न्यायालयाने सोमवारी केंद्र आणि राज्य सरकारांना दिला. पादचाऱ्यांसाठी असलेले रस्ते अतिक्रमण मुक्त असले पाहिजे आणि यासाठी काय उपाययोजला केल्या जात आहे, याची माहिती सादर करण्यास न्यायालयाने सांगितले.

न्या. पी. एस. नरसिंहा आणि न्या. आलोक आराधे यांच्या न्यायासनाने केंद्र सरकारतर्फे बाजू मांडणारे अतिरिक्त महान्यायाअभिकर्ता के. एम. नटराज यांना संबंधित अधिकाऱ्यांना सूचना देण्यास सांगितले. पादचाऱ्यांसाठी राखीव असलेल्या जागेवर कोणतेही अतिक्रमण होणार नाही आणि ती जागा वाहनांच्या मार्गिकेपासून योग्यरित्या वेगळी ठेवली जाईल, याची खात्री करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. जिथे रस्ता आहे, तिथे पादचाऱ्यांसाठी जागा असायलाच हवी, असे न्यायालयाने म्हटले आहे. (वृत्तसंस्था)

# राज्यातील पाच प्रादेशिक मानसिक रुग्णालयांचा कायापालट होणार

## औषधे व उपकरणांसाठी ३० लाखांहून अधिक निधी मंजूर

**मुंबई, ३ ऑगस्ट**

महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक आरोग्य विभागाने राज्यातील प्रमुख प्रादेशिक मानसिक रुग्णालयांच्या सक्षमीकरणासाठी एक महत्त्वाचा पाऊल उचलले आहे. पुणे, ठाणे, नागपूर, रत्नागिरी आणि बीड जिल्ह्यातील अंबाजोगाई येथील मानसिक व नशामुक्त संशोधन केंद्र या पाच संस्थांमध्ये स्थानिक स्तरावर आवश्यक सोयीसुविधा आणि साहित्यांच्या खरेदीसाठी एकूण ३० लाख ८१ हजार ९०० रुपयांच्या खर्चास प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

या निधीचा वापर संबंधित रुग्णालयांमध्ये रुग्णांच्या उपचारासाठी आवश्यक असणारी औषधे, वस्त्र, कपडे, शस्त्रक्रियागृहासाठीचे साहित्य, किरकोळ यंत्रसामग्री आणि त्यांच्या सुट्या भागांच्या खरेदीसाठी केला जाणार आहे. राज्यातील मानसिक आरोग्य सेवा अधिक सक्षम आणि रुग्णस्नेही करण्याच्या दृष्टीने हा निर्णय घेण्यात आला आहे.



खरेदी प्रक्रिया पार पाडताना पारदर्शकता आणि गुणवत्तेची काळजी घेण्यासाठी शासनाने काही कडक अटी लागू केल्या आहेत. या अंतर्गत, औषधे आणि साहित्याची खरेदी राज्य औषध भांडार आणि अत्यावश्यक औषध सूचीनुसारच करणे अनिवार्य राहील. खरेदी करण्यात येणारी यंत्रसामग्री अद्ययावत आणि दर्जेदार असल्याची खात्री करण्याची जबाबदारी तांत्रिक विभागावर सोपवण्यात आली आहे. तांत्रिक तपशील तयार करताना तो विशिष्ट कंपनीला फायदा पोहोचवणारा नसावा, अशा स्पष्ट सूचना देण्यात आल्या आहेत. (तभा वृत्तसेवा)

### संजय राऊत मानसिक रुग्ण : बन

**मुंबई :** संजय राऊत आणि त्यांचे मालक उद्धव ठाकरे यांची मानसिक अवस्था बिघडली असून त्यांना तातडीने मानसोपचाराची गरज आहे. अभिजीत दीपकेमध्ये विष्णूचा अवतार दिसणे आणि पंतप्रधान नरेंद्र मोदींवर टीका करणे यावरूनच यांच्या मेंदूच्या गोळ्या संपल्याचे स्पष्ट होते. महाराष्ट्रात यांच्यावर इलाज होणे शक्य नसल्याने आता आम्हीच वर्गणी काढून या दोघांना सिंगापूरच्या रुग्णालयात उपचारासाठी पाठवणार आहोत, असा हल्लाबोल भाजपचे प्रदेश मुख्य प्रवक्ते नवनाथ बन यांनी शनिवारी केला.

भाजप प्रदेश कार्यालयात आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. संजय राऊत यांच्यावर बोचऱ्या शब्दांत ताशेरे ओढताना नवनाथ बन म्हणाले की, संजय राऊत हे उबाठा गटाची जमीन भुसभुशीत करणारे दुतोंडी 'गांडूळ' आहेत. ज्यांना आजपर्यंत भांडुपमध्ये स्वतःचा एक नगरसेवक निवडून आणता आला नाही, त्यांनी चार वेळा विधानसभेत निवडून आलेल्या जयकुमार गोरे यांच्यावर टीका करू नये. स्वार्थासाठी स्वतःची खासदारकी आणि हिंदुत्वाचा लिलाव केला, अशी टीका त्यांनी केली. ■

# उपजिल्हाधिकारी सामान्य प्रशासन पद रद्द

**नागपूर, ३ ऑगस्ट**

राज्य शासनाच्या महसूल व वन विभागाने जिल्हास्तरावरील प्रशासकीय पदनामांमधील वर्षांनुवर्षांचा गोंधळ कायमचा दूर करण्यासाठी एक अत्यंत महत्त्वाचा आणि ऐतिहासिक निर्णय घेतला आहे. यानुसार, राज्यभरातील उपजिल्हाधिकारी (सामान्य प्रशासन) हे पद पूर्णपणे रद्द करण्यात आले असून, आता सर्व जिल्ह्यांमध्ये केवळ 'उपजिल्हाधिकारी (महसूल)' हे एकमेव पद अस्तित्वात राहणार आहे. या निर्णयामुळे प्रशासकीय कामकाज अधिक सुटसुटीत आणि लोकाभिमुख होणार आहे.

आतापर्यंत वेगवेगळ्या पदनामांमुळे नागरिकांना आपले काम नेमक्या कोणत्या अधिकाऱ्याकडे आहे, हे शोधताना मोठा मनस्ताप सहन करावा लागत होता. आता राज्यभरात एकच पदनाम राहिल्याने आणि कामांची स्पष्ट विभागणी झाल्यामुळे अर्जांचा निपटारा वेगाने होईल. परिणामी नागरिकांची दिशाभूल थांबून त्यांचा मौल्यवान वेळ वाचेल आणि समस्यांवर जलद न्याय मिळण्यास मदत होईल.

### कामकाजाची आणि जबाबदाऱ्यांची स्पष्ट विभागणी

-निवासी उपजिल्हाधिकारी : यांच्याकडे आता शस्त्र परवाने, सिनेगृह व्हिडिओ गृह परवाने, नैसर्गिक आपत्ती व्यवस्थापन व मदत वाटप, टंचाई, पीक विमा व 'पी.जी. पोर्टल'वरील ऑनलाईन तक्रार निवारण, सेतू केंद्र, सामाजिक अर्थसहाय्य योजना तसेच कायदा व सुव्यवस्थेशी संबंधित नागरी कामांची मुख्य जबाबदारी असेल.

उपजिल्हाधिकारी (महसूल) : यांच्याकडे प्रामुख्याने जमिनीशी संबंधित महत्त्वाची कामे सोपवण्यात आली आहेत. यामध्ये भोगवटदार वर्ग-२ जमिनी वर्ग-१ करणे, जमिनींच्या विक्री परवानग्या, सरकारी व सीटीएस जमिनींचे व्यवस्थापन, आदिवासी जमिनी, भूदान, कुळ, नझुल, सीलिंग व इनाम जमिनींचे प्रश्न, पेसा कायदा, वनहक्क, महाराजस्व अभियान आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका हाताळण्याची जबाबदारी असेल. (तभा वृत्तसेवा)

# युक्रेनवर ९० मिनिटांत आठ ग्लाईड बॉम्बचा वर्षाव

## रशियाच्या हल्ल्याने झापोरिझिया शहर हादरले, पाच ठार, ३१ जखमी

**कीव्ह, ३ ऑगस्ट**

रशियाने युक्रेनच्या झापोरिझिया शहरावर ९० मिनिटांत आठ ग्लाईड बॉम्बचा वर्षाव केला. यात पाच नागरिकांचा मृत्यू, तर ३१ जण जखमी झाले. या हल्ल्यात अनेक निवासी इमारती उद्ध्वस्त झाल्या असून, पायाभूत सुविधांचे देखील मोठे नुकसान झाले. रशियाच्या हल्ल्यानंतर राष्ट्राध्यक्ष वोलोदिमिर झेलेन्स्की यांनी मित्र राष्ट्रांना पॅट्रियट हवाई संरक्षण प्रणालीचा तातडीने पुरवठा करण्याचे आवाहन केले आहे.

रशियाच्या वायुदलाने सोमवारी दक्षिण युक्रेनमधील झापोरिझिया शहराच्या निवासी भागांवर ९० मिनिटांच्या कालावधीत आठ शक्तिशाली ग्लाईड बॉम्ब टाकले. अचानक झालेल्या हवाई हल्ल्याने शहरात घबराट पसरली. हजारो नागरिकांना सुरक्षित स्थळी हलवण्यात आले असून, सुरक्षा दलाने बचावकार्य सुरू केले. आतापर्यंत पाच नागरिकांचे मृतदेह ढिगाऱ्यातून बाहेर काढण्यात आले, तर ३१ जखमींना रुग्णालयात हलवण्यात आल्याची माहिती युक्रेनच्या संरक्षण विभागाने दिली. रशिया युक्रेनची शहरे आणि गावे उद्ध्वस्त करण्यासाठी ग्लाईड बॉम्बचा वापर करत आहे. या बॉम्बचा प्रतिकार करण्यासाठी युक्रेनकडे सध्या कोणतीही साधने नसल्याने मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे. (वृत्तसंस्था)



रशियाच्या हल्ल्यानंतर बचावकार्य करताना युक्रेनचे सुरक्षा दल

# रागीट लोकांसोबत राहणे जीवघेणे

**। वेगाने येऊ शकते वृद्धत्व । आरोग्य तज्ज्ञांचा इशारा । आरोग्यावर होऊ शकतात गंभीर परिणाम**



### अवयवांवर होतात दीर्घकालीन नकारात्मक परिणाम

राग आल्यानंतर ॲड्रेनालाईन आणि कॉर्टिसोलसारखे तणाव संप्रेरक (स्ट्रेस हार्मोन्स) वेगाने वाढतात, ज्यामुळे हृदयाचे ठोके, रक्तदाब आणि श्वासोच्छ्वास वाढतो. जर ही परिस्थिती वारंवार उद्भवली, तर त्याचे शरीरातील अनेक अवयवांवर दीर्घकालीन नकारात्मक परिणाम होऊ शकतात. अमेरिकन हार्ट असोसिएशनच्या तज्ज्ञांच्या मते, दीर्घकाळ टिकणाऱ्या रागामुळे हृदयविकार, मानसिक आरोग्याच्या समस्या, रोगप्रतिकारशक्तीच्या समस्या, झोपेतील व्यत्यय आणि पचनसंस्थेच्या समस्यांचा धोका वाढू शकतो. ■

**वॉशिंग्टन, ३ ऑगस्ट**

आयुष्यात जिच्यासोबतचा प्रत्येक संवाद तणावपूर्ण होतो आणि जिचा राग तुमच्या मनात सतत रेंगाळत राहतो, अशी एखादी व्यक्ती असेल, तर ही केवळ एक भावनिक समस्या नाही. अशा नात्यांमुळे अकाली वृद्धत्व येऊ शकते.

निरोगी आणि सुदृढ शरीर राखण्यासाठी मानसिक शांती आवश्यक आहे हे अनेक अभ्यासांमधून सिद्ध झाले आहे. अतिरिक्त ताण किंवा रागामुळे आरोग्यावर अनेक नकारात्मक परिणाम होऊ शकतात. जे लोक वारंवार रागावतात त्यांना हृदयरोग, रक्तदाबाच्या समस्या, चिंता आणि नैराश्य यांचा धोका जास्त असू शकतो, असा इशारा आरोग्य तज्ज्ञांनी दिला आहे. एका अलिकडील अभ्यासात, केवळ तुमचा रागच तुमच्या आरोग्यासाठी धोकादायक नाही, तर रागीट लोकांशी जास्त संपर्क ठेवल्यानेही आरोग्यावर नकारात्मक परिणाम होऊ शकतात. इतकेच नाही, तर या स्थितीमुळे तुमचे आयुष्यमानही कमी होऊ शकते, असा इशारा संशोधकांनी दिला आहे. आपण अनेकदा रागीट व्यक्तीच स्वतःच्या आरोग्याला सर्वाधिक हानी पोहोचवते, असे गृहीत धरतो. पण आता, विज्ञानाने या कथेची दुसरी बाजू उघड केली आहे. हानी केवळ रागावणाऱ्या व्यक्तीलाच होत नाही, तर जे दररोज तो राग सहन करतात त्यांनाही मोठी किंमत मोजावी लागते, असे संशोधकांचे म्हणणे आहे.

आरोग्य तज्ज्ञांच्या मते, राग ही एक सामान्य मानवी भावना आहे, परंतु जेव्हा तो वारंवार, प्रमाणाबाहेर किंवा दीर्घकाळ टिकतो, तेव्हा त्याचा परिणाम केवळ नातेसंबंधांवरच नाही, तर शारीरिक आणि मानसिक आरोग्यावरही होऊ शकतो. रागाच्या भरात शरीराची लढा किंवा पलायनाची प्रतिक्रिया सक्रिय होते, असे अभ्यासातून दिसून आले. (वृत्तसंस्था)

# चीनच्या सीमेजवळ धावणार रेल्वे

**। संघर्ष झालेल्या ठिकाणी १७ किलोमीटर लांबीचा मार्ग । संपर्क व्यवस्था वाढवणाऱ्या जलढाका प्रकल्पाला मंजुरी**

**नवी दिल्ली, ३ ऑगस्ट**

भारत आपल्या सीमांचे संरक्षण करण्यासाठी आणि संपर्क व्यवस्था सुधारण्यासाठी एका मोठ्या प्रकल्पावर काम करत आहे. उत्तर बंगालमधील चालसाजवळील खुनिया मोअरपासून भारत-चीन-भूतान त्रिकोणीय सीमेपर्यंत संपर्क व्यवस्था वाढवणारा जलढाका रेल्वे प्रकल्पाच्या उभारणीला लवकरच सुरुवात होणार आहे. ज्या ठिकाणी भारतीय आणि चिनी सैनिकांमध्ये संघर्ष झाला होता, तिथे भारत रेल्वेमार्ग उभारला जात आहे आणि १७ किलोमीटर लांबीच्या रेल्वेमार्गामुळे संपर्क व्यवस्थेला मोठी चालना मिळेल.

हा प्रकल्प उत्तर बंगालमधील एक नवीन १७ किलोमीटर लांबीचा सामरिक रेल्वेमार्ग असून, यासाठी २७२ कोटी रुपयांचा खर्च केला जाणार आहे. या प्रकल्पाचा उद्देश दुआर्स प्रदेशातील पर्यटनाला चालना देणे आणि देशाची सुरक्षा मजबूत करणे हा आहे. सिलिगुडीचे खासदार राजू बिस्ता यांनी एक्सवरील पोस्टमध्ये प्रकल्पाची माहिती देताना सांगितले की, रेल्वे मंत्रालयाने जलढाकासाठी नवीन १७ किलोमीटर लांबीच्या रेल्वे मार्गाला अंदाजे २७२ कोटी रुपयांची मंजुरी दिली आहे. हा मार्ग चालसाजवळील खुनिया मोअर येथून सुरू होईल आणि जलपाईगुडी व कालिम्पोंग वन विभागांमधून जाईल.जलढाका नदीच्या काठाने बांधला जाणारा हा रेल्वे मार्ग अत्यंत महत्त्वाचा आहे, कारण ही नदी भारत, भूतान आणि चीन यांच्यातील डोकलाम त्रिकोणी सीमेजवळील एका सरोवरातून उगम पावते.



### पायाभूत सुविधा अधिक मजबूत

या रेल्वे प्रकल्पाची घोषणा या प्रदेशात भारताने आपल्या पायाभूत सुविधा अधिक मजबूत केल्याचे दर्शवते.

भारतीय रेल्वेने चालसा (जलपाईगुडी) पासून सीमावर्ती भागाकडे २०० किलोमीटर लांबीचा एक सामरिक रेल्वे मार्ग बांधण्याचा प्रस्ताव दिला आहे. रेल्वे अधिकाऱ्यांच्या मते, प्रस्तावित मार्गामुळे दुर्गम सीमावर्ती भागांची कनेक्टिव्हिटी सुधारणे, पर्यटनाला चालना देणे आणि या प्रदेशातील सामरिक पायाभूत सुविधा मजबूत होईल. या प्रकल्पासाठी सर्वेक्षण पावसाळ्यानंतर सुरू होईल. (वृत्तसंस्था)

### असे आहे प्रकल्पाचे महत्त्व

हा परिसर डोकलाम संघर्षासाठी ओळखला जातो. तेथे २०१७ मध्ये, भारत, भूतान आणि चीनच्या त्रिकोणीय सीमेजवळील एका पठारावर भारत आणि चीन यांच्यात ७३ दिवसांचा लष्करी सीमा विवाद झाला होता. भूतानच्या दाव्याच्या प्रदेशात चीनला रस्ता बांधण्यापासून रोखण्यासाठी भारतीय सैन्याला हस्तक्षेप करावा लागला होता. उपग्रह प्रतिमा आणि अहवालांवरून असे दिसून येते की, चीन बऱ्याच काळापासून या भागात पायाभूत सुविधा मजबूत करत आहे. सिवोक-रंगपो रेल्वे प्रकल्प ना-थू ला पासपर्यंत वाढवण्याच्या योजनेमुळे, हा सामरिकदृष्ट्या महत्त्वाचा आणि संवेदनशील सीमावर्ती भाग चीनला जोडणारा दुसरा रेल्वे प्रकल्प ठरेल. ■

# पाकिस्तानी-बांगलादेशी घुसखोरांना देशाबाहेर काढा

## नेपाळमध्ये हजारो लोक रस्त्यावर उतरले

## हिंदू राष्ट्र घोषित करण्याची मागणी

**काठमांडू, ३ ऑगस्ट**

बांगलादेशी, पाकिस्तानी घुसखोरांना हाकलून लावण्याच्या मागणीसाठी सोमवारी नेपाळमध्ये हजारो लोक रस्त्यावर उतरले. त्यांनी नेपाळला हिंदू राष्ट्र म्हणून घोषित करण्याची मागणीही केली आहे. विविध संघटनांच्या नेतृत्वात राजधानी काठमांडूमध्ये आंदोलन सुरू करण्यात आले आहे.

आंदोलनात सामान्य लोकांचा मोठा सहभाग असून, बांगलादेशी-पाकिस्तानी घसखोर देशाच्या सुरक्षेसाठी मोठा धोका असून, त्यांना तातडीने देशातून हद्दपार करावे आणि नेपाळला हिंदू राष्ट्र घोषित करावे अशी मागणी आंदोलकांनी केली आहे. आंदोलकांकडून खासदारांना घेराव घातला जात आहे आणि हिंदू समाजाच्या सुरक्षिततेच्या आणि हक्कांच्या बाजूने उघडपणे बोलण्याची मागणी केली जात आहे. सिराहा जिल्ह्यात, नॅशनल इंडिपेंडंट पार्टीचे खासदार बबलू गुप्ता यांना जनतेच्या प्रचंड विरोधाचा सामना करावा लागला. आंदोलकांनी सांगितले की, बदलाच्या आणि नेपाळला पुन्हा हिंदू राष्ट्र बनवण्याच्या आशेने त्यांनी खासदारांना निवडून दिले. परंतु सत्तेवर आल्यावर दिलेली आश्वासने पाळली जात नाही, त्यामुळे आम्हाला रस्त्यावर उतरावे लागले. २६ जुलैच्या रात्री नेपाळमध्ये उसळलेला हिंसाचार आता शमला असला तरी, अनेक जिल्ह्यांमधील तणावपूर्ण परिस्थिती आता नियंत्रणात आहे. तथापि, या घटनेनंतर हिंदू संघटनांनी सरकारला १५-कलमी निवेदन सादर केले असून, नेपाळला पुन्हा हिंदू राष्ट्र म्हणून घोषित करण्यासाठी संसदेत ठराव मांडणे आणि पाकिस्तानी-बांगलादेशी घुसखोरांना देशाबाहेर काढण्यासाठी व्यापक अभियान राबविण्याची मागणी केली.



विविध मागण्यांसाठी रस्त्यावर उतरलेले नेपाळी नागरिक

**हिंसाचाराची निष्पक्ष चौकशी करा**

आंदोलकांनी सरकारला दिलेल्या निवेदनात सुनसरी जिल्ह्यातील देवानगंज येथील हिंसाचाराची निष्पक्ष चौकशी, गुन्हेगार आणि सूत्रधारांना तत्काळ अटक आणि चौकशी समितीचा अहवाल सार्वजनिक करण्याची मागणी करण्यात आली आहे. गोळीबाराचे आदेश देणाऱ्या अधिकाऱ्यांची ओळख पटवून त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्याची मागणीही या निवेदनात करण्यात आली आहे. प्रशासकीय निष्काळजीपणा आणि सुरक्षेतील त्रुटींसाठी जबाबदार असलेल्यांवर कठोर कारवाईची मागणीही करण्यात आली आहे.

> **हिंदू राष्ट्राची पुनर्स्थापना राजेशाहीच्या मुद्द्याशी जोडलेली आहे. त्यामुळे, सध्याच्या परिस्थितीत असा निर्णय विचारात घेणे अनुचित ठरेल. सरकार संघराज्यीय प्रणालीसाठी वचनबद्ध आहे आणि त्याचे दृढपणे पालन करेल. हिंदू राष्ट्राची घोषणा केल्याने संघराज्यीय प्रणाली कमकुवत होईल.**
> **- बालेन शाह, पंतप्रधान**

**‘त्या’ नागरिकांची चौकशी व्हावी**

हिंसाचारात प्राण गमावलेल्यांना हुतात्माचा दर्जा देण्याची, त्यांच्या कुटुंबीयांना पुरेशी भरपाई देण्याची आणि जखमींवर मोफत व प्रभावी उपचार करण्याची मागणीही निवेदनात करण्यात आली आहे. याव्यतिरिक्त, बौद्ध आणि किरात परंपरांचा आदर राखून नेपाळची ‘वैदिक सनातन हिंदू राष्ट्र’ म्हणून पुनर्स्थापना करण्यासाठी संसदेत एक ठराव मांडण्याची मागणी करण्यात आली आहे. संघटनांनी रोहिंग्या, बांगलादेशी आणि पाकिस्तानी घुसखोरांना ओळखून त्यांची हकालपट्टी करण्याची, १९९० नंतर जारी केलेल्या नेपाळी नागरिकत्वांची चौकशी करण्याची मागणीही केली आहे. ◂ (वृत्तसंस्था)

# व्याप्त काश्मिरात अभिव्यक्ती स्वातंत्र्याची गळचेपी

## सत्य दडपण्यासाठी हिंसाचाराच्या वृत्तांकनावर बंदी



**मुझफ्फराबाद, ३ ऑगस्ट**

पाकिस्तानी सरकार आणि लष्कराच्याविरोधात गेल्या ५२ दिवसांपासून व्याप्त काश्मिरात सुरू असलेल्या नागरिकांच्या आंदोलनाला दडपण्यासाठी बेछूट गोळीबारासह विविध प्रकारच्या बळाचा वापर करण्यात आला. यानंतरही नागरिक मागे हटण्यास तयार नाही. हिंसाचारामुळे जागतिक पातळीवर पाकिस्तानचा निषेध सुरू असताना पाकिस्तानी सरकारने व्याप्त काश्मिरात अघोषित आणिबाणी जाहीर केली.

हिंसाचार आणि आंदोलनासंबंधित वृत्तांकन करण्यावर पत्रकारांना बंदी घालण्यात आली आहे. याशिवाय आंतरराष्ट्रीय वृत्तसंस्थेच्या संकेतस्थळांना निष्क्रिय करण्याची प्रक्रिया देखील सुरू केली. पाकिस्तानी सरकारच्या निर्णयामुळे व्याप्त काश्मिरात अभिव्यक्ती आणि पत्रकार स्वातंत्र्य धोक्यात आले.

सुरक्षा दलाशी झालेल्या संघर्षात गेल्या चार दिवसांत ५० हून अधिक लोकांचा मृत्यू झाला असून शेकडो जखमी आहेत.

पाकिस्तानातील समाज माध्यमावरून सरकारच्या कृतीवर तीव्र संताप व्यक्त केला जात असताना आता तेथील वृत्तांकनावर बंदी घालण्यात आली. व्याप्त काश्मीरमधील वृत्त प्रसारित करणाऱ्या आंतरराष्ट्रीय वृत्तसंस्थांचे संकेतस्थळ निष्क्रिय करण्यात आले आहे. अल जझीराने यासंदर्भातील पुष्टी केली असून, त्यांनी सरकारच्या निर्णयाचा निषेध केला. त्यांनी पत्रकार स्वातंत्र्य, इंटरनेटवरील निर्बंध आणि स्वतंत्र माहिती मिळवण्याच्या जनतेच्या हक्कावर चिंता व्यक्त केली.

**संपूर्ण प्रकरण काय आहे ?**

देशाशी संबंधित संवेदनशील मुद्द्यांवरील आंतरराष्ट्रीय माध्यमांच्या वृत्तांकनावर पाकिस्तानी अधिकाऱ्यांनी टीका केल्यानंतर हा वाद निर्माण झाला आहे. अधिकाऱ्यांनी यापूर्वी आंतरराष्ट्रीय वृत्तसंस्थांवर पक्षपाती वृत्तांकनाचा आरोप केला आहे. त्याचवेळी, माध्यमांनी एक स्वतंत्र माध्यम संस्था म्हणून आपली भूमिका कायम ठेवली आहे. समाज माध्यम वापरकर्त्यांनी दावा केला आहे की, व्याप्त काश्मीरमधील घडामोडींवरील वृत्तांकनामुळे पाकिस्तानच्या लष्करी आस्थापनेतील काही गटांच्या असंतोषामुळे आंतरराष्ट्रीय वृत्त संकेतस्थळावर बंदी घालण्यात आली आहे. ■

**बळाच्या वापराच्या निषेध**

अमेरिकेतील ह्युमन राइट्स फाउंडेशनने (एचआरएफ) व्याप्त काश्मीरमधील आंदोलकांवर बळाचा वापर झाल्याच्या वृत्तांचा निषेध केला आहे आणि पाकिस्तानी प्रशासनाला ही दडपशाही थांबवण्याचे, दळणवळण सेवा पूर्ववत करण्याचे आणि कोणत्याही बेकायदेशीर बळ वापरासाठी जबाबदारी निश्चित करण्याचे आवाहन केले आहे.

**निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्यात मुस्लिम लीगची बाजी**

पाकिस्तानचे माजी पंतप्रधान नवाझ शरीफ यांचा पक्ष पाकिस्तान मुस्लिम लीग-नवाझने (पीएमएल-एन) व्याप्त काश्मीरमधील विधानसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्यात आपली आघाडी कायम ठेवली आहे. ◂ (वृत्तसंस्था)

# तस्करांच्या बेकायदा बांधकामांवर हातोडा

**जयपूर, ३ ऑगस्ट**

राजस्थानच्या झालावाड जिल्ह्यातील अधिकाऱ्यांनी सोमवारी सरकारी जमिनीवरील अतिक्रमणे हटवली आणि मादकपदार्थ तस्करीच्या आरोपाखालील व्यक्तींशी संबंधित कथित बेकायदेशीर बांधकामे जमीनदोस्त केली. प्रशासन आणि पोलिसांनी संयुक्तपणे केलेल्या या कारवाईत, घाटोली पोलिस ठाण्याच्या हद्दीतील सुमारे ३० बिघा जमीन मोकळी करण्यात आली.

या जमिनीवर अनेक वर्षांपासून बेकायदेशीर ताबा होता. ही कारवाई जिल्ह्यातील मादकपदार्थांच्या बेकायदेशीर व्यापाराविरुद्धच्या विशेष मोहिमेचा एक भाग होती, असे पोलिस अधीक्षक अमित कुमार यांनी सांगितले. मादकपदार्थांची तस्करी आणि सरकारी जमिनीवरील बेकायदेशीर ताबा यांतून मिळवलेल्या मालमत्तांची ओळख पटवून त्यावर कारवाई केली जात आहे. पोलिसांच्या माहितीनुसार, रामगोपाल ऊर्फ गोपाल आणि घनसीलाल या मादकपदार्थ तस्करांनी या जमिनीवर कथितरीत्या ताबा मिळवला होता. ◂ (वृत्तसंस्था)

## आंग सान सू की यांची रेड क्रॉसच्या प्रतिनिधींसोबत भेट

**बँकॉक :** नजरकैदेत असलेल्या म्यानमारच्या माजी नेत्या आंग सान सू की यांची सोमवारी ‘इंटरनॅशनल कमिटी ऑफ द रेड क्रॉस’ च्या प्रतिनिधीसोबत भेट झाली, असे म्यानमारच्या लष्कर-समर्थित सरकारने जाहीर केले. २०२१ मध्ये लष्कराने सत्ता हाती घेतल्यापासून सार्वजनिक नजरेपासून दूर ठेवण्यात आलेल्या या नोबेल विजेत्या नेत्याचा बाह्य जगाशी झालेला हा एक दुर्मिळ संपर्क होता.

या घोषणेसोबत प्रसिद्ध करण्यात आलेल्या दोन छायाचित्रांमध्ये सू की या म्यानमारमधील ‘इंटरनॅशनल कमिटी ऑफ द रेड क्रॉस’चे प्रतिनिधी अर्नाँड डी बेक यांच्याशी हस्तांदोलन करताना आणि लाकडी पॅनेलिंग असलेल्या खोलीत त्यांची भेट घेताना दिसत आहेत. ■

## चित्रपट वार्ता

### आर डी बर्मनच्या बायोपिकमध्ये झळकणार अक्षय

**मुंबई :** अक्षय कुमार पाचव्यांदा नीरज पांडेसोबत काम करत आहे. ही जोडी आगामी चित्रपट आर.डी. बर्मन यांच्यावरील एक बायोपिकमध्ये एकत्र काम करणार आहे.



आगामी चित्रपटात फरहान अख्तर बर्मन यांची भूमिका साकारणार आहे. या चित्रपटात अक्षय कुमारदेखील एका विशेष भूमिकेत दिसणार आहे. अक्षयची भूमिका छोटी असली तरी, तो या बायोपिकचा एक महत्त्वाचा भाग असणार आहे. नीरज पांडे या बायोपिकचे दिग्दर्शन करत असून, ‘एक्सेल एंटरटेनमेंट’ या चित्रपटाची सह-निर्मिती करते आहे. हा संगीतप्रधान चित्रपट सध्या प्री-प्रॉडक्शनमध्ये असून, टीम तरुण बर्मन यांची अजरामर गाणी पुन्हा तयार करण्यासाठी संगीतावर काम करत आहे. या बायोपिकचे चित्रीकरण सप्टेंबरमध्ये सुरू होण्याची शक्यता आहे. ■

### ‘झिम्मा ३’ चित्रपटाचे पोस्टर प्रदर्शित




**मुंबई :** मराठीतील लोकप्रिय ठरलेल्या ‘झिम्मा’ आणि ‘झिम्मा २’ या चित्रपटांनंतर आता ‘झिम्मा ३’ची अधिकृत घोषणा झाली आहे. याचे पोस्टर प्रदर्शित करण्यात आले असून, चित्रीकरणालाही अधिकृतपणे सुरुवात झाली आहे. निर्मात्यांनी शेअर केलेल्या पोस्टरमध्ये समुद्रकिनाऱ्याची पृष्ठभूमी दिसते आहे. पोस्टरमध्ये काही जण एका वर्तुळात उभे असल्याचे दिसत असले, तरी कोणाचाही चेहरा दाखवण्यात आलेला नाही. मात्र प्रत्येकाच्या हातात वेगवेगळे पेय दिसत आहे. ‘झिम्मा’ चित्रपटातील जुन्या कलाकारांनीही हे पोस्टर समाज माध्यमावर शेअर केले आहे. पोस्टरवरील यावेळी तिसराच आहे, ही हटके टॅगलाईन विशेष लक्ष वेधून घेते आहे. ‘झिम्मा ३’ १ जानेवारी २०२७ रोजी चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित होणार आहे. ■

### ‘जन नायगन’चे १७५.६० कोटींचे कलेक्शन




**मुंबई :** ‘जन नायगन’ने भारतात ११ दिवसांत एकूण १७५.६० कोटींचे नेट कलेक्शन केले आहे. हा चित्रपट लवकरच २०० कोटींचा टप्पा पार करण्याच्या मार्गावर आहे. हा चित्रपट हिंदी, तामिळ आणि तेलुगु अशा तीन भाषांमध्ये प्रदर्शित झाला आहे. हिंदीमध्ये या चित्रपटाने १५.२५ कोटींचे कलेक्शन केले. तामिळ भाषेत या चित्रपटाने १५१.४५ कोटींचे कलेक्शन केले. तर, तेलुगु भाषेत ८.९० कोटींचे कलेक्शन केले आहे. ‘जन नायगन’ चित्रपटाने ११ व्या दिवशी म्हणजेच रविवारी १०.७० कोटी रुपयांचे बॉक्स ऑफिस कलेक्शन केले आहे. हा एक पॉलिटिकल ड्रामा असलेला चित्रपट आहे. ‘ओपनिंग डे’पासून हा चित्रपट बॉक्स ऑफिसवर जबरदस्त कामगिरी करत आहे. ■

# कारगिलमधील गावांना पुराचा फटका

**कारगिल, ३ ऑगस्ट**

मुसळधार पाऊस आणि ढगफुटीमुळे कारगिल भागातील काही गावांमध्ये अचानक पूर आला. यामुळे पायाभूत सुविधांचे नुकसान झाले आणि रस्ते संपर्क तुटला. या पृष्ठभूमीवर लष्कर, पोलिस व नागरी प्रशासनाकडून बचाव व मदतकार्य हाती घेण्यात आले आहे, अशी माहिती अधिकाऱ्यांनी सोमवारी दिली.

रविवारी सायंकाळी कारगिल जिल्ह्यातील हरदास व तुमाईल गावांमध्ये मुसळधार पावसामुळे अचानक पूर आला. यामुळे वस्त्यांमध्ये पाणी शिरले आणि रस्ते व इतर सार्वजनिक पायाभूत सुविधांचे नुकसान झाले, असे अधिकाऱ्यांनी सांगितले. नुकसानीचा आढावा घेण्यासाठी आणि मदतकार्य सुरू करण्यासाठी स्थानिक प्रशासन व आपत्कालीन पथके बाधित भागांत तातडीने दाखल झाली. हरदास येथील गुंड भागात ढगफुटी झाल्यामुळे रस्ते संपर्क तुटले. नागरिक अडकून पडले. ‘फॉरेव्हर इन ऑपरेशन्स’ विभागाच्या जवानांनी तातडीने बचाव व मदतकार्य सुरू केले, असे लष्कराने सांगितले.



मदत कार्य करताना लष्कराचे जवान

प्रतिकूल हवामानातही जवानांनी बाधित गावकऱ्यांना सुरक्षित स्थळी हलविले, प्रथमोपचार दिले आणि पिण्याचे पाणी, जीवनावश्यक वस्तू व जेवण यांचे वाटप केले, असे लष्कराच्या अधिकाऱ्यांनी सांगितले. बाधित गावांमध्ये मदतकार्य सुलभ करण्यासाठी लष्कराने नागरी प्रशासनाच्या समन्वयाने ढिगारा हटवणे तसेच रस्ते, पाणीपुरवठा आणि वीजपुरवठा पूर्ववत करण्यास मदत केली.

मिनामार्ग येथील मीना-२ जवळ ढगफुटीचा फटका बकरवाल समाजाच्या चार तात्पुरत्या निवाऱ्यांमधील सुमारे २० लोकांना बसला. मिनामार्ग पोलिस चौकीच्या कर्मचाऱ्यांनी बाधित कुटुंबांना सुरक्षितपणे जवळच्या सुरक्षित स्थळी हलविले. पुराच्या पाण्यात एक कार वाहून गेली, परंतु त्यातील सर्व प्रवासी सुखरूप बचावले, असे पोलिसांनी सांगितले. दरडी कोसळणे आणि ढिगारा साचल्यामुळे द्रास-श्रीनगर राष्ट्रीय महामार्गावरील वाहतूक तात्पुरती बंद करण्यात आली असून, रस्ता पूर्ववत करण्याचे काम सुरू आहे, असे अधिकाऱ्यांनी सांगितले. ◂ (वृत्तसंस्था)

# उत्तराखंडमध्ये दरडी कोसळल्यामुळे ८० रस्ते बंद

देहराडून, ३ ऑगस्ट

उत्तराखंडच्या विविध भागांत सुरू असलेल्या पावसामुळे डेहराडूनमध्ये एकाचा नदीच्या प्रवाहाबरोबर वाहून गेला. अद्याप त्याचा शोध लागलेला नाही. दुसरीकडे भूस्खलनामुळे राज्यातील सुमारे ८० रस्त्यांवरील वाहतूक ठप्प झाली आहे. हवामान केंद्र, डेहराडूनने डेहराडून आणि बागेश्वर जिल्ह्यांसाठी ‘ऑरेंज अलर्ट’ जारी केला असून, सोमवारी मुसळधार ते अति मुसळधार पावसाचा इशारा दिला आहे.

राज्य आपत्कालीन नियंत्रण कक्षाच्या माहितीनुसार, रविवारी रात्री डेहराडूनमधील मालदेवता पुलाजवळ पावसाने दुथडी भरून वाहणाऱ्या सोंग नदीच्या प्रवाहात एक व्यक्ती वाहून गेली. बेपत्ता व्यक्तीची ओळख साहिल गुसाईं अशी पटली असून, त्याचा शोध घेण्यासाठी बचावकार्य सुरू आहे. पावसामुळे झालेल्या भूस्खलनामुळे राज्यातील एकूण ८१ रस्ते बंद झाले असून, या मार्गांवर वाहतूक पूर्ववत करण्याचे प्रयत्न सुरू आहेत. उत्तरकाशी जिल्ह्यातील बडिया, जंगलचट्टी आणि बनास परिसराजवळ



भूस्खलनामुळे पडलेल्या ढिगाऱ्यामुळे ऋषिकेश-यमुनोत्री राष्ट्रीय महामार्ग बंद झाला आहे, तर पापडगडजवळ रस्ता खचल्याने ऋषिकेश-गंगोत्री राष्ट्रीय महामार्गावरील वाहतूक विस्कळीत झाली आहे. पिथौरागढ जिल्ह्यातील कुलागड येथे ढिगारा साचल्यामुळे धारचुला-तावाघाट राष्ट्रीय महामार्गावरील वाहतूकही विस्कळीत झाली आहे. चमोली जिल्ह्यात, किमाना गावाच्या मागील टेकडीवर झालेल्या भूस्खलनाचा ढिगारा सुरुवातीला शेतात पसरल्यानंतर आता गावातही पसरत आहे. ◂ (वृत्तसंस्था)

# वनस्पतींनाही होते पोट भरल्याची जाणीव

## संशोधकांनी शोधले ‘एचएचओ-५’ प्रथिन ● खतांची गरज होणार कमी

**न्यू यॉर्क, ३ ऑगस्ट**

माणसाचे पाट भरले आहे याचे संकेत मेंदू मानवाला देतो, मात्र वनस्पतींमध्ये मेंदू आणि पोट नसूनही त्यांना तसे संकेत प्राप्त होतात. वनस्पतींना मेंदू किंवा पोट नसते, तरीही त्यांना पुरेसे अन्न मिळाले आहे हे समजते, असे शास्त्रज्ञांनी शोधून काढले आहे. न्यू यॉर्क विद्यापीठाच्या संशोधकांनी ‘एचएचओ५’ हे प्रथिन शोधून काढले आहे, जे वनस्पतींना मातीतून नायट्रोजन शोषून घेणे कधी थांबवायचे, हे सांगते. या शोधामुळे कमी खतांची गरज भासेल आणि कमी प्रदूषण होईल, अशी पिके विकसित करण्यास मदत होऊ शकते.



न्यू यॉर्क विद्यापीठाच्या संशोधकांनी मातीतून पुरेसा नायट्रोजन शोषून घेतल्यानंतर वनस्पतींना पोट भरल्यासारखे (तृप्त) वाटते, अशा एका आण्विक यंत्रणेचा शोध लावला आहे. या शोधामुळे खतांची आवश्यकता खूपच कमी असलेल्या पिकांच्या निर्मितीचा मार्ग मोकळा होऊ शकतो. ‘द प्लान्ट सेल’मध्ये प्रकाशित झालेल्या या अभ्यासानुसार, वनस्पतींमध्ये ‘नायट्रोजन तृप्ती’चा संकेत देणारा मुख्य नियामक म्हणून एचएचओ५ नावाच्या प्रथिनाची ओळख पटली आहे. जेव्हा पुरेसा नायट्रोजन सेंद्रिय संयुगांमध्ये रूपांतरित होतो, तेव्हा ‘एचएचओ५’ वनस्पतीला जमिनीतून अधिक नायट्रोजन शोषून घेणे थांबवण्याचा संदेश देते.

नायट्रोजनच्या विविध पातळ्या आणि प्रकारांना संवेदनशील असलेल्या जनुकीय नियामकांना ओळखून, आम्ही नायट्रोजनच्या वापरावर नियंत्रण ठेवणारा एक नियामक घटक शोधून काढला आहे, असे न्यू यॉर्क विद्यापीठ येथील जीवशास्त्र विभागाच्या प्राध्यापिका आणि या अभ्यासाच्या सह-वरिष्ठ लेखिका ग्लोरिया कोरुझी यांनी सांगितले. नायट्रोजन हे वनस्पतींच्या वाढीसाठी अत्यंत महत्त्वाच्या पोषक घटकांपैकी एक आहे आणि ते प्रामुख्याने खतांद्वारे पुरवले जाते. मात्र, शेतात दिलेल्या खतांपैकी केवळ ५० टक्के खतच वनस्पतींकडून शोषले जाते. उर्वरित खत हे नद्या आणि तलाव दूषित करतात. हानिकारक अल्गल फुलांना इंधन देतात आणि नायट्रस ऑक्साईडच्या उत्सर्जनास हातभार लावतात. ◂ (वृत्तसंस्था)

**प्रक्रिया थांबवणारे घटक म्हणून करते काम**

**थोडक्यात सांगायचे तर, ती वनस्पती जणू काही पोट भरले आहे, असे सांगत असते, असे मुख्य संशोधक विल हिंकली यांनी स्पष्ट केले. या शोधाची पडताळणी करण्यासाठी, शास्त्रज्ञांनी ‘एचएचओ५’ प्रथिन नसलेल्या वनस्पतींची निर्मिती केली. विशिष्ट परिस्थितीत, सामान्य वनस्पतींच्या तुलनेत या सुधारित वनस्पतींनी जवळपास तिप्पट अधिक नायट्रोजन शोषून घेतला. यावरून ‘एचएचओ५’ हे वनस्पतीमधील नायट्रोजनसाठी प्रक्रिया थांबवणारे घटक म्हणून काम करते, हे सिद्ध झाले.** ■

## बॉम्बस्फोटातील मृतांचा आकडा पोहचला १७ वर

**स्वात, ३ ऑगस्ट**

वायव्य पाकिस्तानच्या खैबर पख्तुनख्वा प्रांतात शांतता रॅलीदरम्यान पोलिस ठाण्यावर झालेल्या आत्मघाती हल्ल्यातील मृतांची संख्या सोमवारी १७ वर पोहोचली. आणखी तीन जणांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला.

स्वात जिल्ह्यातील काबल शहरातील पोलिस ठाण्यासमोर रविवारी स्वात शांतता रॅली सुरू असताना हा स्फोट झाला. रविवारच्या आत्मघाती हल्ल्यात पाच सुरक्षा कर्मचाऱ्यांसह १४ जण ठार झाले आणि १२ हून अधिक जण जखमी झाले, असे अधिकाऱ्यांनी सांगितले. रुग्णालयात आणखी तीन जखमींचा मृत्यू झाल्याने आत्मघाती बॉम्बस्फोटातील मृतांची संख्या १७ झाली आहे. यामध्ये ७ पोलिस आणि १० नागरिकांचा समावेश आहे. स्फोटानंतर उपचारासाठी दाखल झालेल्यांमध्ये मृत झालेल्या तिघांचा समावेश होता. आठ पोलिस आणि चार नागरिकांसह १२ जखमींवर सैदू शरीफ शिक्षण रुग्णालयात उपचार सुरू आहेत, असे पोलिसांनी सोमवारी सांगितले. ◂ (वृत्तसंस्था)

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत

https://epaper.dainiktarunbharat.com/



## अग्रलेख

# धर्मो रक्षति रक्षितः

कोणत्याही प्रलोभनाद्वारे किंवा फसवणुकीने धर्मांतर घडवून आणण्याच्या प्रवृत्ती सामाजिक वीण विघटनशील ठरवणाऱ्या कारणीभूत ठरतात असे अनेकदा दिसून आले आहे. त्यामुळे, धर्मांतर ही सांस्कृतिक घडी विघटविणारी कृती आहे, हे एकदा मान्य केले, की आपोआपच प्रत्येकास आपल्या धर्माचे आचरण करण्याचा हक्क अबाधित राखता येतो. प्रलोभने दाखवून किंवा बळाचा, पैशाचा वापर करून किंवा निव्वळ काही रूढींच्या गैरवापरामुळे निर्माण झालेल्या समजुतींचा धाक दाखवून धर्मांतर घडविण्याचे प्रकार केवळ महाराष्ट्रातच नव्हे, तर देशात अनेक राज्यांमध्ये घडले असले, तरी अशा धर्मांतराला कोणाचेच काही भले झाल्याची उदाहरणे नाहीत, उलट समाजाचे स्वास्थ्य बिघडवण्यापलीकडे अशा धर्मांतरातून काहीही साध्यदेखील झालेले नाही. त्यामुळे, अशा रीतीने धर्मांतर घडवून आणण्याच्या प्रकारांना आळा घालण्यासाठी आणि आपल्या पारंपरिक जीवनशैलीने आखून दिलेली जीवनाची वाटचाल निर्धोकपणे करण्यासाठी अशा कृतींना पायबंद घालणे गरजेचेच होते. त्यामुळेच, महाराष्ट्रात धर्मस्वातंत्र्य कायदा किंवा सक्तीच्या धर्मांतरविरोधातील कायदा संमत झाला ही राज्याच्या कायदेशीर व राजकीय पटलावरील अत्यंत महत्त्वपूर्ण बाब ठरली आहे. या कायद्याला राष्ट्रपतींनी मंजुरी दिल्याने आता राज्यात सर्वांनाच मुक्तपणे व निर्भयतेने आपल्या धर्माचे आचरण करता येईल. अर्थात, बळजबरीने किंवा आमिष दाखवून होणाऱ्या धर्मांतराला आळा घालण्याच्या उद्देशाने आणलेल्या या कायद्याभोवती मोठे सामाजिक व राजकीय वादंग निर्माण झाले असले, तरी त्यामागील राजकीय हेतू नजरेआड करून सांस्कृतिक, पारंपरिक आणि सामाजिक जीवनशैलीशी निगडित असलेल्या पैलूंचा विचार केल्यास, हा कायदा अस्तित्वात येणे ही जीवनशैली अबाधित राखण्यासाठीची गरजच होती यामध्ये दुमत असणार नाही.

मानवी जीवन ही केवळ कौटुंबिक कर्तव्यांची किंवा जगण्याच्या संघर्षातील रोजच्या धावपळीची केवळ एक साखळी नसते. जीवनशैलीला अर्थ प्राप्त करून देणाऱ्या संस्कृती नावाच्या एका अदृश्य धाग्याने या जीवनशैलीला बांधलेले असते आणि धर्म हा संस्कृतीचा आत्मा असतो असे म्हटले जाते. धर्माचरणाचे नाते थेट जीवनशैलीशी जोडले गेलेले असल्याने, आजच्या रूढ अर्थाने ज्याकडे कर्मकांड किंवा पूजापाठानापुरतेच पाहिले जाते, त्याहूनही धर्म या संकल्पनेचा अर्थ व्यापक आहे. आजकाल, धर्माबाबतच्या काही संकुचित समजुतींमुळे, केवळ कर्मकांड किंवा उपासनापद्धतींचे आचरण म्हणजे धर्माचरण असे मानले जात असले, तरी ते खरे नाही. धर्म ही केवळ पूजा पद्धती नाही, तर संपूर्ण समाजाचे शिस्त, दिशा आणि अर्थ देणारी ती एक जीवनशैली आहे. धर्म विचार पेरतो, तर संस्कृती ते विचार आचरणात आणण्याचे संस्कार घडविते. या दोन्ही बाबी जेव्हा एका विशिष्ट शिस्तीत अमलात आणल्या जातात, तेव्हा धर्म आपल्या जीवनशैलीत श्वासासारखा मिसळून जातो. असे धर्माचरण, संस्कृती आणि जीवनशैली यांच्यातील परस्पर संबंध समाजाच्या वाटचालीत प्रत्येक पावलावर जाणवतो. सण, उत्सव साजरे करण्यामागील काही शास्त्रीय कारणे पाहिली, तर धर्माच्या संस्काराचे सामाजिक महत्त्व स्पष्ट होते. त्यामुळे, धर्म ही केवळ जीवनशैलीशी नव्हे, तर भौगोलिकतेशीदेखील जोडली गेलेली बाब ठरते. पाश्चात्त्य देशांतील धर्माचरणाच्या परंपरा येथील भौगोलिकतेशी जुळतीलच असे नसते. धर्माच्या संस्कारांची शिकवण म्हणून सांगितली जाणारी प्रत्येक गोष्ट माणसाला निसर्गाशी आणि कुटुंबाशी जोडून ठेवणारी जीवनपद्धती शिकवते, हे भारतीय संस्कृतीशी जवळचे नाते असलेल्या धर्माने दाखवून दिले आहे. त्यामुळे, धर्म ही कोणतीही लादली जाणारी गोष्ट नाही. मानवी समाजाला एकत्र बांधून ठेवणारी आणि त्याला सांस्कृतिक अधिष्ठान देणारी ती एक नैसर्गिक गरज आहे. ज्या संस्कृती आपल्या धार्मिक व सांस्कृतिक मुळांपासून दूर गेल्या त्यांनी आपली सामाजिक ओळख आणि नैतिक पाया गमावला असे जागतिक समाजव्यवस्थेत दिसून येते. त्यामुळे, संस्कृती आणि धर्माचे रक्षण करणे म्हणजे एका समृद्ध जीवनशैलीचा वारसा आपल्या भावी पिढ्यांसाठी जतन करणे ही भारताच्या संस्कृतीची शिकवण आहे. जेव्हा धर्माची मुळे निखळतात, तेव्हा त्याच्याशी जोडलेली संस्कृतीही ढासळते. यामुळे, प्रलोभने, फसवणूक किंवा बळजबरीने होणाऱ्या धर्मांतराला अटकाव करणे ही केवळ एक कायदेशीर बाब उरत नाही, तर ती कोणत्याही समाजाची सांस्कृतिक आणि सामाजिक स्वायत्तता टिकवून ठेवण्यासाठीची एक अपरिहार्य गरज बनते. कारण, कोणत्याही राष्ट्राच्या, समाजाच्या संस्कृतीचा प्रवाह पिढ्यानपिढ्यांच्या जगण्यातून, निसर्गाशी असलेल्या सहसंबंधातून आणि धार्मिक आचरणातून तयार होत असतो. भाषा, सण, साहित्य हे सारे जीवनपद्धतीचे अविभाज्य घटक आहेत. त्यामुळे, जेव्हा एखाद्या व्यक्ती, कुटुंब किंवा समूहाचे सक्तीने किंवा प्रलोभने दाखवून फसवणुकीने धर्मांतर घडविले जाते, तेव्हा अशा व्यक्ती, कुटुंबे किंवा समूहांची केवळ प्रार्थना किंवा पूजापद्धती बदलत नाही, तर त्यांच्या परंपरा, संस्कृतीशी जोडली गेलेली पिढ्यानपिढ्यांची नाळ तोडली जात असते आणि जेव्हा संस्कृतीशी असलेले नाते तोडले जाते, तेव्हा त्या समाजाच्या अस्मितादेखील कमजोर होतात, हा इतिहास आहे. जेव्हा एखादा समाज आपल्या मूळ संस्कृतीपासून तुटतो, तेव्हा त्याची सामाजिक ओळखही पुसली जाते. म्हणूनच, धर्मांतरबंदीचा कायदा ही त्या सामाजिक आणि सांस्कृतिक वारशाचे रक्षण करणारी संरक्षक ढाल ठरणार आहे. समाज जेव्हा एका सामायिक सांस्कृतिक धाग्याने बांधलेला असतो, तेव्हा त्यात एकोपा आणि परस्परविश्वास टिकून राहतो. संघटित आणि आक्रमक धर्मांतराच्या मोहिमांमुळे या सामाजिक रचनेला तडे जातात. सामाजिक सलोखा धोक्यात येतो. कौटुंबिक विघटन आणि सामाजिक तणाव वाढू लागतो. म्हणूनच, सामाजिक स्थिरता आणि शांतता अबाधित राखण्यासाठी धर्मांतरावर कायदेशीर बंधने असणे आवश्यक ठरते.

भारतीय राज्यघटनेने प्रत्येक नागरिकाला आपल्या धर्माचे आचरण करण्याचे आणि त्याचा प्रसार करण्याचे स्वातंत्र्य दिले आहे. परंतु, असे स्वातंत्र्य म्हणजे धर्मपरिवर्तन करण्याचा परवाना नसतो. जिथे अज्ञानाचा, गरिबीचा, आजारपणाचा किंवा आर्थिक लाचेचा फायदा घेऊन धर्मांतर घडवले जाते, तिथे ते स्वातंत्र्य राहत नाही, तर तो एक प्रकारचा शोषणाचा मार्ग बनतो. बळजबरी किंवा आमिष दाखवून केलेले धर्मांतर हे व्यक्तीच्या स्वेच्छेचा पराभव करते. अशा अनैतिक मार्गांना आळा घालणे म्हणजे खऱ्या अर्थाने नागरिकांच्या धार्मिक स्वातंत्र्याचे रक्षण करणे ठरते. या कायद्याने आता ही जबाबदारीदेखील संबंधित यंत्रणांच्या खांद्यावर दिली आहे. जगातील अनेक समाज आणि संस्कृती केवळ धर्मांतराच्या वादळात आपल्या मूळ अस्तित्वासह नामशेष झाल्या. आपल्या मूळ संस्कृतीशी आणि धर्माशी नाळ टिकवून ठेवली, तर काळाच्या ओघात आपले अस्तित्व सिद्ध करता येईल, हा विचार स्वीकारला, की धर्म ही केवळ वैयक्तिक बाब राहत नाही. ती एक सामाजिक गरज ठरते. त्यामुळे अनैतिक, छुप्या आणि बळजबरीच्या धर्मांतर पद्धतींच्या विरोधात अमलात येणाऱ्या या कायद्याची गरज आहे. महाराष्ट्राने ती गरज ओळखल्याने राज्याच्या सामाजिक आणि सांस्कृतिकतेचे भविष्य सुरक्षिततेच्या भावनेने आश्वस्त झाले आहे. आपली संस्कृती, आपला इतिहास, आपल्या परंपरा आणि आपली सामाजिक रचना सुरक्षित ठेवण्यासाठी अशा कायद्याची कडक अंमलबजावणी होणे अत्यंत गरजेचे आहे. धर्म आणि संस्कृतीचे रक्षण करणे म्हणजे केवळ भूतकाळाचा अभिमान बाळगणे नव्हे, तर आपल्या भावी पिढ्यांचे भविष्य सुरक्षित करणे होय. म्हणूनच, धर्मांतरबंदी ही केवळ एक कायद्याची गरज नसून, ती आपल्या समाजाची आत्मिक, सामाजिक आणि सांस्कृतिक गरज आहे. ■

## आंतरराष्ट्रीय

# चीनमध्ये पुन्हा कोरोना; भारत सतर्क

**प्रा. जयसिंग यादव**

कोरोना महामारीला सुरुवात होऊन सहा वर्षांचा काळ उलटला असला, तरी कोविड-१९ हा इतिहासजमा झालेला आजार नाही, हे चीनमधून समोर आलेल्या नव्या आकडेवारीने पुन्हा एकदा स्पष्ट केले आहे. चीनमध्ये गेल्या काही आठवड्यांमध्ये कोविड-१९ च्या रुग्णसंख्येत वाढ झाली असून ओमिक्रॉनचा एनबी १.८.१ हा उपप्रकार वेगाने पसरत आहे. जून महिन्यात चीनमध्ये कोरोनाचे जवळपास ७९ हजार नवे रुग्ण आढळले, पॉझिटिव्हिटी दर १६.३ टक्क्यांवर पोहोचला आणि यंदा प्रथमच कोविडने इन्फ्लूएंझालाही मागे टाकले, मात्र या वेळी परिस्थिती २०२० किंवा २०२१ सारखी भीषण नाही. बहुसंख्य रुग्णांमध्ये सौम्य लक्षणे असून मृत्यूचे प्रमाण अत्यल्प आहे. त्यामुळे या घडामोडीकडे भीतीने नव्हे, तर सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेच्या दृष्टीने एक गंभीर इशारा म्हणून पाहण्याची गरज आहे. अर्थात परिस्थितीतील एक महत्त्वाचा बदल लक्षात घेतला पाहिजे. तीव्रता पूर्वीइतकी राहिली नसली तरी कोरोनाचा विषाणू अजूनही बदलत आहे. 'ओमिक्रॉन'च्या उपप्रकारांमुळे संसर्ग झपाट्याने होतो, मात्र गंभीर आजार होण्याचे प्रमाण कमी आहे. याचे मुख्य कारण म्हणजे गेल्या काही वर्षांमध्ये जगातील मोठ्या लोकसंख्येला लसीकरणाचा लाभ झाला आहे. अनेकांना नैसर्गिक संसर्गही झाला आहे. त्यामुळे समाजात काही प्रमाणात सामूहिक प्रतिकारशक्ती निर्माण झाली आहे. याचा अर्थ धोका संपला आहे, असा होत नाही, पण आरोग्यव्यवस्थेची त्याचा सामना करण्याची क्षमता निश्चितच वाढली आहे, तरीही चीनमधील आकडे काही महत्त्वाचे प्रश्न उपस्थित करतात.

उन्हाळ्यात कोविडची वाढ का झाली? यापूर्वी हिवाळा हा श्वसन संसर्गाचा हंगाम मानला जात होता. आता मात्र एअर कंडिशनर असलेल्या बंद जागांमध्ये अधिक वेळ घालवणे, पर्यटन आणि प्रवासात वाढ, तसेच बदलत्या हवामानामुळे विषाणूच्या प्रसाराचे स्वरूपही बदलले आहे. म्हणजेच कोविड आता ऋतूंवर अवलंबून राहिलेला नाही. तो वर्षभर अधूनमधून डोके वर काढू शकतो. त्यामुळे हिवाळ्यातच नव्हे, तर वर्षभर सार्वजनिक आरोग्य यंत्रणा सज्ज ठेवावी लागणार आहे. यामधील आणखी एक महत्त्वाचा मुद्दा म्हणजे विषाणूचे उत्परिवर्तन. प्रत्येक संसर्गासोबत विषाणूमध्ये लहान-मोठे बदल होत असतात. एनबी १.८.१ हा अशाच बदलांमधून निर्माण झालेला उपप्रकार आहे. आज तो तुलनेने सौम्य आहे; पण भविष्यातील प्रत्येक उपप्रकारही तसाच असेल, याची कोणतीही हमी नाही. कोविडच्या पहिल्या टप्प्यात अल्फा, त्यानंतर डेल्टा आणि मग ओमिक्रॉन या प्रकारांनी जगाला वेगवेगळ्या प्रकारे हादरवले. त्यामुळे जनुकीय तपासणी आणि विषाणूंच्या सततच्या निरीक्षणाला आजही तितकेच महत्त्व आहे. भारताच्या दृष्टीने सध्या घाबरण्याचे कारण नसले, तरी निष्काळजी राहण्याचेही कारण नाही. देशात सक्रिय रुग्णसंख्या अत्यल्प आहे. काही राज्यांमध्ये तुरळक रुग्ण आढळत असले, तरी रुग्णालयांवरील ताण वाढलेला नाही, परंतु भारतासारख्या १४० कोटी लोकसंख्या असलेल्या देशात कोणताही संसर्ग वेगाने पसरू शकतो. त्यामुळे सीमावर्ती तपासणी, विमानतळांवरील देखरेख, संशयित नमुन्यांचे जनुकीय विश्लेषण आणि राज्यांच्या आरोग्य यंत्रणांमधील समन्वय सातत्याने मजबूत ठेवणे गरजेचे आहे.



कोविडच्या काळात भारताने अनेक यशस्वी प्रयोग केले. कोविडसारखी डिजिटल लसीकरण व्यवस्था, मोठ्या प्रमाणावर लसींचे उत्पादन, कमी वेळात उभारलेली कोविड रुग्णालये, ऑक्सिजन उत्पादनातील वाढ आणि आरोग्य कर्मचाऱ्यांचे योगदान यामुळे भारताला जागतिक स्तरावर प्रशंसा मिळाली; मात्र दुसऱ्या बाजूला दुसऱ्या लाटेतील ऑक्सिजनचा तुटवडा, ग्रामीण भागातील अपुरी आरोग्य सेवा, रुग्णवाहिकांची कमतरता आणि खाजगी आरोग्य व्यवस्थेतील आर्थिक शोषणही तितकेच वास्तव होते. या अनुभवांतून कायमस्वरूपी सुधारणा झाल्या का, हा प्रश्न अजूनही अनुत्तरित आहे. भारताच्या सार्वजनिक आरोग्य खर्चाचे प्रमाण आजही विकसित देशांच्या तुलनेत कमी आहे. प्राथमिक आरोग्य केंद्रे, जिल्हा रुग्णालये, संसर्गजन्य रोग संशोधन प्रयोगशाळा आणि प्रशिक्षित मनुष्यबळ यामध्ये मोठ्या प्रमाणात गुंतवणुकीची आवश्यकता आहे. महामारी आली, की यंत्रणा उभारण्यापेक्षा शांत काळातच मजबूत पायाभूत सुविधा उभ्या करणे अधिक शहाणपणाचे ठरते. दुर्दैवाने भारतासह अनेक देशांमध्ये संकट ओसरले, की आरोग्य क्षेत्रावरील लक्ष कमी होते. कोविडने विज्ञान आणि समाज यांच्यातील नातेसंबंधाचाही कस लावला. महामारीच्या काळात अफवा, 'सोशल मीडिया'वरील दिशाभूल, बनावट औषधे, चमत्कारी उपचार आणि लसींबाबतच्या गैरसमजांनी मोठे नुकसान केले. विज्ञानावरील विश्वास डळमळीत करण्याचा प्रयत्न झाला. आज पुन्हा कोविडची चर्चा सुरू होत असताना समाजाने हा धडा विसरू नये. कोविडच्या सुरुवातीच्या काळात उशिरा माहिती देणे, संसर्गाचे खरे प्रमाण लपवणे आणि जागतिक संस्थांशी समन्वयाचा अभाव यावर अनेक प्रश्न उपस्थित झाले होते. भविष्यात अशा चुका परवडणाऱ्या नाहीत. कोणत्याही देशात नवीन प्रकार आढळल्यास त्याची माहिती त्वरित जगासमोर ठेवणे, संशोधनासाठी नमुने उपलब्ध करून देणे आणि लस उत्पादकांशी समन्वय राखणे ही आता आंतरराष्ट्रीय जबाबदारी झाली आहे. कोविडने जागतिक अर्थव्यवस्थेचेही गणित बदलले. चीनमधील वाढती रुग्णसंख्या ही आजच्या घडीला महामारीची घंटा नाही; परंतु निष्काळजीपणाविरुद्धचा स्पष्ट इशारा आहे. विषाणू बदलतो, परिस्थिती बदलते आणि समाजालाही बदलावे लागते. कोविडचे भय कमी झाले असले, तरी त्याचे अस्तित्व संपलेले नाही. त्यामुळे घाबरण्यापेक्षा सजग राहणे, विज्ञानावर विश्वास ठेवणे, आरोग्य व्यवस्था सक्षम करणे आणि नागरिकांनी जबाबदार वर्तन करणे हीच भविष्यातील खरी रणनीती ठरेल.

कोरोनाने मानवजातीला मोठी किंमत मोजायला लावली. त्या अनुभवातून शिकून सार्वजनिक आरोग्य, संशोधन आणि नागरिकांची जागरूकता यांचा मजबूत पाया उभारला, तर कोविडचे पुनरागमन ही भीतीची नव्हे, तर तयारीची परीक्षा ठरेल. या परीक्षेत यशस्वी होणे हे केवळ सरकारचे नव्हे, तर संपूर्ण समाजाचे सामूहिक उत्तरदायित्व आहे. ■

(लेखक राज्यशास्त्राचे अभ्यासक आहेत.)

## वेध

**चंद्रकांत लोहाणा**

# श्रद्धा आणि परंपरेचा गौरव

महाराष्ट्र राज्याला अनेक सांस्कृतिक, धार्मिक आणि संत परंपरांचा वारसा लाभला आहे. या वारशामध्ये आणखी एक ऐतिहासिक भर पडली आहे. राष्ट्रीय स्तरावर मिळालेली ही नवी ओळख धार्मिकदृष्ट्या अतिशय महत्त्वाची आहे. साडेतीन शक्तिपीठांपैकी प्रमुख पीठ असलेल्या तीर्थक्षेत्र माहूर गडावरील श्री रेणुकामाता मंदिरामध्ये देवीला नैवेद्य म्हणून अर्पण केल्या जाणाऱ्या पारंपरिक तांबूलला केंद्र सरकारने अधिकृत भौगोलिक मानांकन बहाल केले आहे. त्यामुळे माहूरचा तांबूल प्रसाद हा देशामध्ये तिरुपती देवस्थानमध्ये मिळणाऱ्या लाडूच्या प्रसादानंतर जीआय मानांकन मिळविणारा दुसरा तर महाराष्ट्रामध्ये पहिला मानांकनप्राप्त प्रसाद ठरला आहे. या यशामुळे माहूरच्या धार्मिक पर्यटनाला जागतिक स्तरावर फार मोठी गती मिळणार आहे. माहूरचा हा प्रसाद फार पूर्वीपासून प्रसिद्ध आहे. हा प्रसाद लाखो भक्तांच्या आस्थेचाही विषय आहे. त्यावर केंद्र सरकारने शिक्कामोर्तबही केले आहे. या तांबूल प्रसादाचे वैशिष्ट्य म्हणजे त्यामध्ये वापरण्यात येणारे सर्व घटक नैसर्गिक आणि आयुर्वेदिकदृष्ट्या औषधीयुक्त आहेत. या तांबूलमध्ये विड्याची पाने, सुपारी, चुना, काथ, लवंग, सोप, वेलची, जायपत्री, जायफळ, धनेडाळ, ओवा, जेष्ठमध, आस्मन तारा या घटकांचा समावेश आहे. पारंपरिक पद्धतीने हे सर्व घटक एकत्र करून दगडी खलबत्त्यामध्ये तांबूल तयार करण्यात येतो. प्राचीन धर्मग्रंथ आणि लोक परंपरेच्या मान्यतेनुसार श्री रेणुका मातेने त्यांचे परम् भक्त असलेल्या श्री विष्णुकवी महाराजांना स्वप्नामध्ये दृष्टांत देऊन तांबुलाचा नवैद्य सुरू करण्याची आज्ञा दिली होती. त्यानंतर ही पवित्र परंपरा आजही अखंडपणे सुरू आहे.



पारंपरिक सेवेकरी कुटुंब कोणत्याही व्यावसायिक फायद्याविना हा वारसा जपण्याचे कार्य करीत आहेत. पूर्वी जवळपास प्रत्येक घरामध्ये जेवणानंतर विड्याचे पान खाण्याची एक समृद्ध भारतीय परंपरा चालत आली होती. अशा कितीतरी समृद्ध परंपरांना आम्ही विसरत चाललो आहोत. या परंपरा तथ्यहीन नाहीत. त्यामध्ये निरोगी जगण्याची कला आणि विज्ञान दडले आहे. आयुर्वेदामध्ये विड्याच्या पानास अमृतासमान मानले गेले आहे. विड्याच्या पानाचे नियमित सेवन केल्यास शरीरामध्ये होणाऱ्या शेकडो रोगांपासून मुक्ती मिळू शकते. त्यामुळे एक शौक म्हणून नव्हे तर मानवी शरीराची एक आवश्यक बाब आणि औषध म्हणून ही परंपरा आमच्या पूर्वजांनी समाजामध्ये रुजविली. ही परंपरा त्यांनी यथाशक्ती जोपासलीही. प्राचीन आयुर्वेद ग्रंथामध्ये सर्व रोगांची वात, पित्त आणि कफ या तीन दोषांमध्ये विभागणी केली आहे. तीन दोषांपैकी शरीरामध्ये एक जरी दोष असंतुलित झाला तर शारीरिक व्याधी उत्पन्न होतात. मानवी शरीरामधील वात आणि कफ असंतुलित झाल्यावर होणाऱ्या आजारांवर विड्याचे पान अतिशय उपयुक्त असल्याचे म्हटले आहे. जेवणानंतर विड्याचे पान खाल्ल्याने मुखामधील अनेक जीवाणूंचा प्रभावीपणे सामना केला जातो. त्यामुळे मुखातील दुर्गंधी नाहीशी होते. दात दुखणे, दात किडणे यावरही विड्याचे पान अतिशय गुणकारी आहे. जेवणानंतर फक्त विड्याचे पान चावून खाल्ल्याने पचनसंस्था सुधारून अपचनाचा त्रास कमी होतो व पोटामध्ये वाढलेला वात (वायू) कमी होण्यास मदत होते. विड्याच्या पानास आयुर्वेदामध्ये उष्ण मानले गेले आहे. त्यामुळे हे पान वात आणि कफ या दोन्ही दोषावर अतिशय उपयुक्त मानले गेले आहे. घशामध्ये कफ साठणे, सर्दी पडसे व आदी कफाच्या अनेक विकारांसाठी पानाचा उपयोग केला जाऊ शकतो. विड्याचे पान उष्ण असल्याने पित्त प्रकृतीच्या लोकांनी जपून वापर करावा, असे आयुर्वेद ग्रंथ सांगतो.

औषधी गुणांनी परिपूर्ण असलेले विड्याचे पान म्हणजे भारतीयांचा एक समृद्ध वारसा आहे. काळाच्या ओघामध्ये आम्ही आधुनिक होत गेल्याने हाही एक समृद्ध वारसा मागे पडला आहे. भारतीय समाजाने आधुनिकतेची कास धरल्याने आम्हीच आमच्या चिरंतन परंपरांना वाळीत टाकले आहे. परंतु, काळानुरूप त्याचे विश्लेषण केल्यास त्यामागे आमच्या पूर्वजांचा वैज्ञानिक दृष्टिकोन सहज लक्षात येईल. जगामध्ये कोठेच नसेल असा भारतीयांचा आहारही एक समृद्ध आणि परिपूर्ण आहार गणला जातो. त्यामुळे या परंपरांना उजाळा देऊन त्याचे जतन केल्यास आमच्या निरोगी आरोग्याचा मार्ग अधिक सुकर होऊ शकतो. ■

९८८१७१७८५६

## इतस्ततः

# आंदोलनातून सुसंवादाचे धडे...

**दत्तात्रेय आंबुलकर**

'नीट' परीक्षेच्या पेपरफुटीच्या निमित्ताने उठलेला गदारोळ, झालेले आंदोलन, या आंदोलनाचे नेतृत्व व त्यातील राजकारण आणि राजकारण्यांचा प्रभाव आणि परिणामकारकता, आंदोलनकर्त्यांची आक्रमकता व सरकारची काही प्रमाणातील हतबलता, निर्णय प्रक्रियेवरच निर्णय घेण्याची आलेली वेळ, आंदोलनातून निर्माण झालेले नवनवे व बदलते मुद्दे आणि या मुद्द्यांवर निर्माण झालेला अथवा निर्माण करण्यात आलेला गतिरोध इ. मुळे परीक्षा पद्धती या मुळात शैक्षणिक स्वरूपातील प्रश्नावर फार मोठ्या प्रमाणावर राजकारण साधण्यात आले. याचदरम्यान आंदोलन आणि आंदोलकांचा आक्रस्ताळेपणा व त्याच वेळी शासन-प्रशासन स्तरावरील विस्कळीत संवाद यांचे जाहीर प्रशासनिक प्रदर्शन झाले. याशिवाय, आंदोलनकाळात अगदी सुरुवातीपासून शासन-प्रशासनाला भावनिक व विचारशीलतेची जोड नसल्यास एखादा महत्त्वाचा व जिव्हाळ्याचा मुद्द कसा व कुठवर भरकटू शकतो, याचीही शिकवण या कथित विद्यार्थी आंदोलनातून सर्वच संबंधित समाजघटकांना यानिमित्ताने मिळाली.

या साऱ्या आंदोलक व आंदोलनाची पृष्ठभूमी म्हणजे सर्वोच्च न्यायालयात वारंवार धाव घेऊन प्रसंगी क्षुल्लक मुद्द्यांवर पण सार्वजनिक-लोकहित याचिका दाखल करणाऱ्या आंदोलनकारी याचिकाकर्त्यांवर व त्यांच्या भूमिकेसह उद्दिष्टांवर परखड मत व्यक्त करताना, सर्वोच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायाधीशांनी अशा याचिकांचा उल्लेख 'झुरळ' शब्दात केला. याच शब्दाचा अतिरेकी दुरुपयोग करून आपल्या व आपल्यासारख्या समविचारी व्यक्तींना देशपातळीवरच नव्हे, तर जागतिक स्तरावर भडकावणाऱ्या भावनिक स्तरावर एकत्र करून त्याला सुरुवातीला 'नीट' पेपरफुटीच्या नावाखाली तथाकथित विद्यार्थी आंदोलनाचे व त्यानंतरच्या काळात अल्पावधीत व पद्धतशीरपणे राजकीय नियोजनबद्ध स्वरूप देण्यात आले.

शासन-प्रशासन पद्धतीत व विशेषतः महत्त्वाच्या पदावरून संवेदनशील व समाजजीवनाच्या संदर्भात महत्त्वाचे प्रशासनिक विषय हाताळताना अशा व्यक्तीने कुठलीही व्यक्ती अथवा विषयावर आपले मत विशेषतः जाहीरपणे व्यक्त करताना साधकबाधक तारतम्य बाळगून जाहीर टिप्पणी वा मतप्रदर्शन करणे अत्यावश्यक ठरते. याचे महत्त्वाचे कारण म्हणजे, अधिकार व जबाबदारीच्या पदावर काम करणाऱ्या अशा व्यक्तीच्या मतप्रदर्शनाचा समाजमनावर व प्रसंगी समाजविघातक प्रवृत्तींवर अतिरेकी परिणाम होऊ शकतो.

सर्वोच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायाधीशपदी म्हणजेच, देशाच्या न्यायसंस्थेच्या सर्वोच्च पदावर काम करणाऱ्या सन्माननीय व्यक्तीने विशिष्ट याचिकाकर्त्यांचा उल्लेख 'झुरळ' म्हणून करण्याने जंतरमंतरवरील आंदोलनाला सुरुवात झाली. आंदोलन ऐनभरावर आले असताना आंदोलनाशी संबंधित अन्य याचिकांवर मतप्रदर्शन करताना 'आम्हाला असे व्हिडीओ पाहण्यास वेळ नाही' असे फेरमतप्रदर्शन केल्याने आंदोलन आणि आंदोलनाचा भडका उडाला, हा ताजा इतिहास.

मग वर नमूद केलेले मतप्रदर्शन करणे टाळता येण्यासारखे नव्हते काय? या नेमक्याव विशिष्ट टिप्पणींशिवाय सर्वोच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश व पीठासीन न्यायाधीशांना प्रश्न आणि प्रकरण हाताळता आले असते. सर्वोच्च न्यायालय व एकूणच न्यायव्यवस्थेप्रति संपूर्ण आदर व्यक्त करून पण असे वाटणे स्वाभाविक आहे की, या साऱ्या प्रकाराची 'झुरळ' अशी संभावना न करता, अन्य समर्पक शब्दात वा प्रसंगी अनुल्लेखाने आणि प्रभावीपणे संभावना करता आली असती. व्यवस्थापकीय संदर्भात म्हणूनच भावनिक संतुलनावर आधारित संवाद व संवाद प्रक्रियेला फार महत्त्वाचे मानले जाते. व्यावसायिक-व्यावहारिक संवादप्रसंगी आपला मुद्दा महत्त्वाचा व योग्य असला, तरी त्याची मांडणी-बोलणीदेखील तितकीच संयमितपणे करणे व त्याला संवेदनशीलतेची जोड देणे नितांत आवश्यक असते. असे न झाल्यास संवादातून समस्येवर तोडगा न निघता आंदोलनाचा भडका उडून स्थिती हाताबाहेर जाऊ शकते व तोडगा निघणे जवळजवळ अशक्य होते.

अशाच स्वरूपाची भूमिका विद्यार्थी-आंदोलकांशी संवाद साधताना केंद्र सरकारने केलेल्या विलंबातून दिसून आली. सरकारने आंदोलकांशी संवाद साधण्यासाठी तीन आठवड्यांहून अधिक काळ लावला व तोपर्यंत सुरुवातीला परीक्षा पेपरफुटीच्या माध्यमातून विद्यार्थी आंदोलन म्हणून सुरू करण्यात आलेल्या या आंदोलनावर राजकारणी, पुढारी व सरकार विरोधकच नव्हे; तर समाजकंटक व विध्वंसकारी घटकांनी पुरतेपणी ताबा मिळविला व त्यातून अनेक विपरीत घटना घडून गेल्या. याच राजकारणाची अपरिहार्य परिणती म्हणजे, आंदोलन अधिक हिंसक व अधिकाधिक बेकायदेशीर होत गेले. यातून पोलिसांवर हिंसक हल्ले, आंदोलकांवर लाठीमार, आंदोलनाला चिथावणी देणाऱ्यांना ताब्यात घेणे, अश्रुधुराच्या नळकांड्याचा वापर इ. घटना घडत गेल्या. त्याशिवाय, पंतप्रधान निवासस्थानापर्यंत घडवून आक्रमक आंदोलन करण्याचा अभूतपूर्व प्रकार याचाच पुढील टप्पा ठरला.

अशाप्रकारे 'नीट' पेपरफुटीपासून सुरू झालेल्या असंतोषाने आंदोलनाचे व शासकीय-राजकीय निर्णयांचे अनेक टप्पे अनुभवले. यामध्ये पेपरफुटीनंतर तातडीने व निर्धारित पद्धतीने फेरपरीक्षा घेणारे केंद्र सरकार, त्याला प्रतिसाद देणारे बहुतांश परीक्षार्थी-विद्यार्थी, या साऱ्या प्रक्रियेवर टीका करणारे विरोधी पक्ष, विद्यार्थ्यांना घेरून आंदोलनाच्या माध्यमातून राजकीय खेळी करणारे पुढारी, न्यायालयीन प्रक्रियेशी संबंधित घटक इ. साऱ्यांचा समावेश होता. अपवाद होता तो 'नीट' परीक्षा देणारे विद्यार्थी, त्यांचे पालक आणि परीक्षा प्रक्रियेशी संबंधित महत्त्वाच्या घटकांचा!

विशेषतः विद्यार्थी-आंदोलकांकडून 'नीट' पेपरफुटीच्या प्रकरणातून आलेले नैराश्य, मानसिक धक्का व फेरपरीक्षेची काळजी आणि तणावातून २१ विद्यार्थ्यांनी आत्महत्या केल्याचा दावा करण्याच्या पृष्ठभूमीवर विद्यार्थी-पालकांचा या साऱ्या आंदोलनादरम्यानचा नगण्य सहभाग काही वेगळेच सांगून जातो. इंजिनीअरिंग प्रवेश पात्रता परीक्षेची पूर्वतयारी करणाऱ्यांसाठी मार्गदर्शन करणारे महत्त्वाचे केंद्र व शहर ठरणाऱ्या कोटा शहरात काही विद्यार्थ्यांनी इंजिनीअरिंगमध्ये प्रवेश न मिळण्याच्या धास्तीतून आत्महत्या केल्याप्रकरणी विविध ठिकाणी विद्यार्थी-पालकांनी आंदोलने केली होती व त्यामुळे त्या समस्येची भीषणता पण सर्वांपुढे आली होती.

यावेळी विद्यार्थ्यांच्या आंदोलनाला लाभलेले राजकीय वळण व असामाजिक तत्त्वांचे पाठबळ या साऱ्यांवर धोरणात्मक स्वरूपात व कायमस्वरूपी उपाययोजना साधण्यासाठी केंद्र सरकारने 'आधार'सारख्या व्यापक व यशस्वी योजनेची अंमलबजावणी करणारे नंदन निलेकणी यांच्या नेतृत्वाखाली नेमलेली तज्ज्ञ समिती व त्याच्याच जोडीला संसदेत तातडीने मांडलेल्या पेपरफुटीप्रकरणी कठोर शिक्षेसह दंडात्मक तरतुदीची केलेली घोषणा आशादायी ठरणारी आहे. ■

(लेखक एचआर आणि व्यवस्थापन सल्लागार आहेत.)

९८२२८४७८८६

### पक्ष कार्यकर्त्यांचा असावा

कोणत्याही राजकीय पक्षाची खरी ताकद त्याच्या मोठ्या नेत्यांमध्ये नसते, तर तळागाळातील कार्यकर्त्यांमध्ये असते. कार्यकर्ता हा पक्षाचा पाया असतो. जनतेच्या सुख-दुःखात सहभागी होणारा, प्रत्येक संकटात लोकांसोबत उभा राहणारा कार्यकर्ता हा पक्षाचा खरा चेहरा असतो. त्यामुळे नेतृत्वाने कार्यकर्त्यांवर विश्वास ठेवून त्यांना संधी देणे ही काळाची गरज आहे. आज अनेक पक्षांमध्ये नेतृत्व काही मोजक्या व्यक्तींपुरते मर्यादित राहिल्याचे चित्र दिसते. परिणामी नवीन नेतृत्व घडण्याची प्रक्रिया मंदावते. कार्यकर्त्यांना जबाबदारी, निर्णयक्षमता आणि नेतृत्वाची संधी मिळाली तर पक्ष अधिक सक्षम, सशक्त आणि जनाभिमुख बनतो. मोठा नेता तोच, जो स्वतःपुरता मर्यादित न राहता अनेक नेते घडवतो.

पक्ष हा केवळ पदाधिकाऱ्यांचा नसून सामान्य कार्यकर्त्यांचा आणि सर्वसामान्य जनतेचा असला पाहिजे. शेतकरी, कामगार, युवक, महिला, विद्यार्थी आणि वंचित घटक यांच्या प्रश्नांना प्राधान्य देणारा पक्षच समाजात विश्वास निर्माण करू शकतो. कार्यकर्त्याचा सन्मान, त्याच्या मताला महत्त्व आणि त्याच्या कामाची योग्य दखल घेतली गेली तर पक्षसंघटना अधिक बळकट होते. कार्यकर्त्यांना पुढे आणणारे नेतृत्वच भविष्यात पक्षाला दीर्घकाळ टिकवून ठेवते. नेतृत्वाचा खरा वारसा हा पदांचा नसून, सक्षम आणि निष्ठावान कार्यकर्ते घडवण्याचा आहे. वर्तमान राजकारणात प्रत्येक नेत्याने हा विचार स्वीकारण्याची गरज आहे. पक्ष जितका सामान्य माणसाशी जोडलेला असेल, तितकाच तो लोकांच्या मनात आणि लोकशाहीच्या मूल्यांत अधिक दृढपणे रुजलेला राहील.

**मुनीश्वर मलेवार**/९४०५५१३३२४

■■

## वाचक पत्रे

### सुजाण नागरिकांचे कर्तव्य... एक चिंतन

लोकशाहीत नागरिकांचे हक्क (अधिकार) आणि कर्तव्य हे एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. त्यामुळे अधिकारांचा उपभोग घेताना प्रत्येक नागरिकाने स्वतःच्या जबाबदाऱ्या (कर्तव्य) पार पाडणे हे पण तितकेच महत्त्वाचे आहे. कारण देशाच्या आणि समाजाच्या प्रगतीसाठी हे अत्यंत आवश्यक आहे. तसेच अधिकारांचा वापर सुयोग्य पद्धतीने व्हावा जेणे करून समाजातील शांतता कायम टिकून राहील. याकरिता संविधानाने नागरिकांना अधिकारासोबत काही मूलभूत कर्तव्ये देखील दिली आहेत आणि याचा विसर पडता कामा नये. सध्याच्या युगात देशाचे रक्षण करणे, शांतता अबाधित ठेवणे हे सुद्धा प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे. आपण जर शिक्षित आहोत तर सुशिक्षित असणे पण तेवढेच गरजेचे नाही का?

शत्रू म्हणजे केवळ सीमेपलीकडे उभा असलेला सैनिक नव्हे. कधीकधी तो देशाच्या सीमेच्या आतही सक्रिय असतो. तो नेहमीच शस्त्रसज्ज होऊन येतो असे नाही; कधीकधी तो भ्रष्टाचार, राष्ट्रविरोधी हिंसाचार, दहशतवाद, संघटित गुन्हेगारी, हेरगिरी, समाजात द्वेष पसरवणे, खोटा प्रचार किंवा राष्ट्रीय ऐक्य धोक्यात आणणाऱ्या कारवायांच्या रूपात प्रकट होतो.

सीमेवर उभा असलेला सैनिक राष्ट्राचे बाह्य आक्रमणापासून रक्षण करतो, परंतु देशात राहणाऱ्या प्रत्येक सजग नागरिकाचे हे कर्तव्य आहे की, त्याने कायद्याचा आदर करावा, समाजात सलोखा राखावा, सत्य आणि सदसद्विवेकबुद्धीला पाठिंबा द्यावा आणि राष्ट्राची सुरक्षा, ऐक्य व अखंडता धोक्यात आणणाऱ्या कोणत्याही कृतीला विरोध करावा. सैनिक सीमेचे रक्षण करतात, पण सजग नागरिक राष्ट्राच्या आत्म्याचे रक्षण करतात. म्हणून, सध्याच्या काळात सुजाण नागरिकांचे कर्तव्य म्हणजे केवळ कायद्याचे पालन करणे नव्हे, तर लोकशाही मूल्यांचे रक्षण करणे, पर्यावरणाचे जतन करणे, डिजिटल युगात जबाबदारीने वागणे आणि राष्ट्र उभारणीत सक्रिय योगदान देणे होय.

**संजय श्रौती**/९८६०४५१८४०

■■

### शहरातील पुरावर उपाय शोधायला हवा

यंदा पाऊस विलंबाने आला. आला तेव्हा एक दोन तासांच्या पावसाने सगळीकडे नद्या निर्माण झाल्या. शाळेतील मुले पावसाच्या भयावह स्थितीने भयभीत झालीत. दुकाने जलमय झालीत. अनेक घरांत पाणी शिरले आणि गृहिणींची तारांबळ उडाली. घरातील साहित्याची अवस्था दयनीय झाली. नागपूरसह मोठ्या शहरात महापूर आला त्याचे कारण काय असावे. सगळीकडे सिमेंटचे रस्ते झाले, त्याच्या बाजूला सिमेंट ब्लॉक्स लागले आणि याला जोडून पदपथ झाले. आता पाणी जमिनीत मुरण्यासाठी जागाच उरली नाही. पाणी लगेच जायला हवे असेल तर पाण्याचा मार्ग मोकळा हवा. कचरा, प्लास्टिक असेल तर पाण्याचा रस्ता बंद होतो आणि वाहतूक विस्कळीत होते. त्यामुळे अपघाताला आमंत्रण मिळते. विनाकारण जीवहानी, वित्तहानी होते. गेल्या काही वर्षांत जलमय स्थिती निर्माण होते आहे. पाऊस येतो आणि जातो, पण आला की भल्याभल्यांना उद्ध्वस्त करून जातो. सधन लोकांना पुन्हा नव्याने सावरता येते, पण गरीब लोकांचे आयुष्य उद्ध्वस्त होते. घरातील होते नव्हते ते पाण्यात वाहून गेल्याने जगायचे कसे, हा प्रश्न उभा राहतो. यावर उपाय शोधायला हवा. ■

**संगीता वाईकर**/९९२२५०४७९४

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी**. ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे**.● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi -** Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# वेतनासाठी १४.५७ कोटींचा निधी वितरित

## तब्बल ९ महिन्यांच्या प्रतीक्षेनंतर जलजीवन मिशन कर्मचाऱ्यांना दिलासा

- चार महिन्यांचे वेतन मिळणार
- उर्वरित पाच महिन्यांचा निधी लवकर देणार
- मुंबईतील आंदोलन स्थगित

**आंदोलन तात्पुरते स्थगित**

जल जीवन मिशनच्या कर्मचाऱ्यांच्या मागण्यांना शासनाकडून सकारात्मक प्रतिसाद मिळाल्याने मुंबईत ३ ऑगस्टपासून होणारे आंदोलन स्थगित केले आहे. मात्र, उर्वरित ५ महिन्यांचे वेतन आणि स्वच्छ भारत मिशन कर्मचाऱ्यांची थकबाकी तातडीने अदा करण्याची मागणी कायम आहे. **- रमाकांत गायकवाड, अध्यक्ष राज्य कृती समिती.**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ ऑगस्ट -**

राज्यातील जलजीवन मिशनमध्ये कार्यरत कर्मचाऱ्यांच्या तब्बल नऊ महिन्यांपासून रखडलेल्या वेतनाचा प्रश्न अखेर मार्गी लागत आहे. कर्मचाऱ्यांच्या वेतनासाठी राज्य शासनाने १४ कोटी ५७ लाखांचा निधी जिल्हास्तरावर वितरित केला आहे. त्यामुळे चार महिन्यांचे थकीत वेतन अदा करता येणार आहे. या घडामोडीनंतर ३ ऑगस्टपासून मुंबईत होणारे आंदोलनही स्थगित केले आहे.



**उर्वरित वेतनही लवकर द्या**

सध्या चार महिन्यांच्या वेतनाचा प्रश्न सुटला असला तरी उर्वरित पाच महिन्यांचे वेतनही लवकरात लवकर मिळणे आवश्यक आहे. मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री शिंदे आणि मंत्री गुलाबराव पाटील यांनी सकारात्मक भूमिका घेतल्याबद्दल आभार. **- सचिन जाधव, कार्याध्यक्ष**

संबंधित कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित वेतनाच्या प्रश्नावर राज्याचे मुख्य सचिव राजेश अग्रवाल, मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव श्रीकर परदेशी तसेच पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री गुलाबराव पाटील यांच्या स्तरावर बैठका झाल्या. बैठकीत जिल्हास्तरीय जलजीवन मिशन, स्वच्छ भारत मिशन तसेच तालुकास्तरील बीआरसी, सीआरसी आणि वॉश प्रकल्पातील कर्मचाऱ्यांच्या वेतनाबाबत सकारात्मक निर्णय झाला. राज्य कृती समितीचे अध्यक्ष रमाकांत गायकवाड, कार्याध्यक्ष सचिन जाधव, उपाध्यक्ष ऋषीकेश शिलवंत आणि बंडू हिवरे यांनी यासाठी पाठपुरावा केला. आमदार सुधीर मुनगंटीवार यांनीही शासनाकडे पुढाकार घेतला.

वितरित निधीपैकी जिल्हास्तरीय कर्मचाऱ्यांच्या वेतनासाठी २ कोटी ९२ लाख, बीआरसी- सीआरसी कर्मचाऱ्यांसाठी ७ कोटी २६ लाख आणि वॉश प्रकल्पातील अभियंते व डेटा एंट्री ऑपरेटर यांच्या वेतनासाठी ४ कोटी ३८ लाख इतका निधी उपलब्ध केला आहे. प्रकल्प संचालक डी. गंगाथरण यांच्या पुढाकारामुळे निधी तातडीने जिल्हास्तरावर वर्ग केला. दरम्यान, स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) अंतर्गत कर्मचाऱ्यांच्या वेतनासाठी राज्याच्या हिस्स्यातील निधीही उपलब्ध झाला आहे. तो याच आठवड्यात जिल्ह्यांना वितरित करणार असल्याचे सांगितले आहे. केंद्र शासनाकडेही निधीची मागणी केली असून उर्वरित आर्थिक तरतुदीबाबत पाठपुरावा सुरू आहे.

# 'घरकुल'च्या कामात दिरंगाई नको

## मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन यांचा अधिकाऱ्यांना स्पष्ट इशारा

- आठवड्याला प्रगतीचा लेखाजोखा
- प्रलंबित प्रकरणे तातडीने निकाली काढण्याचे निर्देश

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ ऑगस्ट -**

जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, सोलापूर येथे मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन यांच्या अध्यक्षतेखाली विविध घरकुल योजनांचा सविस्तर आढावा घेण्यात आला. यावेळी शासकीय विविध घरकुल योजनांच्या कामात दिरंगाई चालणार नाही, असा स्पष्ट इशारा जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन यांनी अधिकाऱ्यांना दिला.

बैठकीत प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) टप्पा-१ व टप्पा-२, आवास प्लस सर्वेक्षण, रमाई आवास योजना, शबरी आवास योजना, यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजना, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर घरकुल योजना तसेच मोदी आवास योजना ग्रामीण यांच्या तालुकानिहाय प्रगतीचा बारकाईने




आढावा घेण्यात आला. प्रलंबित प्रकरणे, मंजुरी, हप्ते वितरण, अपूर्ण घरकुले तसेच लाभार्थ्यांच्या अडचणींची सखोल चर्चा झाली. प्रत्येक प्रलंबित प्रकरण तातडीने निकाली काढून निर्धारित उद्दिष्टे वेळेत पूर्ण करण्याचे निर्देश मुख्य जैन यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले.

घरकुल योजनांचा आढावा दर आठवड्याला घेणार असून, प्रत्येक तालुक्याच्या कामगिरीवर सातत्याने लक्ष ठेवणार आहे. उद्दिष्टपूर्तीत हलगर्जीपणा करणाऱ्या अधिकाऱ्यांची जबाबदारी निश्चित होईल. तसेच लाभार्थ्यांना वेळेत घरकुलाचा लाभ मिळण्यासाठी सर्व यंत्रणांनी समन्वयाने कार्य करावे, असेही निर्देश दिले. यावेळी प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, चंद्रशेखर जगताप तसेच जिल्ह्यातील सर्व गटविकास अधिकारी उपस्थित होते.

**जाहीर नोटीस**

विशेष दि. दावा २२९/२३
नि. ८६/८७

सदर प्रकरणातील वादी क्र.१ सौ. वंदना बाळू कांबळे (लग्नानंतरचे नाव) छाया बाळू शिंदे (लग्नापूर्वीचे नाव) वय : ५२ वर्षे, धंदा : शेती व घरकाम रा.यशोकिरण को.ऑ.हो.सो.ए. रूम.नं.ए/२०५, लोखंडीपाडा, पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड यांच्याद्वारे या जाहीर नोटीसीद्वारे सदर प्रकरणातील प्रतिवादी नं. ४ मनिषा हनुमंत शिंदे, वय : ३८ वर्षे, धंदा : शेती, रा. झाडबुके मैदान, बार्शी, ता.बार्शी, जि.सोलापूर, प्रतिवादी नं. ५ अनुराधा हनुमंत शिंदे, वय : ३६ वर्षे, धंदा : शेती, रा. झाडबुके मैदान, बार्शी, ता.बार्शी, जि.सोलापूर यांना कळविण्यात येते की,

आमचे अशिलाचे स्पे.सिव्हील सुट नं. २२९/२०२३ हे प्रकरण माढा येथील सिव्हील जज्ज सिनियर डिव्हीजन यांचे कोर्टात दाखल करण्यात आले आहे. सदर प्रकरणातील प्रतिवादी नं.४ व ५ यांची कोर्टाद्वारे पाठविण्यात आलेले नोटीस/समन्स प्रतिवादी नं.१ यांना मिळाल्यास सदरील प्रतिवादी नं. ४ व ५ यांचा पत्ता देण्यास उडवाउडवीची उत्तरे दिली व टाळाटाळ केली. या प्रकरणाची पुढील सुनावणी दि. १०/०९/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता निश्चित करण्यात आली आहे.

तरी आपणास याद्वारे कळविण्यात येते की, आपण वरील नमूद केलेल्या दिवशी व वेळेस स्वतः अथवा कायदेशीर वकिलामार्फत संबंधित न्यायालयायात हजर राहावे. जर आपण दिलेल्या मुदतीत न्यायालयात हजर राहिला नाहीत किंवा आपले म्हणणे मांडले नाही तर आपल्या गैरहजेरीत प्रकरणाची सुनावणी पूर्ण करून योग्य तो एकतर्फी निर्णय दिला जाईल याची नोंद घ्यावी.

हे जाहीर नोटीस दिली तारीख : २८/०७/२०२६.

# सोपल बंगला स्फोटक फेकणेप्रकरणी पाच आरोपींचा अटकपूर्व जामीन नामंजूर

## सत्र न्यायालयाचा महत्त्वपूर्ण आदेश

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ३ ऑगस्ट -**

आमदार दिलीप सोपल यांच्या बंगल्यावर विधानपरिषद निवडणूक निकालाच्या रात्री जळते फटाके फेकून आग लावण्याचा प्रयत्न केल्याप्रकरणी बार्शी अतिरिक्त सत्र न्यायाधीश आर. एस. रोटे यांनी आणखी पाच आरोपींचे अटकपुर्व जामीन नामंजूर केले आहेत. नाथा मोहिते, योगेश लोंढे, आशिष शिंदे, राज देवकुळे आणि कुणाल खांडारे अशी त्या आरोपींची नावे आहेत.

बार्शी शहर पोलिस ठाण्यात दाखल गुन्ह्यानूसार आरोपींनी जळते रॉकेट फटाके वापरुन फिर्यादीच्या घरासह परिसरातील झाडांना आग लावण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप आहे. या घटनेत सोलर पॅनेलसह झाडांचे सुमारे १.५० लाख रुपयांचे नुकसान झाल्याचा दावा तपास यंत्रणेने न्यायालयासमोर मांडला. सरकार पक्षाने आरोपींना अटकपूर्व जामीन दिल्यास ते पुराव्यांमध्ये छेडछाड करु शकतात, साक्षीदारांवर दबाव आणू शकतात आणि तपासात अडथळा निर्माण करु शकतात, असा युक्तिवाद केला. न्यायालयाने पोलिसांचा अहवाल, पंचनामा आणि अग्निशमन विभागाचा अहवाल विचारात घेतला. घटनास्थळावरुन वायरने बांधलेले २५ व ३० रॉकेट फटाक्यांचे संच जप्त झाल्याची नोंद आदेशात केली आहे. निवडणुकीतील विजय साजरा करण्यासाठी एवढ्या प्रमाणात रॉकेट फटाक्यांचा वापर होत नसल्याचे निरीक्षण नोंदवत न्यायालयाने या कृत्यामागे वेगळा हेतू असल्याचे प्रथमदर्शनी नमूद केले आहे.

तपास अद्याप अपूर्ण असून आरोपींची कोठडीतील चौकशी आवश्यक आहे. तसेच काही आरोपींविरुद्ध पूर्वीचे गुन्हे नोंद असल्याची बाबही न्यायालयाच्या निदर्शनास आली. या सर्व बाबींचा विचार करुन अटकपूर्व जामीन मंजूर करणे योग्य ठरणार नाही, असा निष्कर्ष नोंदवत न्यायालयाने अटकपूर्व जामीन अर्ज फेटाळले. याच गुन्ह्यात यापूर्वी अटक केलेले प्रशांत रणझुंजारे (रा. राऊत चाळ, बार्शी), निखिल रणझुंजारे (रा. राऊत चाळ, बार्शी) आणि नागेश मोहिते (रा. राऊत चाळ, बार्शी) यांचे नियमित जामीन अर्जही न्यायालयाने फ ेटाळले होते. सुनावणीदरम्यान आरोपींतर्फे ॲड. राज पाटील व ॲड. प्रवीण करंजकर, सरकार पक्षातर्फे अतिरिक्त सरकारी अभियोक्ता ॲड. दिनेश देशमुख, तर फिर्यादीच्यावतीने ॲड. विकास जाधव व ॲड. प्रशांत घोडके यांनी काम पाहिले.

**जाहीर समन्स प्रसिद्धीकरण**

क्रमांक जमा-२/१५५/एसआर/२३/२०२६

**बार्शी येथील मे. तहसिलदार सो. यांचे न्यायालयात**

१) **लीना अभिजित अन्नदाते,**
रा. स्टेशन रोड, आनंद हॉस्पिटल,
वैजापूर, संभाजीनगर - ४२३७०१ ------- अर्जदार

**विरुद्ध**

**१) सजाबाई आत्माराम कदम,**
**२) हिरकण धोंडीराम तानवडे,**
रा. नारी ता. बार्शी जि. सोलापूर ------- सामनेवाला

ज्याअर्थी,

सदरचा अर्ज यातील अर्जदार यांचा मौजे नारी ता. बार्शी येथील जमीन गट नं. ३२९ चे ७/१२ उताऱ्यावरील इतर अधिकारातील सजाबाई आत्माराम कदम व हिरकण धोंडीराम तानवडे यांची नावे कमी करणेबाबतचा अर्ज इकडील कार्यालयास प्राप्त झालेला आहे. सदर अर्जाचे कामी तुम्ही हजर राहावे म्हणून तुम्हांला वर अर्जात नमूद केलेल्या अर्जदार यास माहित असलेल्या वरील पत्त्यावर मे. न्यायालयामार्फत यापूर्वी नोटीस पाठविले असता तुम्ही सदर अर्जामध्ये नमूद पत्त्यावर राहता किंवा कसे याबाबत कोणताही खुलासा मिळत नाही व तुम्ही सध्या कुठे राहता याबाबत सखोल चौकशी केली असता तुमचा पत्ता मिळून येत नाही त्यामुळे तुमचे विरुद्धचे सदर अर्जाच्या नोटीसीची बजावणी होत नाही.

त्याअर्थी,

तुम्ही सामनेवाला यांनी सदर अर्जाचे कामी सदर जाहीर समन्स प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसाचे आत अगर सदर प्रकरणाची पुढील नेमली ता. ०३/०९/२०२६ रोजी दुपारी ३.०० वाजता मे. कोर्टात या अर्जाचे कामी स्वतः अगर कुलमुखत्यार यांचे मार्फत विधिज्ञामार्फत हजर राहून व आपला पत्ता मेमो दाखल करुन तुमचे म्हणणे याकामी दाखल करावे. तुम्ही सदर अर्जाचे कामी नेमलेले तारखेस हजर न राहिल्यास अगर तुमचे म्हणणे दाखल न केल्यास तुमचे काही म्हणणे नाही, असे समजून मे. कोर्टाचे तुमचे विरुद्ध एकतर्फा आदेश होतील. मागाहून तक्रार चालणार नाही.

कळावे हे जाहीर समन्स प्रसिद्धीकरण मे. कोर्टाचे सही शिक्क्यानिशी दिले.

दिनांक :- ०३/०८/२०२६ (शिक्का)

**सही/-**
**(एफ.आर.शेख)**
**तहसिलदार बार्शी**

**जाहिर प्रसिद्धीकरण**

रस्ता रिव्हीजन अर्ज नं. १७/२०२३
संगणक क्र. ४९१/२०२३

**सोलापूर येथील मे. उपविभागीय अधिकारी सोलापूर क्र. १ यांचे कोर्टात**

रामकृष्ण भगवान टोणगे ---------- अप्पेलंट / वादी
विरुद्ध
जयवंत रंगनाथ शिंगण, वगैरे ---------- रिस्पॉंडंट / प्रतिवादी

४) संगिता कैलास वर्मा, रा. वर्मा ज्वेलर्स, उरूळी कांचन, पुणे, जि. पुणे
५) धनाजी महादेव गवळी
६) श्रीकृष्ण महादेव गवळी,
नं. ५ व ६ रा. कोरफळे, ता. बार्शी, जि. सोलापूर **-- प्रतिवादी**
७) अजित प्रकाश कुलकर्णी,
८) दिपक प्रकाश कुलकर्णी,
९) रविंद्र प्रकाश कुलकर्णी,
१०) किरण प्रकाश कुलकर्णी,
नं. ७ ते १० रा. यश लॉन्सच्या पाठीमागे, सुभाष नगर, बार्शी

**यांना जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की.**

ज्या अर्थी, अपेलंट / वादी रामकृष्ण भगवान टोणगे यांनी सोलापूर येथील मे. उपविभागीय अधिकारी सोलापूर क्र. १ यांचे कोर्टात मा. तहसिलदार साहेब, बार्शी यांनी क्र.जमा-२/रस्ता/कलम५/एस.आर./१२/२२ यांचा संगणक क्र. १८९/२०२१ कामी दि. १३/०८/२०२३ रोजी दिलेला निकाल व दि. १७/११/२०२३ रोजी दिलेला दुरुस्ती आदेश रद्द (Set Aside) करण्यात यावा याकरीता रस्ता रिव्हीजन अपील नं. १७/२०२३ हे अपील दाखल केलेले आहे, त्यामध्ये तुम्ही प्रतिवादी / रिस्पॉंडंट नं. **४) संगिता कैलास वर्मा ५) धनाजी महादेव गवळी, ६) श्रीकृष्ण महादेव गवळी, ७) अजित प्रकाश कुलकर्णी, ८) दिपक प्रकाश कुलकर्णी, ९) रविंद्र प्रकाश कुलकर्णी, १०) किरण प्रकाश कुलकर्णी** म्हणून सामील असून तुम्हास अर्जातील पत्त्यावर समन्स पाठविले असता तुम्हास अर्जातील पत्त्यावर समन्स बजावणी झाली नाही, तुमचा निश्चित ठावठिकाणा मिळून येत नाही असा रिपोर्ट आल्यावरून तुम्हास या जाहीर प्रसिद्धीकरण नोटीस द्वारे कळविणेत येते की, तुम्ही नियुक्त दि. ०२/०९/२०२६ रोजी अथवा हे जाहीर समन्स प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याचे आत वकीलामार्फत अगर स्वतः मे. कोर्टात हजर होऊन म्हणणे मांडावे. सदर प्रमाणे तुम्ही म्हणणे न मांडलेस मे. कोर्ट तुमचे विरूध्द पुढील एकतर्फा चौकशीचा हुकूम करतील व प्रकरण निकाली करतील याची नोंद घ्यावी.

हे प्रसिद्धीकरण माझ्या आदेशाने दिले ता. ३/८/२०२६.

**सही/-** **कनिष्ठ लिपीक** (शिक्का) **सही/-** **उपविभागीय अधिकारी सोलापूर क्र. १ सोलापूर**

**खरेदीपूर्व जाहीर नोटीस**

तमाम जनतेस विशेषतः मौजे खांडवी तालुका बार्शी येथील व आसपासचे परिसरातील जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

डि. सोलापूर सब डि. व ता. बार्शी पैकी मौजे खांडवी ग्रामपंचायत हद्दीतील मिळकत

अ) जमिन गट नं. ६६१ याचे एकूण क्षेत्र हे. ००-२४ आर + पो.ख. हे. ००-०१ आर, असे एकूण क्षेत्र हे. ००-२५ आर. याचा आकार रु. ००-७६ पैसे यासी चतुरसिमा पुर्वेस- परमेश्वर आप्पासाहेब विधाते यांची जमीन, दक्षिणेस- ओढा, पश्चिमेस- सदर गटापैकी उर्वरीत जमीन, व उत्तरेस- राहुल पोपट बारंगुळे यांची जमीन, येणेप्रमाणे मिळकत आतील झाड, झुडुप वगैरे सर्व तदंगभुत वस्तुसह.

ब) जमिन गट नं. ६६२याचे एकूण क्षेत्र हे. ००-२३ आर + पो.ख. हे. ००-०२ आर, असे एकूण क्षेत्र हे. ००-२५ आर, याचा आकार रु. ००-७४ पैसे यासी चतुरसिमा पुर्वेस- सदर गटापैकी उर्वरीत जमीन, दक्षिणेस- ओढा, पश्चिमेस- परमेश्वर आप्पासाहेब विधाते यांची जमीन, व उत्तरेस- राहुल पोपट बारंगुळे यांची जमीन, येणेप्रमाणे मिळकत आतील झाड, झुडुप वगैरे सर्व तदंगभुत वस्तुसह.

येणेप्रमाणे वरील वर्णन केलेल्या मिळकती ह्या रामदास मारुती रोकडे, रा. खांडवी, ता. बार्शी, जि. सोलापूर यांचे खरेदी मालकीचे असून प्रत्यक्ष कब्जे वहिवाटीची असून ७/१२ हक्कपत्रकी त्यांचे नावे दाखल असून त्यांनी सदर मिळकत त्यांचे कौटुंबिक व कायदेशीर गरजेपोटी आमचे पक्षकारास कायमखुष खरेदी देण्याचा ठराव करून इसारा दाखल रक्कम घेतलेली आहे. खरेदी देणार यांनी सदर मिळकत हि निर्वेध, निजोखमी असल्याची खात्री आमचे पक्षकारास दिलेली आहे. तसेच त्यांनी सदरची मिळकत हि निर्वेध निजोखमी खरेदी देण्याचे मान्य केलेले आहे.

याही उपर सदर मिळतीबाबत कोणाचे कसलेही कायदेशीर अधिकार, हक्क, साठेकरार, खरेदीखत, भाडेपट्टा करार, कुळ वहिवाट, वहिवाटीचे अधिकार मालकी हक्क, वारसा, गहाणपट्टा, बटईपत्र, पोटगी, चोळीबांगडी अथवा विकसन करार इत्यादी वा अन्य कोणतेही स्वरूपाचे कायदेशीर हक्कअधिकार असल्यास त्यांनी खालील नमूद पत्त्यावर योग्य त्या कागदपत्रानिंशी व पुराव्यासह खालील नमूद पत्त्यावर हे जाहीर प्रसिद्धीकरण प्रसिद्ध झाल्यापासून सात (०७) दिवसात लेखी हरकत कळवावी. अन्यथा वरील नमूद मुदतीत कोणाचीही लेखी हरकत न आलेस आमचे पक्षकार हे सदर मिळकती ह्या निर्वेध निजोखमी असल्याचे प्रामाणिकपणे गृहित धरून खरेदी देणार यांचे बरोबर ठरलेल्या अटी व शर्ती प्रमाणे खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणाचीही कसलीही तक्रार चालणार नाही. कोणाचीही फसगत होऊ नये म्हणून ही जाहीर नोटीस दिली असे.

ता. ०३/०८/२०२६

**सही/-**
**ॲड. जगदीश भालचंद्र साखरे,**
**एलएल.बी**
**जिल्हा व सत्र न्यायालय बार्शी,**
**मो.नं. ९८६०२३८५१६**
**खरेदी घेणार तर्फे ॲडव्होकेट**

## दुचाकी घसरून जखमी झालेल्या तरुणाचा मृत्यू

**सोलापूर :** दुचाकीच्या पाठीमागे बसून प्रवास करीत असताना खाली कोसळून जखमी झालेला जयंत जावळे (वय २६ रा.समाधान नगर अक्कलकोट रोड सोलापूर) हा तरुण सोलापुरातील एका खाजगी रुग्णालयात उपचार घेताना आज सोमवारी सकाळच्या सुमारास मयत झाला. जयंत जावळे हा ९ जुलै रोजी रात्रीच्या सुमारास शहरातील जोशी गल्ली येथून घराकडे दुचाकीच्या पाठीम ागे बसून निघाला होता. वाटेत दुचाकी घसरल्याने तो खाली कोसळून गंभीर जखमी झाला होता. तो उपचारा दरम्यान सोमवारी सकाळी मयत झाला.

-------------------

## मेव्हण्याकडून तलवारीने हल्ला; भाऊजी जखमी

**बार्शी :** घरगुती भांडणाच्या कारणावरून मेव्हण्याणे तलवारीने हल्ला करून भाऊजीला जखमी केल्याची घटना सात रस्ता परिसरातील हूमा मेडिकल च्या पाठीमागे आज सोमवारी सायंकाळी सहा वाजता घडली. सिद्दिक सलीम शेख (वय ४८, रा. इमाम वाडा, लष्कर सोलापूर) असे जखमी इसमाचे नाव आहे. मेव्हना फैजू बखत्यारी, व इतर तिघांनी तलवार, पाईप व लाथा बुक्क्यांनी मारहाण केली. या घटनेचा तपास पोलिस करीत आहेत.

**PUBLIC NOTICE**

I Basawaraj Jagannath Ale submitted that my name Basavraj Jagannath Ale mentioned in Pan Card and Aadhar Card as well as my name Basawaraj Jagannath Ale mentioned in passing certificate of 10th Class and 12 th Class. So Basawaraj Jagannath Ale and Basavraj Jagannath Ale is one person and this person is me.

If anyone objection please contact to this below number my Adv. Dhananjay Dhas : 9890472096

This Public Notice dated 03/08/2026

Shri Siddheshwar Shikshan Mandal's

**COLLEGE OF ARCHITECTURE**

**Diploma in Architecture DTE CODE : AR6535**

Ujani Colony, Kumtha Naka, Solapur- 413003, Ph. No. 0217-2603950, 9422677460

E-mail : diploma.ssm@gmail.com | Website : www.coasolapur.in

**ADMISSION TO FIRST YEAR - 2026-27**
**DIPLOMA IN ARCHITECTURE**
**Probable Vacancy Against CAP Round**

Applications are invited for admissions to **First Year of 3 years Diploma in Architecture course** for the **Academic Year 2026-27** from the eligible candidates for probable vacancy against CAP round, if any.

All desirous and eligible candidates shall submit their application in prescribed format, available on website, along with all necessary documents in the College Office, latest by date 9th **August, 2026.**

For the detailed schedule and updates, if any, visit college Website from time to time.

**Contact Numbers : 9604526888, 9403729529.**

**PRINCIPAL** **SECRETARY**

Soham Ads

**जामश्री रिअलटी लिमिटेड**

सीआयएन :L17111PN1907PLC000258

नोंदणीकृत कार्यालय : फतेहचंद दमाणी नगर, स्टेशन रोड, सोलापूर, महाराष्ट्र - ४१३ ००१

दूरध्वनी : ०२२-४५७८२५७९ इमेल आयडी : jammill1907@gmail.com वेबसाईट : www.jamshri.in

**कंपनीच्या भागधारकांच्या लक्षवेधासाठी सूचना**
**११८ व्या वार्षिक सर्वसाधारण सभा आणि ई-व्होटिंग बाबत माहिती**

जामश्री रिअलटी लिमिटेड (कंपनी) च्या ११८ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची (एजीएम) सूचना देण्यात येत आहे. ही सभा मंगळवार, २५ ऑगस्ट २०२६ रोजी दुपारी १२.०० वाजता व्हिडिओ कॉन्फरन्सिंग (वीसी) / इतर ऑडिओ व्हिज्युअल माध्यमांद्वारे (ओएवीएम) आयोजित केली आहे. ही सभा कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालय (एमसीए) आणि भारतीय प्रतिभूती आणि विनिमय मंडळा द्वारे जारी केलेल्या लागू परिपत्रकांचे पालन करून घेतली जाईल. वित्तीय वर्ष २०२५-२६ चे वित्तीय विवरणपत्रक, संचालक मंडळाचा अहवाल, लेखापरीक्षकांचा अहवाल आणि त्यासोबत जोडलेली इतर आवश्यक कागदपत्रे ३ ऑगस्ट २०२६ रोजी कंपनीच्या भागधारकांना इलेक्ट्रॉनिक पद्धतीने पाठवण्यात आली आहेत. याव्यतिरिक्त,ज्या भागधारकांच्या ईमेल पत्त्यांची कंपनी/ पूर्वा शेअर रजिस्ट्री / डिपॉझिटरीजकडे नोंदणी नाहीत, त्यांना आर्थिक वर्ष २०२५-२६चा वार्षिक अहवाल उपलब्ध असलेली अचूक वेबलिंकसह एक पत्र पाठवले जात आहे. एजीएम ची सूचना आणि वित्तीय वर्ष २०२५-२६ चा वार्षिक अहवाल कंपनीच्या www.jamshri.in या वेबसाइटवर, बीएसई च्या www.bseindia.com या वेबसाइट वर आणि पूर्वा शेअर रजिस्ट्री च्या https://evoting.purvashare.comया वेबसाइटवर देखील उपलब्ध आहे.

ज्या सभासदांकडे, कट-ऑफ डेट म्हणजे दि. १८ ऑगस्ट २०२६ रोजी भौतिक/डिमटेरियलाइझ्ड स्वरुपात शेअर्स असतील, त्यांना त्यांचे मत पूर्वा शेअर रजिस्ट्रा यांच्या इलेक्टॉनिक पद्धती द्वारे इलेक्टॉनिक मतदान करता येईल.

सभासदाना या द्वारे कळविण्यात येते की :

१) एजीएमच्या सुचनेत नमुद केल्याप्रमाणे सर्व कामकाज रिमोट ई- व्होटिंग किंवा ई - व्होटिंग द्वारे हि एजीएम मध्ये मतदान करता येईल.

२) रिमोट ई-व्होटिंग सुविधा शनिवार, २२ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी ९.०० वाजता (भाप्रवे) सुरू होईल आणि सोमवार, २४ ऑगस्ट २०२६ रोजी सायंकाळी ५.०० वाजता (भाप्रवे) संपेल. या कालावधीत, भागधारक खाली दिलेल्या लॉगिन पद्धती नुसार लॉग इन करून रिमोट पद्धतीने त्यांचे मतदान करू शकतात. त्यानंतर मतदानासाठी पूर्वा शेअर रजिस्ट्रीद्वारे रिमोट ई-व्होटिंग बंद केले जाईल.

३) एकदा सदस्याने ठरावावर मतदान केले की, सदस्य नंतर त्यात बदल करू शकत नाही.

४) ज्या शेअरधारकांनी प्रत्यक्ष स्वरूपात शेअर्स धारण केले आहेत आणि ज्यांनी कंपनीकडे त्यांचे ईमेल पत्ते/केवायसी तपशील अद्यावतीकरण केलेले नाहीत त्यांना विनंती आहे की त्यांनी त्यांचे ईमेल पत्ते/केवायसी फॉर्म आयएसआर -१ आणि संबंधित फॉर्म पूर्वा शेअरजिस्ट्री (इंडिया) प्रायव्हेट लिमिटेड, रजिस्ट्रार आणि शेअर ट्रान्सफर एजंट्स, युनिट क्रमांक ९, शिव शक्ती इंडस्ट्रीज इस्टेट, जे. आर. बोरिचा मार्ग, लोअर परळ (पूर्व), मुंबई-४०००११ या पत्त्यावर पाठवून अद्यवत करावेत. डिमटेरियलाइज्ड पद्धतीने शेअर्स धारण करणाऱ्या शेअरधारकांना विनंती आहे की त्यांनी त्यांचे ईमेल पत्ते/केवायसी संबंधित डिपॉझिटरी सहभागींकडे नोंदणी/ अद्यवत करावेत.

५) एजीएम दरम्यान ई-व्होटिंगद्वारे मतदान करण्याची सुविधा उपलब्ध करून दिली आहे आणि व्हीसी सुविधेद्वारे सभेत उपस्थित असलेले सदस्य, ज्यांनी रिमोट ई-व्होटिंगद्वारे ठरावावर मतदान केलेले नाही आणि अन्यथा तसे करण्यास मनाई केलेली नाही, ते एजीएममध्ये मतदान करण्यास पात्र असतील. एजीएमपूर्वी रिमोट ई-व्होटिंगद्वारे मतदान केलेले भागधारक देखील एजीएममध्ये उपस्थित राहू शकतात परंतु त्यांना पुन्हा मतदान करण्याचा अधिकार राहणार नाही.

६) डिमटेरियलाइझ्ड आणि भौतिक स्वरूपात शेअर्स असलेल्या भागधारकांसाठी तसेच ज्यांनी आपल्या ईमेल पत्त्याची नोंदणी केलेली नाही अशा भागधारकांसाठी रिमोटली (रिमोट ई-व्होटिंग) सह मतदानाच्या पद्धतीची माहिती आणि सूचना एजीएमच्या सूचनेत देण्यात आलेल्या आहेत. सूचनेच्या प्रेषणानंतर जो कोणी कंपनीचा सदस्य बनेल आणि कट-ऑफ डेट म्हणजे दि. १८ ऑगस्ट २०२६ रोजी ज्याच्याकडे शेअर्स असतील, तो रिमोट ई-व्होटिंगचा अधिकार वापरू शकतो. याबाबत सविस्तर माहिती मिळवण्यासाठी evoting@purvashare.com वर विनंती पाठवता येईल. युझर आयडी आणि पासवर्ड मिळवण्याची तपशीलवार प्रक्रिया सभेच्या सूचनेत दिली आहे, जी कंपनीच्या वेबसाइटवर आणि पूर्वाच्या https://evoting.purvashare.com या वेबसाइटवर उपलब्ध आहे.

७) पूर्वा ई-व्होटिंग प्रणालीद्वारे एजीएमला उपस्थित राहणे आणि ई-व्होटिंग करण्याबाबत शंका किंवा समस्या असल्यास, तुम्ही evoting@purvashare.com वर ईमेल लिहू शकता किंवा ०२२-४९६१४१३२ आणि ०२२- ४९७००१३८ वर संपर्क साधू शकता. इलेक्ट्रॉनिक माध्यमांद्वारे मतदानाच्या सुविधेशी संबंधित सर्व तक्रारी मीस. दिपाली धुरी, अनुपालन अधिकारी, पूर्वा शेअर रजिस्ट्री (इंडिया) प्रायव्हेट लिमिटेड, युनिट नंबर ९, शिवशक्ती इंडस्ट्रियल इस्टेट, जे. आर. बोरीचा मार्ग, लोअर परळ (पूर्व), मुंबई - ४०००११ यांच्याकडे पाठवल्या जाऊ शकतात किंवा evoting@purvashare.com वर ईमेल पाठवला जाऊ शकतो किंवा ०२२-४९६१४१३२ आणि०२२-३५२२००५६ वर संपर्क साधला जाऊ शकतो.

सभासदांची नोंदवही आणि कंपनीच्या समभागांच्या संबंधातील भाग हस्तांतरण पुस्तके दि.१९/०८/२०२६ ते २५/०८/२०२६ (दोन्ही दिवस समाविष्ट) पर्यंत बंद राहतील.

तारीख : ०४.०८.२०२६
ठिकाण : सोलापूर

जामश्री रिअलटी लिमिटेड करिता
सही/ -
राजेश दमानी
संयुक्त व्यवस्थापकीय सहसंचालक

**PRECISION CAMSHAFTS LIMITED**

CIN: L24231PN1992PLC067126
Regd. Office: D-5, Chincholi MIDC, Solapur - 413255, Maharashtra, India
Phone: +91 9168646536/37, Fax: +91 0217 2357645
Email-cs@pclindia.in, Website: www.pclindia.in

**NOTICE TO SHAREHOLDERS**

**For Transfer of Shares to Investor Education and Protection Fund (As per Companies Act, 2013 and rules made thereunder)**

Notice is given to the shareholders of the Company that pursuant to Rule 6 of the Investor Education and Protection Fund (IEPF) Authority ( Accounting, Audit, Transfer and Refund) Rules 2016 notified by Ministry of Corporate Affairs which came into effect on September 7, 2016 and the said Rules amended as Investor Education and Protection Fund Authority (Accounting, Audit, Transfer and Refund) Amendment Rules 2017 effective from February 28, 2017 read with General Circular 12/2017 (Transfer of shares to IEPF Authority) issued on October 16, 2017.

Adhering to the requirements set out in the Rules, notice is sent to the concerned shareholders whose shares are liable to be transferred to the said account for taking appropriate actions. The Company has uploaded complete details of shareholders including their names and folio number on the website of the Company at www.pclindia.in. The shareholders are requested to verify the details of unclaimed dividend and the shares liable to transferred to IEPF.

Accordingly the due date of claiming such unpaid/unclaimed dividend is **November 01, 2026.** In case valid claim in respect of unclaimed dividend are not received from the concerned shareholder the Company shall order to comply with the requirement of rules transfer the equity shares to IEPF Account as per the procedures stipulated in the Rules.

However, both unclaimed dividend and shares transferred to Demat Account of the IEPF authority can be claimed back by making an application in **Form IEPF-5** online at the website of IEPF authority at www.iepf.com.

For any clarification on this matter shareholders may contact Company's Registrar and Transfer Agent M/s MUFG Intime India Private Limited Block No. 202, 2nd Floor, Akshay Complex, Near Ganesh Temple, Off Dhole Patil Road, Pune - 411, 001, Maharashtra, India Tel No.: +91 20 26160084, 26161629, Fax: +91 20 26163503, E-mail: rnt.helpdesk@in.mpms.mufg.com

**Place : Pune**
**Date : 03rd August 2026**

For **Precision Camshafts Limited**
Sd/-
**Harshal J. Kher**
Company Secretary and Compliance Officer
(Nodal Officer for IEPF Activity)

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# ग्लासगोला निरोप, अहमदाबादकडे सूत्रे

**ग्लासगो, ३ ऑगस्ट**

अहमदाबादकडे यजमानपदाची सूत्रे सोपवून ग्लासगोने राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेचा निरोप घेतला. 'ओव्हीओ हायड्रो' येथे अतिशय समर्पक अशा दिमाखदार समारोप सोहळ्यात स्कॉटलंडचे उत्कृष्ट संगीत, संस्कृती आणि वारसा यांचा भारताच्या समृद्ध परंपरांशी सुरेख संगम साधला गेला होता. यातून एकता, मैत्री आणि आदरातिथ्य यांसारखी सामायिक मूल्ये अधोरेखित झाली तसेच राष्ट्रकुलच्या मूळ भावनेचा सुरेख समन्वय साधला गेला.

ग्लासगोमधील या स्पर्धेची सांगता झाली, तरी आता राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेचा प्रवास भारताच्या दिशेने सुरू होत आहे. अहमदाबादकडे आता स्पर्धेचा ध्वज आणि जबाबदारी आली असून, २०३० मधील शताब्दी सोहळ्याच्या तयारीसाठी त्यांच्याकडे चार वर्षांचा कालावधी आहे. समारोप सोहळ्यातील आतषबाजीने ग्लासगो शहर व स्पर्धेच्या ठिकाणाजवळील आकाश उजळून निघाले आहे. स्थानिक रॉक बँड 'सिंपल माइंड्स'च्या संगीतमय कार्यक्रमात प्रेक्षक, स्वयंसेवक आणि खेळाडूही थिरकू लागले.




ओव्हो हायड्रो येथे २३ व्या राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेच्या समारोप समारंभात कलाकार सादरीकरण करत असताना, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे चित्र पडद्यावर प्रक्षेपित करण्यात आले. २०३० च्या राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धा अहमदाबाद येथे आयोजित करण्यात येणार आहे

**डयूक ऑफ एडिनबर्ग यांच्या हस्ते स्पर्धेची सांगता**

महामहिम प्रिन्स एडवर्ड, ड्यूक ऑफ एडिनबर्ग यांनी राष्ट्रकुल देशांमधील खेळाडूंना चार वर्षांनंतर अहमदाबाद येथे होणाऱ्या स्पर्धेच्या शताब्दी सोहळ्यासाठी पुन्हा एकदा एकत्र येण्याचे आवाहन केले.

**गुजरातला मानवंदना**

सितारवादक ऋषभ रिखीराम शर्मा आणि स्कॉटिश पाईपर रॉस एन्सली एका सांगीतिक सादरीकरणाने प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केले. यावेळी फटाक्यांच्या आतषबाजीने परिसर उजळून निघाला असून, २०३० च्या राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेचे यजमानपद भूषवणाऱ्या गुजरातला एक सुंदर मानवंदना दिली. (वृत्तसंस्था)

### नीरज चोप्राने पी. टी. उषा यांच्याकडे सोपविला राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेचा ध्वज



दोन वेळा ऑलिम्पिक पदक विजेता व राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेतील विजेता भालाफेकपटू नीरज चोप्रा याने राष्ट्रकुल स्पर्धेचा ध्वज भारतीय ऑलिम्पिक संघटनेच्या (आयओए) अध्यक्षा व माजी धावपटू पी. टी. उषा यांच्याकडे सोपविला. यावेळी गुजरातचे उपमुख्यमंत्री हर्ष संघवी उपस्थित होते. ■



ग्लासगो राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेच्या समारोप सोहळ्यादरम्यान कला सादर करताना गायक शंकर महादेवन, सिद्धार्थ महादेवन, शिवम महादेवन आणि सतारवादक ऋषभ रिखीराम शर्मा व भारतीय कलाकार

# राष्ट्रकुलचे स्वागत करण्यास भारत सज्ज

**ग्लासगो, ३ ऑगस्ट**

पहाटेचे तीन वाजले असताना हा सोहळा पाहणाऱ्या भारतीय प्रेक्षकांसाठी हा कार्यक्रम डोळ्यांचे पारणे फेडणारा ठरला. रंगीबेरंगी दृश्ये, झगमगते दिवे आणि आतषबाजीने संपूर्ण मंच उजळून निघाला आहे. शंकर महादेवन आणि त्यांच्या चमूने 'लहरा दो' आणि १९९० च्या दशकातील गाजलेले 'हिंदुस्तानी' यांसारखी लोकप्रिय गाणी सादर करून या सोहळ्याची रंगत अधिकच वाढवली आहे.

**गुजरातमध्ये आपले स्वागत**

'या-खेळा- प्रगती करा - एकरूप व्हा' या एका दृकश्राव्य सादरीकरणाद्वारे भारताच्या क्रीडा इतिहासाचा आढावा घेण्यात आला व त्याच वेळी 'अमदावाद २०३०' कडे पाहिले जात आहे. अहमदाबाद येथे २०३० मध्ये राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेची शताब्दी आवृत्ती आयोजित केली जाणार आहे. जेव्हा जग येथे येईल, तेव्हा अहमदाबाद केवळ त्यांचे स्वागतच करणार नाही, तर त्यांना आपलेसे करेल, असे या सादरीकरणातून जाहीर करण्यात आले.

**भारताकडे अधिकृत हस्तांतरण**

ग्रॅमी पुरस्कार विजेते गायक-संगीतकार शंकर महादेवन आणि माजी मिस वर्ल्ड मानुषी छिल्लर यांच्या नेतृत्वाखाली भारताचे राष्ट्रीय गीत 'वंदे मातरम' अत्यंत प्रभावीपणे सादर केले जात आहे. हे सादरीकरण 'वसुधैव कुटुंबकम्' या संकल्पनेचे दर्शन घडवते, ज्याचा अर्थ 'जग हे एक कुटुंब आहे' असा होतो.

देशातील विविध राज्यांचे प्रतिनिधित्व करणारे पारंपरिक नृत्य प्रकार, वेशभूषा आणि चैतन्यमय रंगांच्या माध्यमातून भारताच्या सांस्कृतिक विविधतेचेही जिवंत दर्शन घडविले. (वृत्तसंस्था)

### भारताच्या विविधतेचे आणि रंगांचे दर्शन

ग्लासगोमध्ये भारताचे वर्चस्व दिसून येत असताना, शंकर महादेवन 'ए वतन' हे देशभक्तीपर गीत सादर केले. त्यानंतर 'भाग मिल्खा भाग' हे गाणे सादर केले. हे गाणे 'फ्लाइंग शीख' म्हणून ओळखले जाणारे दिग्गज धावपटू मिल्खा सिंग यांच्यावरील चित्रपटातील आहे. मिल्खा सिंग यांनी राष्ट्रकुल व आशियाई क्रीडा स्पर्धांमध्ये सुवर्णपदके जिंकली होती. ■

# 'भाला एका सरळ रेषेत ठेव'

**नवी दिल्ली, ३ ऑगस्ट**

ऑलिम्पिक विजेत्या नीरज चोप्राने ऐनवेळी दिलेल्या एका साध्याशा सल्ल्यामुळे मला कारकिर्दीतील सर्वोत्तम फेक करणे शक्य झाले आणि मला सातव्या स्थानावरून झेप घेत कांस्यपदक जिंकता आले, असे भारताचा भालाफेकपटू यशवीर सिंग सोमवारी म्हणाला.

अंतिम फेरीच्या आधीच्या फेरीत, यशवीर ८१.३३ मीटरच्या सर्वोत्तम कामगिरीसह सातव्या स्थानावर होता, तर दक्षिण आफ्रिकेचा डौ स्मिथ ८२.८८ मीटरच्या कामगिरीसह तिसऱ्या स्थानावर होता.

मला प्रतिकूल परिस्थितीवर मात करायची होती. माझ्या अंतिम थ्रोपूर्वी नीरजने मला प्रोत्साहन दिले व पाठिंबा दिला. त्याने मला भाला एका सरळ रेषेत ठेवण्यास सांगितले व मला त्याचा फायदा झाला, असे यशवीर म्हणाला. राष्ट्रकुल स्पर्धेतून परतल्यावर दिल्लीच्या आंतरराष्ट्रीय विमानतळावर त्याचे जंगी स्वागत करण्यात आले होते.

ही माझ्या आयुष्यातील सर्वात मोठ्या स्पर्धांपैकी एक होती, त्यामुळे माझे एकमेव ध्येय १०० टक्के प्रयत्न करणे व काहीही बाकी न ठेवणे हे होते. मला तिथे माझी वैयक्तिक सर्वोत्तम कामगिरी करायची होती. मी ८५.४१ मीटरची वैयक्तिक सर्वोत्तम कामगिरी नोंदविली, याचा मला आनंद आहे व त्या कामगिरीसह कांस्यपदकही जिंकले, असे तो म्हणाला.

भाला फेकताना तो एका सरळ रेषेत (किंवा खांद्याच्या रेषेत) ठेवणे हे एक महत्त्वाचे तंत्र आहे; कारण यामुळे फेकणाऱ्या हातावरील ताण कमी होऊन भाला जास्तीत जास्त अंतरापर्यंत जाण्यास मदत होते.

नीरजचा सल्ला अंमलात आणण्यासाठी त्याने नेमके काय केले, असे विचारल्यावर यशवीरने स्पष्ट केले की, याचा अर्थ भाला कानाच्या पातळीजवळ धरणे, खांदे फेकण्याच्या दिशेने सरळ रेषेत ठेवणे, हात आणि भाला एका सरळ रेषेत मागे घेणे आणि त्याच रेषेतून खांद्यावरून भाला सोडणे असा होता.

मी कोणतेही दडपण न राखता स्पर्धा केली, कारण सर्व लक्ष नीरज व त्याच्या प्रतिस्पर्ध्यांवर केंद्रित होते., यात विशेषतः यात ऑलिम्पिक व विद्यमान विजेता अर्शद नदीम, श्रीलंकेचा रुमेश पथिरागे आणि ग्रेनाडाचा अँडरसन पीटर्स यांचा समावेश होता.

नीरज, नदीम व रुमेश यांच्यावरच सर्वांचे लक्ष असल्याने माझ्यावर कोणताही दबाव नव्हता. मला फक्त माझे शंभर टक्के योगदान द्यायचे होते. माझी वैयक्तिक सर्वोत्तम कामगिरी करायची आहे, असे मी स्वतःला सतत सांगत होतो. देवाची कृपा होती आणि ते साध्य झाले, असे यशवीर सिंगने सांगितले. (वृत्तसंस्था)

### यशवीरला नीरजचा ऐनवेळी मिळालेला सल्ला



यशवीर सिंग

### अन्न विषबाधेमुळे सुवर्ण हुकले : सेल्वा प्रभू

**नवी दिल्ली, ३ ऑगस्ट**

ग्लासगोमध्ये अन्नातून विषबाधा झाल्यामुळे माझे सुवर्णपदक थोडक्यात हुकले, आजारपणामुळे माझ्या कामगिरीवर परिणाम झाला. सुवर्णपदकाची एक उत्तम संधी हुकली, कारण १७.०५ मीटरच्या माझ्या वैयक्तिक सर्वोत्तम कामगिरीच्या आसपासची उडीही मला सहजपणे विजेतेपद मिळवून देऊ शकली असती, अशी खंत भारतीय ॲथ्लिट सेल्वा प्रभूने व्यक्त केली. सेल्वाने पुरुषांच्या तिहेरी उडी प्रकारात १६.५२ मीटरची उडी मारून कांस्यपदक जिंकले. या स्पर्धेत तो त्याचा सहकारी प्रवीण चित्रवेल (१६.५८ मीटर) आणि स्कॉटलंडचा जॉर्डन स्कॉट (१६.७२ मीटर) यांच्या मागे राहिला.

मला सुवर्णपदकाची मनापासून आशा होती, पण स्पर्धा सुरू असताना आजारपण किंवा अन्नातून विषबाधेसारख्या गोष्टी घडल्यास काय करणार? शेवटी, याची किंमत स्वतःलाच मोजावी लागते असे तो म्हणाला. ■

# जागतिक ॲथ्लेटिक्स स्पर्धेसाठी भारतीय संघ

**नवी दिल्ली, ३ ऑगस्ट**

अमेरिकेतील युजीन येथे ५ ते ९ ऑगस्ट २०२६ या कालावधीत होणाऱ्या 'जागतिक २० वर्षांखालील ॲथ्लेटिक्स अजिंक्यपद स्पर्धे'साठी ३६ सदस्यांच्या भारतीय संघाची घोषणा करण्यात आली आहे.

**पुरुष संघ** : मोहम्मद अशफाक (४०० मी./मिश्र ४x४०० मी. रिले), पियुष राज (४०० मी./मिश्र ४x४०० मी. रिले), वेंकटराम रेड्डी मोगली (८०० मी.), उविन आनंद (८०० मी.), अमित कुमार (४०० मी. अडथळे), बसंत (उंच उडी), अंबरीश खान (उंच उडी), अंबरीश खान (उंच उडी), अंबरीश खान (शहा) अर्जुनन रमण (लांब उडी), रॉयशन चंद्रसेकर (तिहेरी उडी), धनुष राज मानप्पाट्टी (तिहेरी उडी), निश्चय (डिस्कस थ्रो), आशिष यादव (भालाफेक), धरणीधरन थियागराजन (भालाफेक), नितीन गुप्ता (५००० मीटर शर्यत वॉक), कृष्णा राज कृष्णा, कृष्णा राजकुमार (ता. कृष्णा) ज्योतिप्रकाश, नील सामराज, रुद्र सचिन शिंदे (पुरुषांची ४x१०० मीटर रिले), रंजित कुमार, साबीर सय्यद, नकुल प्रभू (पुरुष ४x४०० मीटर रिले)

**महिला संघ** : तनु चौधरी (४०० मीटर अडथळा), पूजा (उंच उडी), अंशू (गोळाफेक), अमानत कांबोज (थाळीफेक), पूनम (भालाफेक), आरती, भावना गणेश कुमार, काजल हिराभाई वाजा, रुजुला अमोल भोंसले, अनन्या सुरेश (४x१००, नेहेमी खाऊ, नुह्या कुमारी, न्याहाळू कुमार) थिया अरुमुगम (४x४०० मी. रिले). (वृत्तसंस्था)

# काश्मीरचा कन्हैया उत्तर विभागाचा कर्णधार

**नवी दिल्ली, ३ ऑगस्ट**

आगामी दुलीप करंडक क्रिकेट स्पर्धेसाठी उत्तर विभागाच्या संघात भारताचा डावखुरा वेगवान गोलंदाज अर्शदीप सिंगची निवड करण्यात आली असून, जम्मू-काश्मीरचा यष्टिरक्षक-फलंदाज कन्हैया वाधवान या १५ सदस्यांच्या संघाचे नेतृत्व करेल.

भारतीय संघासाठी मर्यादित षटकांच्या क्रिकेटचा तज्ज्ञ असलेल्या अर्शदीप सिंगचा २०२५ च्या इंग्लंड दौऱ्यात कसोटी संघात समावेश करण्यात आला होता; मात्र दुखापत व संघ-संयोजनाशी संबंधित कारणांमुळे त्याला कसोटी क्रिकेटमध्ये पदार्पण करता आले नाही. कसोटी संघातून वगळण्यात आलेला हयाणाचा अंशुल कंबोज याचाही २३ ऑगस्टपासून सुरू होणाऱ्या या स्पर्धेसाठी उत्तर विभागाच्या संघात समावेश करण्यात आला आहे.

जम्मू-काश्मीरच्या ऐतिहासिक रणजी करंडक विजयानंतर, निवडकर्त्यांनी या विजेत्या संघातील सहा खेळाडूंना संधी दिली आहे. वाधवान याच्याशिवाय सलामीवीर कामरान इक्बाल, अष्टपैलू खेळाडू अब्दुल समद, डावखुरा फिरकीपटू आबिद मुश्ताक, वेगवान गोलंदाज सुनील कुमार व युद्धवीर सिंग यांचा संघात समावेश करण्यात आला आहे.

दिल्लीच्या आयुष बदोनीची उपकर्णधार म्हणून निवड करण्यात आली आहे. दरम्यान, जम्मू-काश्मीरचा अनुभवी कर्णधार ४१ वर्षीय पारस डोग्रा याचा या स्पर्धेसाठी विचार करण्यात आला नाही; कारण दुलीप करंडक ही प्रामुख्याने राष्ट्रीय स्तरावर आपली छाप पाडण्याचा प्रयत्न करणाऱ्या खेळाडूंसाठीची स्पर्धा मानली जाते.

वेगवान गोलंदाज आकिब नबी राष्ट्रीय कर्तव्यावर असल्याने तो या स्पर्धेसाठी उपलब्ध नसेल.


जम्मू-काश्मीरनंतर दिल्लीचे सर्वाधिक प्रतिनिधित्व आहे; यात सलामीवीर सनात सांगवान, माजी कर्णधार यश धुल, मधल्या फळीतील फलंदाज आयुष दोसेजा व बदोनी यांचा समावेश आहे.

'भारत अ' संघाचा नियमित खेळाडू निशांत सिंधू, तसेच आबिद मुश्ताक व अर्जुन शर्मा फिरकी गोलंदाजी आणि अष्टपैलू खेळाचे पर्याय उपलब्ध करून देतात.

**उत्तर विभाग संघ** : कन्हैया वाधवान (कर्णधार), आयुष बदोनी (उपकर्णधार), सनात सांगवान, कामरान इक्बाल, यश धुल, आयुष दोसेजा, अब्दुल समद, निशांत सिंधू, अर्जुन शर्मा, आबिद मुश्ताक, अर्शदीप सिंग, सुनील कुमार, अंशुल कंबोज, युद्धवीर सिंग, निखिल कश्यप. (वृत्तसंस्था)



अर्शदीप सिंग



कन्हैया वाधवान

### कोरिया मास्टर्स बॅडमिंटन जेतेपदासाठी तन्वी झुंजणार

**आसान** : नुकतेच आपले पहिले बीडब्ल्यूएफ वर्ल्ड टूर विजेतेपद पटकावल्यानंतर भारताची युवा खेळाडू तन्वी शर्मा मंगळवारी आसान येथे सुरू होणाऱ्या कोरिया मास्टर्स २०२६ बॅडमिंटन स्पर्धेत विजेतेपदासाठी झुंजणार आहे. ती किदाम्बी श्रीकांत याच्यासोबत भारतीय संघाचे नेतृत्व करणार आहे.

रविवारी तैपेई ओपनचे विजेतेपद जिंकल्यानंतर १७ वर्षीय तन्वी उत्कृष्ट लयीत दक्षिण कोरियाला जात आहे. अंतिम फेरीत व्हिएतनामच्या गुयेन थुई लिन्हचा पराभव करून, सायना नेहवाल, पी.व्ही. सिंधू आणि देविका सिहाग यांच्यानंतर बीडब्ल्यूएफ सुपर ३०० किंवा त्याहून उच्च दर्जाचे विजेतेपद जिंकणारी ती चौथी भारतीय महिला ठरली आहे. पी.व्ही. सिंधू विश्रांती घेत असल्याने आणि उन्नती हुड्डा या स्पर्धेत सहभागी होत नसल्याने, तिसरी मानांकित तन्वी महिला एकेरी गटातील सर्वोच्च मानांकन असलेली भारतीय खेळाडू असेल. अनमोल खरब, मालविका बनसोड, अश्मिता चालिहा, आकर्षी कश्यप, रक्षिता श्री संतोष रामराज, ईशराणी बरुआ, श्रियांशी वालिसेट्टी, तान्या हेमंत व मानसी सिंग हे सहभागी होणार आहेत. ■

# बुमराहच्या जागी आकिब नबीची निवड

**नवी दिल्ल्ली, ३ ऑगस्ट**

रणजी हंगामातील उत्कृष्ट कामगिरीनंतर, श्रीलंकेविरुद्धच्या कसोटी मालिकेसाठी भारताच्या संघात जसप्रीत बुमराहच्या जागी आकिब नबीची निवड निश्चित झाली आहे; त्याला पहिल्यांदाच राष्ट्रीय संघात बोलावण्यात आले आहे.

डाव्या गुडघ्याच्या दुखापतीतून पूर्णपणे सावरता न आल्यामुळे जसप्रीत बुमराह श्रीलंकेविरुद्धच्या दोन कसोटी सामन्यांच्या मालिकेतून बाहेर पडला आहे. यामुळे 'जागतिक कसोटी अजिंक्यपद स्पर्धे'च्या अंतिम फेरीत पोहोचण्याच्या भारताच्या क्षीण आशांना मोठा धक्का बसला आहे.



इंग्लंडविरुद्धच्या एकदिवसीय मालिकेदरम्यान दुखापत झाल्यानंतर, या प्रमुख वेगवान गोलंदाजाला 'सेंटर ऑफ एक्सलन्स'कडून आवश्यक 'फिटनेस क्लिअरन्स' (तंदुरुस्ती प्रमाणपत्र) मिळाले नाही, असे बीसीसीआयने सोमवारी स्पष्ट केले. बुमराहच्या जागी जम्मू-काश्मीरचा वेगवान गोलंदाज आकिब नबीची निवड करण्यात आली असून, त्याला वरिष्ठ भारतीय संघात पहिल्यांदाच स्थान मिळाले आहे. गत आठवड्यात जेव्हा अजित आगरकर यांच्या नेतृत्वाखालील निवड समितीने संघाची घोषणा केली होती, तेव्हा बुमराह व साई सुदर्शन या दोघांचाही समावेश बीसीसीआयच्या 'सेंटर ऑफ एक्सलन्स'कडून मिळणाऱ्या फिटनेस क्लिअरन्सच्या अटीवर करण्यात आला होता. बुमराह आवश्यक निकष पूर्ण करू शकला नाही, मात्र सुदर्शनने त्याच्या पुनर्वसन प्रक्रियेत चांगली प्रगती केली आहे. ४ ऑगस्ट रोजी संघ श्रीलंकेला रवाना होण्यापूर्वी तो उपलब्ध होण्याची शक्यता आहे. (वृत्तसंस्था)

### पदक विजेत्या भारोत्तोलकांचा गौरव

**नवी दिल्ली** : केंद्रीय युवा व्यवहार आणि क्रीडा मंत्री मनसुख मांडविया यांनी सोमवारी, ग्लासगो येथील राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत ऐतिहासिक कामगिरी करणाऱ्या भारताच्या पदक विजेत्या भारोत्तोलकांचा रोख बक्षिसे देऊन गौरव केला.

भारतीय भारोत्तोलकांनी ११ वजनी गटांमध्ये सहभाग घेतला आणि एकूण आठ पदके - एक सुवर्ण, सहा रौप्य आणि एक कांस्य - जिंकली. मंत्र्यांनी सुवर्णपदक विजेत्यांना ३० लाख रुपये, रौप्यपदक विजेत्यांना २० लाख रुपये आणि कांस्यपदक विजेत्यांना १० लाख रुपयांची रोख बक्षिसे प्रदान केली. ■

# युरोपियन फुटबॉल संघटनेकडून फिफाला कायदेशीर कारवाईचा इशारा

**न्योन, ३ ऑगस्ट**

युरोपियन फुटबॉल संघटना युएफएने, जियानी इन्फँटिनोच्या भविष्यातील विश्वचषक नफ्यातील हिस्सा खासगी गुंतवणूकदारांना विकण्याच्या अयशस्वी योजनेवरून फिफाला कायदेशीर कारवाईचा इशारा दिला आहे आणि कोणताही संभाव्य पुरावा नष्ट करू नये, असे म्हटले आहे.

माध्यमांतील वृत्तांमुळे जगभरात खळबळ उडाल्यानंतर काही दिवसांनी, जोशुआ कुशनर यांच्या न्यू यॉर्कमधील गुंतवणूक कंपनीसह गुंतवणूकदारांकडून ४.२ अब्ज डॉलर्स उभारण्याचा इन्फँटिनोचा गुप्त प्रस्ताव शनिवारी पहाटे मागे घेण्यात आला. यावर युएफएने तीव्र प्रतिक्रिया दिली आणि गुरुवारी त्यांच्या ५५ सदस्य संघटनांनी बैठक घेऊन, जोपर्यंत हा प्रस्ताव सक्रिय आहे तोपर्यंत फिफाच्या सर्व कार्यक्रमांवर आणि स्पर्धांवर बहिष्कार टाकण्याचे मान्य केले.

ही युरोपियन संघटना "फिफाने प्रस्तावित केलेल्या एफएफई (फिफा फॉरवर्ड एंटरप्राइज) योजनेच्या आणि सर्व संबंधित बाबींच्या संदर्भात कायदेशीर कारवाई, लवाद आणि/किंवा नियामक तक्रारींवर सक्रियपणे विचार करत आहे, असे युएफएच्या वकिलांनी फिफाला कळवले आहे.शनिवारी, युएफएने इन्फँटिनो यांचे दशकाहून अधिक काळचे अध्यक्षपद संपुष्टात आणण्याची इच्छा दर्शवली. त्यांनी जागतिक फुटबॉलचा विश्वास गमावला आहे, असे त्यांनी म्हटले आहे. काही तासांपूर्वी, इन्फँटिनो यांनी तो वादग्रस्त प्रस्ताव मागे घेतला. या प्रस्तावात फिफाच्या २११ सदस्य संघटनांना प्रत्येकी २० दशलक्ष डॉलर्सची एकरकमी रक्कम देण्याची आणि ती स्वीकारण्यासाठी सप्टेंबरच्या मध्यापर्यंतची मुदत देण्याची तरतूद होती. फिफाने २० अब्ज डॉलर्सचे मूल्यांकन केलेली एफएफई ही उपकंपनी फुटबॉल संस्थेच्या नफा मिळवून देणाऱ्या व्यावसायिक आणि स्पर्धांच्या कामकाजावर नियंत्रण मिळवणार होती. २११ सदस्य आधीपासूनच झुरिच-स्थित या ना-नफा तत्त्वावरील नियामक मंडळाचे प्रभावीपणे मालक आहेत. (वृत्तसंस्था)



फिफा अध्यक्ष जियानी इन्फँटिनो

### इन्फँटिनो यांना विरोध

यूईएफएने आपला माजी कर्मचारी असलेल्या इन्फँटिनो यांच्या विरोधात सर्वात प्रखर भूमिका घेतली आहे, तर आशियाई फुटबॉल कॉन्फेडरेशन आणि 'कॉनकॅकॅफ'- उत्तर व मध्य अमेरिका आणि कॅरिबियन फुटबॉल संघटना) यांनीही इन्फँटिनो यांच्या योजनेला विरोध करणारी कठोर विधाने केली आहेत. खाजगी इक्विटी (गुंतवणूक) योजनेमुळे इन्फँटिनो यांच्या भवितव्यात नाट्यमय बदल झाला आहे. दोन आठवड्यांपूर्वी विश्वचषकाच्या अंतिम सामन्यानंतर न्यू यॉर्कहून परतताना, पुढील मार्चमध्ये होणाऱ्या निवडणुकीत २०२१ पर्यंतच्या चौथ्या आणि अंतिम कार्यकाळासाठी त्यांची बिनविरोध फेरनिवड निश्चित मानली जात होती. या प्रस्तावित उपक्रमामुळे त्यांच्यासाठी २०२१ नंतर 'कमिशनर'सारखे पद निर्माण होऊ शकले असते, ज्यामध्ये त्यांना अध्यक्ष म्हणून मिळणाऱ्या सध्याच्या ६ दशलक्ष डॉलर्सच्या वार्षिक पगारापेक्षा आणि बोनसपेक्षा कितीतरी अधिक मोबदला मिळाला असता. इन्फँटिनो यांना २११ सदस्य संघटनांपैकी सुमारे २०० संघटनांकडून समर्थनाची पत्रे मिळाली होती. आता संपूर्ण युरोपमध्ये ही पत्रे मागे घेतली जाण्याची शक्यता आहे; वेल्सच्या फुटबॉल संघटनेने सर्वप्रथम आपली भूमिका बदलल्याची घोषणा केली आहे. ■

# ब्रिजभूषण शरण सिंह यांची निर्दोष मुक्तता

**नवी दिल्ली, ३ ऑगस्ट**

भारतीय महिला कुस्तीपटूंनी दाखल केलेल्या लैंगिक छळाच्या प्रकरणात, दिल्ली न्यायालयाने सोमवारी भाजपाचे माजी खासदार आणि 'भारतीय कुस्ती महासंघा'चे (डब्ल्यूएफआय) माजी अध्यक्ष ब्रिजभूषण शरण सिंह आणि सह-आरोपी, डब्ल्यूएफआयचे माजी सहाय्यक सचिव विनोद तोमर यांची निर्दोष मुक्तता केली. दरम्यान, महिला कुस्तीपटूंनी ब्रिजभूषण शरण सिंह यांच्या निर्दोष सुटकेला आव्हान देण्याचा व न्यायासाठी लढा सुरू ठेवण्याचा निर्धार केला आहे.

हे प्रकरण अनेक महिला कुस्तीपटूंनी केलेल्या आरोपांवरून उद्‌भवले होते. यामध्ये ऑलिम्पिकपटू साक्षी मलिक, विनेश फोगाट, बजरंग पुनिया आणि संगीता फोगाट यांचा समावेश होता. त्यांनी २०२३ मध्ये नवी दिल्ली येथे सिंह यांच्या अटकेची मागणी करत अनेक महिने चाललेल्या आंदोलनांचे नेतृत्व केले होते. २०१६ ते २०१९ या काळात डब्ल्यूएफआय कार्यालय, सिंह यांचे अधिकृत निवासस्थान व परदेश दौऱ्यांदरम्यान सिंह यांनी एका अल्पवयीन मुलीसह अनेक महिला कुस्तीपटूंचा लैंगिक छळ केला होता, असा तक्रारदारांचा आरोप होता. अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी अश्विनी पनवार यांनी हा निकाल जाहीर केला. दोन्ही आरोपींची निर्दोष मुक्तता करण्यात आली आहे.



न्यायालयाच्या निरीक्षणांनुसार, तक्रारदारांनी तक्रार करण्यास लावलेला विनाकारण विलंब, विधानांमधील विसंगती, महत्त्वाच्या मुद्द्यांवरील परस्परविरोधी दावे आणि घटनेनंतरचे त्यांचे वर्तन यामुळे त्यांची बाजू अत्यंत अविश्वसनीय ठरली, असे सिंह यांचे वकील राजीव मोहन यांनी सांगितले. या प्रकरणामुळे मोठ्या प्रमाणावर निदर्शने झाली होती आणि याकडे संपूर्ण देशाचे लक्ष वेधले गेले होते. २०२३ मध्ये ही आंदोलने सुरू असताना, केंद्रीय क्रीडा मंत्रालयाने आरोपांची चौकशी करण्यासाठी एका देखरेख समितीची स्थापना केली होती. मे २०२३ मध्ये सर्वोच्च न्यायालयाने हस्तक्षेप केल्यानंतर, दिल्ली पोलिसांनी सिंह यांच्या विरोधात एफआयआर दाखल केला. (वृत्तसंस्था)

### निर्णयाविरुद्ध अपील करणार : विनेश फोगाट

ब्रिजभूषण शरण सिंह यांना न्यायालयाने दोषी न ठरवल्यामुळे आम्हाला अत्यंत दुःख झाले आहे. त्यांना दोषमुक्त करण्याच्या दिल्ली न्यायालयाच्या निर्णयाविरुद्ध अपील करणार आहे. कुस्तीपटू न्यायासाठी आपला लढा सुरूच ठेवतील, असे जागतिक अजिंक्यपद स्पर्धेत पदक विजेती विनेश फोगाटने सोमवारी सांगितले. ■

# नगर अभियंत्यांना पदावरून दूर ठेवा अन्यथा आंदोलन

## २२ नगरसेवकांचा आयुक्तांना इशारा; नालेसफाई कंत्राट, निवडणूक खर्चातील कथित अनियमिततेची चौकशी संपेपर्यंत कारवाईची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ ऑगस्ट-**

सोलापूर महानगरपालिकेतील नालेसफाई कंत्राटातील कथित भ्रष्टाचार आणि २०२५-२६ च्या सार्वत्रिक निवडणूक खर्चाच्या बिलातील कथित अनियमितता या दोन प्रकरणांमुळे महापालिकेतील राजकीय वातावरण पुन्हा तापले आहे.

दोन्ही प्रकरणांची चौकशी पूर्ण होईपर्यंत नगर अभियंत्यांना पदावरून दूर ठेवावे, अशी मागणी भाजपच्या उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर, अनंत जाधव यांच्यासह विविध विषय समित्यांच्या सभापती आणि तब्बल २२ नगरसेवकांनी महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांच्याकडे केली आहे. मागणी मान्य न झाल्यास आयुक्त कार्यालयासमोर ठिय्या आंदोलन छेडण्याचा इशाराही दिला आहे.

सर्वसाधारण सभेत नगरसेवक अनंत जाधव यांनी नालेसफाई कंत्राटातील कथित गैरव्यवहाराचा मुद्दा उपस्थित केला होता. संबंधितांवर तातडीने कारवाईची मागणी केली होती. चौकशी संपेपर्यंत नगर अभियंत्यांना पदावरून दूर ठेवावे, अशी भूमिकाही मांडली होती. त्यानंतर आयुक्तांनी चौकशीसाठी समिती नियुक्त केली. महापालिका निवडणूक खर्चाच्या बिलांबाबतही भाजप नगरसेवकांचे आक्षेप नोंदविले आहेत. स्थायी समितीने सुरुवातीला संबंधित बिलांना मंजुरी नाकारुन पुन्हा ती मंजूर करून अंतिम मान्यतेसाठी सभेपुढे ठेवल्याने प्रक्रियेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे.



निवेदनात उपमहापौर देवकर, अर्चना वडनाल, मंजिरी किल्लेदार, सत्यजित वाघमोडे आदींनी निवडणूक खर्चासंदर्भात स्पष्टीकरण मागितले आहे. पहिल्यांदा मंजुरी नाकारण्यामागील कारणे, त्यानंतर केलेल्या दुरुस्त्या, प्रशासकीय व आर्थिक मंजुरी, शासन नियमांचे पालन आदी अहवाल सभागृहासमोर ठेवण्याची मागणी केली आहे.

दोन्ही प्रकरणांची निष्पक्ष चौकशी व्हावी आणि चौकशीवर प्रभाव पडू नये, यासाठी नगर अभियंत्यांना चौकशी संपेपर्यंत पदावरून दूर ठेवण्याचा आग्रह भाजप नगरसेवकांनी धरला आहे. उपमहापौर देवकर, नगरसेविका मंजिरी किल्लेदार, अर्चना वडनाल यांच्यासह नगरसेवकांनी मागणीची दखल न घेतल्यास महापालिका आयुक्त कार्यालयासमोर ठिय्या आंदोलनाचा इशारा दिला आहे. दरम्यान, निवडणूक खर्चासंदर्भात बुधवारी अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजेंकडे सुनावणी आहे. निवेदन देतेवेळी नगरसेवक अनंत जाधव, सत्यजित वाघमोडे, राजशेखर पाटील, शिवानंद पाटील, समाधान आवळे, संजय कोळी, वंदना गायकवाड, मंजिरी किल्लेदार, महेश देवकर, संकेत किल्लेदार, किरण पवार, अजित गायकवाड उपस्थित होते.

> एखाद्या प्रकरणाची चौकशी सुरू असताना संबंधित अधिकारी पदावर राहणे योग्य नाही. यामुळे नगर अभियंत्यांना तोपर्यंत पदावरून दूर ठेवण्याची मागणी आयुक्तांकडे केली आहे. दरम्यान, त्यांना रुजू करून घेणार नसल्याचे आश्वासन महापालिका आयुक्तांनी दिले आहे.
>
> **-अनंत जाधव,** नगरसेवक

## महत्वाचे...




### 'नेतृत्व रंजन'मध्ये ३१८ कॅबिनेट अधिकाऱ्यांचा शपथविधी

**सोलापूर, दि. ३ ऑगस्ट-**

लायन्स इंटरनॅशनल डिस्ट्रिक्ट ३२३४ डी१च्या वतीने आयोजित नेतृत्व रंजन डिस्ट्रिक्ट कॅबिनेट इन्स्टॉलेशन सोहळा रविवारी रेजेंटा सेंट्रल शिवानी येथे पार पडला. आंतरराष्ट्रीय संचालक लायन सुरज बागला (पीएमजेएफफ) यांच्या हस्ते ३१८ कॅबिनेट अधिकाऱ्यांना पदाची शपथ देण्यात आली. ढोल-ताशांच्या गजरात त्यांचे भव्य स्वागत करण्यात आले. प्रमुख वक्ते डॉ. विठ्ठल लहाने यांनी जबाबदारी, शिस्त, नातेसंबंध आणि योग्य नेतृत्व या मूल्यांचे महत्त्व अधोरेखित केले. डिस्ट्रिक्ट गव्हर्नर लायन राजेंद्र शाह-कांसवा यांनी सर्व पदाधिकाऱ्यांनी टीमवर्कच्या भावनेतून कार्य करून सेवेत नवे विक्रम प्रस्थापित करण्याचे आवाहन केले. लायन सुरज बागला यांनी समाजोपयोगी कायमस्वरूपी सेवा प्रकल्प उभारण्याबरोबरच एलसीआयएफफ लेगसी कार्यक्रमात सहभागी होण्याचे आवाहन केले. कार्यक्रमात ७७ लायन्स क्लब, १ लिओ-लायन्स क्लब व १० लिओ क्लबचे पदाधिकारी उपस्थित होते. सॅटिस्फफॅक्शन बाय सर्व्हिस या ब्रीदवाक्याचा जागर करत समाजसेवा, नेतृत्व विकास आणि संघटनात्मक बळकटीचा संकल्प यावेळी व्यक्त करण्यात आला.



### कृषी व्यवसायाच्या नव्या संधींवर राष्ट्रीय परिसंवाद संपन्न

**सोलापूर, दि. ३ ऑगस्ट-**

सावित्रीबाई फुले शिक्षण प्रसारक मंडळ संचलित सिंहगड इन्स्टिट्यूट, केगाव येथील सेंटर फफॉर रिसर्च अँड टेक्नॉलॉजी डेव्हलपमेंट आणि ग्रीन एज फफार्मर प्रोड्युसर कंपनी लिमिटेड यांच्या संयुक्त विद्यमाने शेतकऱ्यांसाठी कृषी व्यवसायाच्या संधी या विषयावरील एकदिवसीय राष्ट्रीय परिसंवाद पार पडला. राष्ट्रीय डाळिंब संशोधन केंद्राचे संचालक डॉ. राजीव मराठे यांच्या हस्ते उद्घाटन झाले. अध्यक्षस्थानी संशोधन संचालक प्रा. डॉ. एस. एच. पवार होते, तर प्रमुख वक्ते म्हणून बँक ऑफफ इंडियाचे माजी क्षेत्रीय महाव्यवस्थापक मुकुंद कुलकर्णी यांनी मार्गदर्शन केले. यावेळी संशोधन, आधुनिक तंत्रज्ञान, मूल्यवर्धन, एफफपीओ आणि बाजारपेठाभिमुख शेतीच्या माध्यमातून शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविण्याची गरज मान्यवरांनी अधोरेखित केली. मुकुंद कुलकर्णी यांनी भरड धान्यांचे उत्पादन वाढविण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा स्वीकार करून मूल्यवर्धित कृषी व्यवसायाकडे वळण्याचे आवाहन केले. डॉ. राजीव मराठे यांनी डाळिंब उत्पादनातील संशोधनाधारित संधींची माहिती दिली, तर प्रा. डॉ. पवार यांनी युवकांनी कृषी उद्योजकतेकडे वळण्याचे आवाहन केले. कार्यक्रम कॅम्पस डायरेक्टर संजय नवले यांच्या नेतृत्वाखाली आणि प्राचार्य डॉ. शंकर नवले यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडले.



### वालचंद महाविद्यालयात पालक-शिक्षक सभेद्वारे पालकांचे प्रबोधन

**सोलापूर, दि. ३ ऑगस्ट-**

वालचंद कॉलेज ऑफ आर्ट्स अँड सायन्स कनिष्ठ महाविद्यालयात शैक्षणिक वर्ष २०२६-२७ मधील इयत्ता अकरावी कला, विज्ञान (अनुदानित) तसेच विज्ञान (स्वयंअर्थसहाय्य) विभागाची पालक-शिक्षक सभा पार पडली. सभेला प्राचार्य डॉ. संतोष कोटी, उपप्राचार्य अनुप म्हेत्रे, समन्वयिका सारिका महिंद्रकर, पर्यवेक्षक डॉ. जीवराज कस्तुरे उपस्थित होते. समन्वयक सारिका महिंद्रकर यांनी सभेत सीईटी, जेईई व नीट परीक्षांचे पुढील दोन वर्षांचे नियोजन, मागील वर्षाचा गुणवत्तापूर्ण निकाल, उपक्रमांची माहिती पालकांना देण्यात आली. सूत्रसंचालन चेतन तुपकर व अंबिका माळी यांनी तर आभार संदीप चेंडकापूरे व तांदळे यांनी मानले. पालक सभेचे सचिव सुजित शिंदे व प्रसाद जोशी यांचे मार्गदर्शन लाभले. या सभेला स्वयंअर्थसहाय्य विभागातील २५३ तर अनुदानित विभागातील २०० हून अधिक पालक उपस्थित होते.



### अणणाभाऊ साठे यांना मरणोत्तर 'भारतरत्न' प्रदान करा

**सोलापूर, दि. ३ ऑगस्ट-**

लोकशाहीर साहित्यरत्न अणणाभाऊ साठे यांनी आपल्या साहित्य, शाहिरी आणि सामाजिक कार्यातून शोषित, वंचित, कष्टकरी, कामगार आणि बहुजन समाजाच्या वेदनांना वाचा फोडली. मराठी साहित्य, संयुक्त महाराष्ट्र चळवळ आणि सामाजिक परिवर्तनासाठी त्यांनी दिलेले योगदान अतुलनीय आहे त्यामुळे केंद्र शासनाने तात्काळ अणणाभाऊ साठे यांना मरणोत्तर भारतरत्न पुरस्काराने सन्मानित करावा, अशी मागणी भारताचे राष्ट्रपती पंतप्रधान यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. यावेळी संभाजी ब्रिगेडचे अध्यक्ष शाम कदम, जिल्हाध्यक्ष संभाजी भोसले, शत्रुगुण माने, महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्ष मीनल दास, शिरीष जगदाळे, इर्षद नागोरे, प्रकाश डोंगरे, सतीश वावरे आदी उपस्थित होते.

## शिक्षक दिनापूर्वी सातव्या वेतन आयोगाचे थकीत हप्ते द्या

### मनपा शिक्षक संघटनेची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ ऑगस्ट-**

महापालिका प्राथमिक शिक्षण मंडळातील शिक्षकांना सातव्या वेतन आयोगाच्या थकीत रकमेचे उर्वरित तीन हप्ते शिक्षक दिनापूर्वी अदा करावेत, अशी मागणी महाराष्ट्र राज्य मागासवर्गीय शिक्षक संघटना, मनपा शाखेच्या वतीने करण्यात आली आहे. याबाबतचे निवेदन सोलापूर महानगरपालिकेचे मुख्य लेखापाल डॉ. रत्नराज जवळगेकर यांना देण्यात आले.



संघटनेने दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, शासनाच्या नियमानुसार सातव्या वेतन आयोगाच्या थकीत रकमेचे पाच समान हप्त्यांत वितरण होणे अपेक्षित होते. महानगरपालिकेकडून आतापर्यंत केवळ पहिला आणि दुसरा हप्ता अदा करण्यात आला असून तिसरा, चौथा आणि पाचवा हप्ता अद्यापही प्रलंबित आहे. शासनाकडून यासाठीचा निधी उपलब्ध झालेला असल्याने महापालिकेने उर्वरित थकीत रक्कम तातडीने शिक्षकांच्या खात्यात जमा करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.शिक्षक दिनापूर्वी थकीत हप्ते मिळाल्यास शिक्षकांना मोठा दिलासा मिळेल, असे संघटनेने निवेदनात म्हटले आहे. निवेदन देताना संघटनेचे अध्यक्ष नागेश गोसावी, कोषाध्यक्ष संदीप घोळवे, संघटक राहुल पाटील, प्रसन्न निकंबे उपस्थित होते.

## चहा पिताना कोसळल्याने ५३ वर्षीय इसमाचा मृत्यू

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ ऑगस्ट-**

चहा पित असताना अचानक तोल जावून खाली कोसळल्याने ५३ वर्षीय व्यक्तीचा मृत्यू झाल्याची घटना अक्कलकोट रोड एमआयडीसी परिसरातील सत्यसाईनगर येथे आज सोमवारी सकाळच्या सुमारास घडली. लक्ष्मीकांत खुरा (वय ५३ रा. सत्यसाई नगर) असे मयत झालेल्या इसमाचे नाव आहे. सोमवारी सकाळी दहा वाजेच्या सुमारास ते घरात असताना चहा पिऊन उभारले होते. त्यावेळी अचानक खाली कोसळल्याने बेशुद्ध झाले. दुपारी शासकीय रुग्णालयात श्रीनिवास (मुलगा) याने दाखल केले असता डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले.



## रुद्रशक्ती गुरुकुलच्या विद्यार्थ्यांची राष्ट्रीय स्पर्धेत ८ पदकांची कमाई

**सहा सुवर्ण व दोन कांस्य पदके पटकावली**

**सोलापूर, दि. ३ ऑगस्ट-**

रोहतक (हरियाणा) येथे झालेल्या १३व्या राष्ट्रीय कराटे, जुडो व तायक्वांदो स्पर्धेत येथील रुद्रशक्ती गुरुकुलच्या विद्यार्थ्यांनी ६ सुवर्ण आणि २ कांस्य अशी ८ पदके पटकावली. सर्व यशस्वी खेळाडूंना मुख्य प्रशिक्षक विवेक मिस्कीन यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांच्या या यशाबद्दल स्टुडंट ऑलिम्पिक असोसिएशन सोलापूरचे सचिव नागेश शेट्टीकर, राज्याचे सचिव सुनील शिंदे आणि रुद्रशक्ती गुरुकुलचे संस्थापक अध्यक्ष योगीनाथ फुलारी यांनी सर्व खेळाडूंचे अभिनंदन केले आहे.

**खेळाडूंची पदकनिहाय कामगिरी:** कराटे : श्रद्धा इप्पनपल्ली (सुवर्ण), प्रवलिका कामूर्ती (कांस्य), तायक्वांदो : श्रावणी गवळी (सुवर्ण). जुडो : दुर्वा रोहिटे, मान्यता रोहिटे, वेदश्री गुडूर, वैभव माडे ( सर्व सुवर्ण ). कुस्ती : यतिराज भोसले (कांस्य).

## जुन्या इमारतीचा माळा पडल्याने दोन मुलीसह तिघे जखमी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ ऑगस्ट-**

पाऊस पडत असल्याने आडोशाला थांबलेल्या जुन्या इमारतीचा माळा अंगावर पडल्याने दोन अल्पवयीन तरुणीसह तिघेजण जखमी झाले. ही घटना लक्ष्मी मार्केट परिसरातील लब्बा दुकानाजवळ आज सोमवारी दुपारच्या सुमारास घडली.

लक्ष्मी वसंत पवार (वय १६), अनिता विनोद पवार (वय १७, आणि भाऊ वसंत पवार (वय ८ वर्षे सर्व रा. हणमगाव ता.दक्षिण सोलापूर) अशी जखमीची नावे आहेत. ते तिघे आज दुपारी अडीच वाजेच्या सुमारास पाऊस येत असल्याने रस्त्यावरील बंद किरणा दुकानासमोर थांबले होते. त्यावेळी इमारतीचा माळा अंगावर पडल्याने तिघेजण जखमी झाले. त्यांना उपचारासाठी राजू चव्हाण (मामा) यांनी येथील शासकीय रुग्णालयात दाखल केले.

## वरवडे येथे रेल्वेच्या धडकेने अनोळखी इसम ठार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ ऑगस्ट-**

रेल्वेच्या धडकेत एक ४० ते ४५ वर्षीय अनोळखी इसम ठार झालेल्या अवस्थेत अवस्थेत वरवडे (ता.मोहोळ) येथील रेल्वे रुळाजवळ रविवारी रात्री मिळून आला. याची खबर मोहोळ पोलिस ठाण्याला मिळताच पोलीस हवालदार आरजी जिराळ यांनी घटनास्थळी पोहोचून, घटनास्थळाचा पंचनामा करून मृतदेह येथील शासकीय रुग्णालयात शव विच्छेदनासाठी मध्यरात्री दाखल केला.

## सांगोला महाविद्यालयात भित्तीपत्रकाचे प्रकाशन



**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. ३ ऑगस्ट-**

सांगोला महाविद्यालयाच्या मराठी विभागात आषाढीवारी निमित्त भित्तीपत्रकाचे प्रकाशन प्राचार्य डॉ.सुरेश भोसले, कवी प्रा.प्रसाद लोखंडे यांच्या हस्ते केले.

डॉ.सुरेश भोसले यांनी या भित्तीपत्रकातून आषाढी एकादशीचे धार्मिक, सांस्कृतिक व सामाजिक महत्त्व आदींची प्रभावीपणे मांडणी केली. तसेच या उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये वाचनसंस्कृती, सर्जनशीलता वाढेल, असे सांगत मराठी विभागाच्या उपक्रमाचे कौतुक केले. यावेळी प्रा.प्रसाद लोखंडे यांनी विद्यार्थ्यांनी साहित्य, संस्कृती आणि संतवाङ्मयाचा सातत्याने अभ्यास करावा असे आवाहन केले. यावेळी मराठी विभागाचे प्रमुख प्रा.संतोष लोंढे, अर्थशास्त्रविभाग प्रमुख डॉ.एम.डी. वेदपाठक, प्रा.डॉ.शितल घोंगडे, प्रा.संजय बाबर उपस्थित होते.

## मेणबत्ती डोक्यात पडल्याने तरुण जखमी

**सोलापूर** - झोपेतून उठताना फळीवरील पेंटच्या डबा डोक्यात पडला. त्यावेळी डोक्यावरील पेंट पुसत असताना मेणबत्तीच्या धक्का लागून पेट घेतल्याने ३४ वर्षीय तरुण भाजून जखमी झाला. ही घटना शहरातील सिद्धार्थनगर हाउसिंग सोसायटी येथे रविवारी रात्रीच्या सुमारास घडली. शहारून हिरालाल शिंदे (वय ३४ वर्ष रा.सिद्धार्थनगर हाउसिंग सोसायटी, सोलापूर) असे जखमीचे नाव आहे. रात्री बारा वाजता सुमारास तो झोपेतून उठताना फळीवरील डबा पडल्याने डोक्यात पेंट सांडले होते. त्यावेळी तो डोक्यावरील पेंट पुसून घेत असताना घरातील पेटत्या मेणबत्तीचा धक्का लागल्याने आगीचा भडका उडून तो भाजून जखमी झाला. त्याला योगेश शिंदे (भाऊ) यांनी येथील शासकीय रुग्णालयात दाखल केले.




## लिंगायत समाजाने मतभेद विसरून एक व्हावे : प्रा. सुदर्शन बिरादार

**सोलापूर, दि. ३ ऑगस्ट-**

समाजाचा विकास करण्यासाठी समाजबांधवांनी मतभेद व मनभेद विसरुन एक झाले पाहिजे. समाजाला नेतृत्व राहिले नाही. धर्मगुरु व समाजातील राजकीय नेत्यांच्या लोकांचा विश्वास कमी-कमी होत चालला आहे. अशावेळी लिंगायत समाजांनी कोणाची वाट न पहाता आपणच एकमेकांना समजून घेऊन सहकार्य करावे. मनभेद व मतभेद विसरून तो आपला आहे समजुन एक झाले पाहिजेत. एकमेकांच्या हा दुःखात सहभागी व्हावे. लिंगायत समाजाच्या आरक्षणाचा प्रश्न, महात्मा बसवेश्वरांचे मंगळवेढा येथील स्मारक, आगामी जनगणनेत लिंगायत समाजाने काय करायला पाहिजे यावर महासंघाचे प्रदेशाध्यक्ष प्रा. सुदर्शनराव बिरादार यांनी मार्गदर्शन केले. लिंगायत महासंघ शाखा सोलापूर जिल्ह्याच्या वतीने लिंगायत समाजाची महत्वाची ज्येष्ठ नागरिक संघटना हॉल शेळगी येथे मार्गदर्शन करताना बोलत होते. प्रास्ताविक लिंगायत महासंघाचे जिल्हाध्यक्ष चंद्रकांत रमणशेट्टी यांनी केले. या बैठकीत कमांडर अशोक आगावणे, हणमंत कोरे, विवेक कोरे, अशोक साखरे, अंबादास बिराजदार, महादेव नागरगोजे, महादेव पाटील, संग्राम पाटील सिद्धारुढ निंबाळे, सोलापुर मनपाचे माजी स्थायी समिती सभापती केदार उंबरजे आदींनी आपले मनोगत व्यक्त केले.

## आरक्षण उपवर्गीकरण लागू करा; २५ ऑगस्ट रोजी मोर्चा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ ऑगस्ट-**

अनुसूचित जाती-जमाती आरक्षण उपवर्गीकरणाची अंमलबजावणी राज्य शासनाने तातडीने करावी. या मागणी करता सोलापूर शहर जिल्हा मातंग समाजाच्या वतीने सोलापूर जिल्हाधिकारी कार्यालयावर येथे मंगळवार २५ ऑगस्ट रोजी मोर्चा काढणार असल्याचा निर्धार सोलापुरात झालेल्या द एंपरिएल पॅलेस उजनी ऑफिस समोरील मंगल कार्यालय येथे सर्वपक्षीय व सर्व संघटनेच्या बैठकीत करण्यात आला.

माजी मंत्री उत्तम प्रकाश खंदारे यांच्या मार्गदर्शना खाली झालेल्या या बैठकीत सोलापूर शहर जिल्ह्यातील मातंग समाजातल्या विविध संघटना एकवटल्या होत्या. संघटनेच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी या बैठकीत आक्रमकपणे आपली भूमिका मांडली.



या मोर्चात.आ. अमित गोरखे, आमदार सुनील कांबळे ,आ. जितेश अंतापुरकर,माजी मंत्री प्रा. लक्ष्मण ढोबळे, माजी राज्यमंत्री दिलीपराव कांबळे, माजी राज्यमंत्री रमेश बागवे, माजी आमदार सुधाकर भालेराव, विष्णू कसबे, रामचंद्र भरांडे. अशोक लोखंडे, गणपत भिसे, सचिन साठे, अजिंक्य चांदणे, शंकर तडाखे, सुभाष जगताप उपस्थित राहणार आहेत. अनुसूचित जातींमधील अनेक घटकांना गेल्या ७५ वर्षांत आरक्षणाचा अपेक्षित लाभ मिळाला नसल्याचा दावा करत, आरक्षणाचा लाभ वंचित राहिलेल्या ५७ जातींना न्याय मिळवून देण्यासाठी उपवर्गीकरण आवश्यक असल्याचे मत मांडले. प्रारंभी बैठकीचे प्रास्ताविक सुरेश पाटोळे यांनी केले.

या बैठकीस साक्षात लोखंडे, गोविंद कांबळे विजय लोंढे, महादेव भोसले, किशोर जाधव, पृथ्वीराज मोरे, राजू क्षीरसागर, तानाजी रणदिवे, सुनील खवळ रोहित खिलारे, बंडू गवळी उपस्थित होते.

> गेल्या दोन-तीन महिन्यांपासून आरक्षण वर्गीकरणाच्या बाबतीत काही घटकांकडून महापुरुषांच्या बाबतीत अतिशय खालच्या पातळीत टीका केली जात आहे. मातंग समाज हा पूर्वीपासून आंबेडकरवादी आहे. त्यामुळे न्याय हक्कापासून आम्हाला वंचित ठेवू नये.
>
> - उत्तम प्रकाश खंदारे, माजी मंत्री, सोलापूर.

## योग्य वेळी निदानामुळे रुग्णांचे जीवनमान सुधारते : डॉ. बोरगोहेन

**सोलापूर, दि. ३ ऑगस्ट-**

पार्किन्सन्स हा मेंदूशी संबंधित प्रगतिशील आजार असून योग्य वेळी निदान, औषधोपचार आणि डीप ब्रेन स्टिम्युलेशन (ऊ्इड) या आधुनिक उपचारपद्धतीच्या मदतीने रुग्णांचे जीवनमान सुधारता येते, अशी माहिती हैदराबाद येथील यशोदा हॉस्पिटलच्या पार्किन्सन्स डिसीज अँड मूव्हमेंट डिसऑर्डर रिसर्च सेंटरचे कोर्स डायरेक्टर व वरिष्ठ न्यूरोलॉजिस्ट डॉ. रुपम बोरगोहेन यांनी पत्रकार परिषदेत दिली. पार्किन्सन्समध्ये मेंदूमधील डोपामाइनचे प्रमाण कमी झाल्याने हात-पाय थरथरणे, हालचाली मंदावणे, स्नायू कडक होणे, चालण्यात अडचण, तसेच झोपेचे विकार, बद्धकोष्ठता आणि स्मरणशक्ती कमी होणे अशी लक्षणे दिसून येतात. सुरुवातीच्या टप्प्यात औषधांचा चांगला परिणाम होतो; मात्र कालांतराने औषधांचा प्रभाव कमी झाल्यास ऊ्इड हा प्रभावी पर्याय ठरतो.या शस्त्रक्रियेमध्ये मेंदूतील विशिष्ट भागात सूक्ष्म इलेक्ट्रोड बसवून नियंत्रित विद्युत संकेत दिले जातात. त्यामुळे थरथरणे, स्नायूंचा कडकपणा, हालचाली मंदावणे आणि इतर मोटर लक्षणांवर प्रभावी नियंत्रण मिळते, असे डॉ. रुपम बोरगोहेन यांनी सांगितले. औषधांचा परिणाम कमी झालेल्या रुग्णांसाठी ऊ्इड हा दीर्घकालीन आणि प्रभावी उपचार असून रुग्णाच्या गरजेनुसार उपचारात आवश्यक बदल करता येतात. पार्किन्सन्सवरील शस्त्रक्रियात्मक उपचारांमध्ये ऊ्इड हा आजही 'गोल्ड स्टँडर्ड' मानला जातो. या आजाराबाबत जनजागृती वाढविणे आणि आधुनिक उपचारांची माहिती अधिकाधिक रुग्णांपर्यंत पोहोचविणे गरजेचे असल्याचे डॉ. रुक्मिणी मृदुला आणि डॉ. व्हीव्हीएसआरके प्रसाद यांनी सांगितले. या पत्रकार परिषदेस अतुल चव्हाण, नरेश सामल आदी उपस्थित होते.

# ग्रामीण बुलुतेदारीचा शेवट... आधुनिकतेच्या लाटेत हरवले गावगाड्याचे आधारस्तंभ...

एकेकाळी महाराष्ट्रातील प्रत्येक गाव हे स्वतःमध्ये एक स्वयंपूर्ण जग होते. गावात लागणारी जवळपास प्रत्येक सेवा गावातीलच विविध सम ाजघटकांकडून उपलब्ध होत असे. शेती, धार्मिक विधी, सामाजिक समारंभ, सण-उत्सव, बांधकाम, दैनंदिन गरजा, शेतीची अवजारे, कपडे, पादत्राणे, केस कापणे, मातीची भांडी, वाद्ये, देवपूजा, पत्रिका, अंत्यसंस्कार-प्रत्येक कामासाठी गावात एक निश्चित व्यवस्था होती. या व्यवस्थेलाच 'बुलुतेदारी व्यवस्था' म्हटले जात असे. आज मात्र परिस्थिती पूर्णपणे बदलली आहे.

आधुनिक शिक्षण, विज्ञान-तंत्रज्ञान, औद्योगिकीकरण, बाजारपेठेचा विस्तार, शहरांकडे वाढलेले स्थलांतर आणि बदलती जीवनशैली यामुळे शेकडो वर्षे टिकून राहिलेली बुलुतेदारी व्यवस्था आता इतिहासाच्या पानांमध्ये जमा होत आहे.

पूर्वी गावात पैसा कमी फिरत असे, पण माणुसकी आणि परस्पर सहकार्य भरपूर होते. गावातील प्रत्येक कुटुंबाचे बलुतेदारांशी जिव्हाळ्याचे नाते असे. शेतकरी वर्षभर धान्य पिकवत आणि पीक काढणीनंतर बलुतेदारांना त्यांच्या सेवेनुसार धान्य, कडधान्य, भाजीपाला किंवा इतर वस्तू देत असत. हा व्यवहार विश्वासावर चालत असे.

रोख पैशापेक्षा श्रम, सेवा आणि सामाजिक नातेसंबंधांना अधिक महत्त्व होते. त्यामुळे गावाची अर्थव्यवस्था स्वयंपूर्ण आणि परस्परावलंबी होती.

**बारा बलुतेदारांची महत्त्वपूर्ण भूमिका...**

गावातील नाभिक, सुतार, लोहार, कुंभार, चांभार, शिंपी, परीट, सोनार, गुरव, जोशी, महार, मांग यांसारखे बलुतेदार गावाच्या प्रत्येक कार्यात सहभागी असत. नाभिक हा फक्त केस कापणारा नव्हता; तो लग्नकार्याचा निमंत्रक, संदेशवाहक आणि अनेक सामाजिक कार्यक्रमांचा अविभाज्य भाग होता. सुतार शेतीची अवजारे, बैलगाडी, घरे आणि लाकडी साहित्य तयार करत असे. लोहार नांगर, कुऱ्हाड, विळा, फावडे यांसारख्या शेतीसाठी आवश्यक लोखंडी अवजारांना धार लावत असे.

कुंभाराच्या चाकावर तयार होणाऱ्या मडक्यांशिवाय गावातील संसार पूर्ण होत नसे. चांभार शेतकऱ्यांसाठी म जबूत चामड्याची पादत्राणे, बैलांसाठी आवश्यक साहित्य तयार करत असे. शिंपी कपडे शिवत असे, तर परीट कपडे धुण्याचे काम करत असे.

गुरव मंदिरातील पूजा-अर्चा सांभाळत, जोशी पंचांग, मुहूर्त आणि धार्मिक विधी पाहत, तर महार आणि म ांग समाज गावातील अनेक सार्वजनिक आणि पारंपरिक जबाबदाऱ्या पार पाडत. बुलुतेदारी ही केवळ आर्थिक देवाणघेवाणीची व्यवस्था नव्हती. ती गावाच्या सामाजिक ऐक्याचा पाया होती.

लग्न असो, बारसे असो, जत्रा असो, यात्रा असो किंवा अंत्यसंस्कार प्रत्येक प्रसंगी बलुतेदारांचा मानाचा सहभाग असे.

त्यांच्या उपस्थितीशिवाय कोणताही कार्यक्रम पूर्ण होत नसे. सण-उत्सवांच्या निमित्ताने गावातील सर्व समाजघटक एकत्र येत असत. त्यामुळे जाती-धर्मांच्या सीमा ओलांडून सामाजिक सलोखा टिकून राहण्यास मदत होत असे.

**बदलाची सुरुवात...**

स्वातंत्र्यानंतर शिक्षणाचा प्रसार झाला. युवक नोकरीसाठी शहरांकडे जाऊ लागले. कारखाने उभे राहिले. तयार वस्तू सहज उपलब्ध होऊ लागल्या. धान्याऐवजी रोख व्यवहार सुरू झाले. दुकाने, बाजारपेठा आणि औद्योगिक उत्पादनांनी पारंपरिक व्यवसायांवर मोठा परिणाम केला.



प्लास्टिकच्या भांड्यांमुळे कुंभाराचे म डके मागे पडले. कारखान्यातील तयार शेती अवजारांमुळे लोहाराचे काम कमी झाले. ट्रॅक्टर आणि आधुनिक यंत्रांमुळे सुतार व लोहार यांचे पारंपरिक कौशल्य कमी वापरले जाऊ लागले. रेडिमेड कपड्यांमुळे शिंप्यांची मागणी घटली.

मोठ्या लॉन्ड्री सेवांमुळे परीट व्यवसाय बदलला. आधुनिक सलूनमुळे पारंपरिक नाभिक व्यवसायाचे स्वरूप पूर्णपणे बदलले. आज प्रत्येक सेवा ही व्यवसाय बनली आहे. पूर्वीचे जिव्हाळ्याचे संबंध आता ग्राहक आणि सेवा पुरवठादार यापुरते मर्यादित राहिले आहेत. पूर्वी बलुतेदार गावातील प्रत्येक घराचा सदस्य मानला जात असे. आज व्यवहारात आत्मीयतेपेक्षा आर्थिक व्यवहाराला अधिक महत्त्व आले आहे.

**हरवत चाललेली कौशल्ये...**

कुंभाराच्या चाकाच आवाज आता क्वचितच ऐकू येतो. लोहाराच्या भट्टीतील धग कमी झाली आहे.

सुताराच्या हातातील पारंपरिक साधने संग्रहालयात दिसू लागली आहेत. चांभाराच्या हाताने तयार होणारी चामड्याची पादत्राणे आता औद्योगिक उत्पादनांनी घेतली आहेत. अनेक पारंपरिक कौशल्ये वृद्ध कारागिरांपुरतीच मर्यादित राहिली आहेत.

आज या समाजातील अनेक तरुण उच्चशिक्षित झाले आहेत. ते प्रशासन, पोलीस, सैन्य, उद्योग, अभियांत्रिकी, वैद्यकीय, माहिती तंत्रज्ञान, व्यवसाय आणि विविध सेवाक्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी करत आहेत. हा बदल प्रगतीचा आहे; परंतु त्याचवेळी आपल्या पूर्वजांनी जपलेले कौशल्य, लोकसंस्कृती आणि परंपरा यांचे दस्तऐवजीकरण करणे तितकेच आवश्यक आहे. बुलुतेदारी व्यवस्था पूर्वीच्या स्वरूपात परत येणे शक्य नाही. मात्र तिचा इतिहास, लोकजीवन, पारंपरिक कौशल्ये आणि सामाजिक मूल्ये पुढील पिढीपर्यंत पोहोचविणे अत्यंत गरजेचे आहे. ग्राम ीण संग्रहालये, लोककला महोत्सव, शालेय अभ्यासक्रम, कारागीर प्रशिक्षण, हस्तकला प्रदर्शन, ग्रामइतिहास लेखन आणि पारंपरिक व्यवसायांना आधुनिक बाजारपेठ उपलब्ध करून देणे ही काळाची गरज आहे.

बुलुतेदारीचा शेवट हा केवळ एका आर्थिक व्यवस्थेचा अंत नाही; तो ग्रामीण संस्कृतीतील आत्मीयता, परस्परावलंबन, विश्वास आणि सामाजिक एकोप्याच्या एका सुवर्णयुगाचा शेवट आहे. आज आधुनिकतेमुळे जीवन अधिक सुलभ झाले आहे; परंतु गावाला गावपण देणारी माणसे, त्यांची कौशल्ये, परंपरा आणि जिव्हाळा हरवू नयेत.

कारण इतिहास केवळ राजे-म हाराजांचा नसतो, तर गावगाडा उभा करणाऱ्या त्या असंख्य बलुतेदारांचाही असतो. त्यांच्या श्रमामुळेच ग्रामीण म हाराष्ट्राची संस्कृती शतकानुशतके समृद्ध राहिली. त्या वारशाचे जतन करणे ही आपल्या सर्वांची सामूहिक जबाबदारी आहे.

**- अनिल आगलावे**










नगर परिषद कार्यालय, नळदुर्ग

. तुळजापूर जि. धाराशिव Email. Id – naldurgmc@gmail.com

जाहिर आवाहन

- नळदुर्ग नगरपरिषदच्या वतीने जाहिर आवाहन करण्यात येते की, नगरपरिषद नळदुर्ग स्वच्छ सर्वेक्षण 2026 मध्ये सहभागी झालेली आहे. त्यानुषंगाने नागरिकांनी शहर स्वच्छ व सुंदर ठेवण्यासाठी सहकार्य करावे व खालील बाबींवर लक्ष केंद्रीत करावे.
- प्लास्टिक चा वापर करणे हा प्लास्टिक कचरा व्यवस्थापन नियम 2021 नुसार सिंगल युज प्लास्टिक वस्तू प्रतिबांधिल असल्याने त्याचा वापर करणे गुन्हा आहे म्हणून प्लास्टिकच्या वापरास बंदी आहे.
- या अंतर्गत 100 मायक्रोन पेक्षा कमी जाडी असलेला प्लास्टिक पिशवी, प्लास्टिक चमचे, प्लास्टिक ग्लासचा वापर बंद करावा अन्यथा नियमानुसार 5000/10000/25000 रुपये अनुक्रमे प्रथम,द्वितीय, व तृत्तीय अपराधासाठी दंड वसुल करण्याची दंडात्मक कारवाई केली जाईल व तीन महिन्याच्या कारावासाठी कार्यवाही करण्यात येईल.
- घरासमोरील किंवा गल्लीतील नाल्यात कचरा किंवा घाण टाकू नका नाल्या तुंबणार नाहीत किंवा नाल्यात पाणी साचणार नाही याची काळजी घ्यावी. सार्वजनिक ठिकाणी किंवा उघडयावर कचरा टाकू नये.
- ढगाळ वातावरण, पावसात वीज चमकत असताना सुरक्षित ठिकाणी थांबा. पावसात झाडाखाली, उंच मनोरा, पत्र्याचे शेड आदी ठिकाणी थांबू नका.
- पावसाळा सुरु झाल्याने ज्या नागरिकांचे जुने घर किंवा जुनी इमारत तसेच वाळलेले झाड पडण्याच्या स्थितीत असेल तर त्यांना तात्काळ त्याची विल्हेवाट लावण्यात यावी.
- छतावरील पाण्याचे पुनर्भरण (Rain water Harvesting) करा.
- नागरिकांनी पाण्याचा वापर जपून करावा, वृक्ष लागवड व संवर्धन करावे, सौर ऊर्जेचा वापर करावा.

| | | |
|---|---|---|
| स्वाक्षरित/- | स्वाक्षरित/- | स्वाक्षरित/- |
| मुख्याधिकारी | उपाध्यक्ष | अध्यक्ष |
| नगरपरिषद नळदुर्ग | नगरपरिषद नळदुर्ग | नगरपरिषद नळदुर्ग |



सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT



# धरणे शंभर टक्के भरली मात्र पिके जळून चालली

## नियोजनशून्य प्रशासन, शेतकऱ्यांचा संताप

**तभा वृत्तसेवा । संजय पाटील**
**पिलीव, दि.३ ऑगस्ट -**

माळशिरस तालुक्याच्या दृष्टीने वरदान ठरणाऱ्या म्हणून गणल्या जाणाऱ्या वीर, भाटघर, निरा देवधर ही धरणे शंभर टक्के भरलेली आहेत. निरा नदीलाही महापूर आला. असे असताना पिकांसाठी पाणी सोडले जात नसल्याने ऐन पावसाळ्यात पिके जळून चालली आहे. प्रशासनाच्या नियोजनशून्यतेमुळे 'पाणी उशाला, कोरड घशाला' अशी परिस्थिती पिलीवसह परिसरातील शेतकरी वर्गातून संताप व्यक्त केला जात आहे.

वीर, भाटघर, निरा देवधर या धरणात जादा झालेले पाणी निरा उजव्या कॅनालला पाणी सोडण्यात आल्याने नदीकाठच्या गावांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला. याउलट पिलीवसह परिसरातील कॅनॉलवरील फाट्यांना अद्यापपर्यंत पाणीच सोडण्यात आले नाही. त्यामुळे निमगाव, मळोली, शेंडेचिच, झिंजेवस्ती, कुसमोड, साळमुख, तांदुळवाडी आदी गावातील पिके ऐन पावसाळ्यात पाण्यावाचून जळून चालली आहेत. वाया जाणारे किंवा जादा झालेल्या पाण्याने या परिसरातील बंधारे, तलाव, तळी भरणे आवश्यक आहे. म्हणावा तसा पाऊस नसल्याने बंधारे, तलावातील पाण्याचा फायदा पिण्यासाठी, शेतीसाठी आणि जितराबांसाठी होऊ शकतो. एकीकडे प्रशासन धरणे भरल्यामुळे नदीला पाणी सोडून महापूर आणित नागरिकांचे जीवनमान धोक्यात घालत आहे. तर दुसरीकडे पाणी न सोडल्यामुळे पिके जळून चालली असल्याचे चित्र दिसून येत आहे.




### इंग्रजकालीन जॅकवेल; ओढ्याला पाणी

पिलीव येथील इंग्रजकालीन जॅकवेल (इस्पीकची) ताबडतोब दुरुस्ती करुन ओढयाला पाणी सोडावे. जेणेकरुन झिंजेवस्ती, कुसमोड, मळोली, शेंडेचिच या गावातील बंधारे, तलाव, तळी भरण्यासाठी याचा उपयोग होईल, असे पिलीव गटाचे जिल्हा परिषद सदस्य चंद्रकांत जाधव यांनी सांगितले.

### आमदारांना घालणार साकडे

अद्यापही म्हणावा तसा पाऊस झाला नाही. त्यामुळे पिलीव भागातील निरा उजव्या कॅनालवरील फाटयांना पाणी सोडून या भागातील बंधारे, तलाव, तळी भरुन द्यावीत, याबाबत आमदार उत्तमराव जानकर यांच्याकडे साकडे घालण्यात येणार आहे, असे 'कुसमोड'चे माजी सरपंच सीताराम धायगुडे यांनी सांगितले.

# जलजीवन मिशन निधी

# मागणी १३५ कोटींची, मिळाले केवळ ६ कोटी रुपये

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि ३ ऑगस्ट-**

ग्रामीण भागातील 'हर घर जल'चे स्वप्न साकार करण्यासाठी राबविण्यात येणाऱ्या जलजीवन मिशन योजनेला तब्बल १७ महिन्यांनंतर शासनाकडून निधी प्राप्त झाला असला, तरी तो अपेक्षेपेक्षा अत्यल्प असल्याने जिल्हा परिषदेच्या ग्रामीण पाणीपुरवठा विभागासमोर मोठे आर्थिक आणि प्रशासकीय आव्हान उभे ठाकले आहे. विभागाने १३५ कोटी रुपयांच्या निधीची मागणी केली होती. मात्र, त्यापैकी केवळ ६ कोटी रुपये मंजूर झाल्याने ८० कोटी रुपयांहून अधिकची प्रलंबित बिले कशी निकाली काढायची? हा प्रश्न निर्माण झाला आहे.

जिल्ह्यात जलजीवन मिशनअंतर्गत अनेक गावांमध्ये पाणीपुरवठा योजनांची कामे पूर्णत्वाच्या टप्प्यात आहेत. या योजनांची सुमारे ८० कोटी रुपयांची बिले तयार असून, निधीअभावी ती प्रलंबित आहेत. शासनाने नुकत्याच वितरित केलेल्या निधीबाबतही विशिष्ट निकष निश्चित केले आहेत. त्यानुसार ७५ ते १०० टक्के काम पूर्ण झालेल्या योजनांनाच प्राधान्य द्यावे लागणार आहे.

सध्या जिल्ह्यात जवळपास ६०० योजना आहेत. त्यामुळे उपलब्ध अवघ्या ६ कोटी रुपयांचा निधी कोणत्या कामांना द्यायचा, याबाबत प्रशासनासमोर मोठी कसरत उभी राहिली आहे. निधीचे नियोजन करताना प्राधान्यक्रम ठरविणे हीच विभागासाठी मोठी डोकेदुखी ठरत आहे. दि.८ मार्च २०२५ रोजी जलजीवन मिशनसाठी ९ कोटी रुपयांचा निधी प्राप्त झाला होता. त्यावेळीही ६० ते ७० कोटी रुपयांची बिले प्रलंबित होती.

मागील वेळी निधी आल्यानंतर बिलांच्या मंजुरीसाठी ठेकेदारांनी ग्रामीण पाणीपुरवठा विभागात मोठी गर्दी केली होती. राजकीय पातळीवरुनही शिफारशी आणि फोनाफोनी वाढली होती. मात्र, यावेळी उपलब्ध निधी अत्यल्प असल्याने ठेकेदारांनाही अपेक्षित दिलासा मिळण्याची शक्यता कमी असल्याने विभागात पूर्वीसारखी लगबग दिसून येत नाही.

### निकषानुसार निधीचे वितरण

सुमारे ८० कोटी रुपयांची बिले प्रलंबित आहेत. शासनाकडे १३५ कोटी रुपयांच्या निधीची मागणी केली होती. ६ कोटी रुपये प्राप्त झाले आहेत. त्यामुळे उपलब्ध निधी कोणत्या कामांना द्यायचा? याबाबत निकषानुसार निर्णय घ्यावा लागणार आहे, असे जिल्हा परिषदेकडील ग्रामीण पाणीपुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता प्रसाद काटकर यांनी सांगितले.




# मिळकतकरावर ६ टक्के सवलतीची मुदत ३१ ऑगस्टपर्यंत

## ऑनलाइन कर भरल्यास ६ टक्के, रोखीने किंवा धनादेशाद्वारे भरल्यास ५ टक्के सवलत

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.३ ऑगस्ट-**

सोलापूर महानगरपालिकेच्या २०२६-२७ या आर्थिक वर्षातील मिळकतकराच्या एकरकमी भरण्यावर मिळणाऱ्या सवलतीची मुदत आता ३१ ऑगस्ट २०२६ पर्यंत वाढविण्यात आली आहे. मिळकतदारांची मागणी तसेच लोकप्रतिनिधींच्या सूचनांचा विचार करून महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी हा निर्णय घेतला आहे.

महापालिकेने यंदाच्या आर्थिक वर्षातील मिळकतकराची देयके ६ एप्रिल २०२६ रोजी ऑनलाइन पद्धतीने संकेतस्थळावर उपलब्ध करून दिली होती. एसएमएसद्वारेही कर भरण्याची लिंक वेळोवेळी पाठविण्यात आली. मात्र, सध्या सुरू असलेल्या विशेष सखोल मतदार पुनरिक्षण मोहिमेमुळे छापील देयकांचे वितरण सर्व मिळकतदारांपर्यंत पूर्ण होऊ शकलेले नाही. त्यामुळे करदात्यांची गैरसोय टाळण्यासाठी सवलतीची मुदत वाढविण्यात आल्याचे महापालिकेने स्पष्ट केले आहे.



छापील देयकांचे वाटप काही प्रमाणात करण्यात आलेले आहे. सध्या शासनाकडून मतदार विशेष सखोल पुर्नरिक्षण कार्यक्रमाचे कामकाज सुरु असल्याने छापील देयके सर्वांना वाटप करणे शक्य झालेले नाही. तथापी छापील देयकांची छपाई करणेस काही कालावधी लागणार असल्याने मिळकत कर भरण्यासाठी महापालिकेच्या संकेतस्थळावर ऑनलाईन सेवा यामध्ये 'मिळकत कर भरणे' हा पर्याय निवडून मिळकत भरता येईल. तसेच मिळकत कर भरण्याकरीता फफोनपे, गुगलपे अशा सर्व प्रकारच्या पेमेंट गेटवेची सुविधा कार्यान्वित करण्यात आलेली आहे.

## ▸▸ महत्वाचे...

### चिकन भाजी करण्यावरुन पत्नी, मुलाला मारहाण

**सोलापूर, दि.३ ऑगस्ट-**

चिकन भाजी तयार करुन देण्याच्या कारणावरून दारू पिऊन आलेल्या एका पतीने आपल्या पत्नीला व मुलाला मारहाण करून जखमी केल्याप्रकरणी पतीसह दोघाजणांविरुद्ध जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अनिल सकट आणि कलाबाई सकट (रा.मड्डी वस्ती, सोलापूर) असे गुन्हा दाखल करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत. याबाबत शालन अनिल सकट( वय-३८, रा. मड्डी वस्ती सोलापूर) यांनी फिर्याद दिली आहे. यातील फिर्यादी दि.१ ऑगस्ट २०२६ रोजी रात्री ९ वा चे सुमारास घरी असताना आरोपी नवरा हा दारू पिवून घरी आला व फिर्यादीस आता चिकनची भाजी करून दे म्हणून शिवीगाळ करून हाताने व लाथाबुक्यांनी मारहाण करून जखमी केले. तसेच मुलगा करण यास स्टीलच्या उलताऱ्याने चेह-यावर मारहाण करून जखमी केले आहे. यावेळी आरोपी कलाबाई सकट हिने शिवीगाळ करून आमचे घरात रहायचे नाही येथून निघून जा, तुम्ही आमचे नादाला लागलात तर बघुन घेईन अशी धमकी दिल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. पोलीस हवालदार घोडके हे पुढील तपास करीत आहेत.

---

### रिल्स, फॉलोअर्स कमी का केले असे म्हणत मारहाण, दोघांविरुध्द गुन्हा

**सोलापूर, दि.३ ऑगस्ट-**

इन्स्टाग्रामवरील रिल्स व फॉलोवर्स कमी का केले म्हणून दोघा मावस भावांना शिवीगाळ करून मारहाण केल्याप्रकरणी जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात दोघाजणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गजानन काळे आणि मल्लिकार्जुन सुलतानपुरे (रा.धोत्रेकर वस्ती, भवानी पेठ, सोलापूर) अशी गुन्हा दाखल करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत. याबाबत रोहित व्हनप्पा गोडनवरू (रा.धोत्रेकर वस्ती, भवानी पेठ, सोलापूर) यांनी फिर्याद दिली आहे. यातील फिर्यादी दि १ ऑगस्ट रोजी ९.२० वा चे सुमारास घराजवळील भाईकट्टी यांचे गोडावून समोर बसले होते. त्यावेळी अरोपी गजानन काळे हा त्याठिकाणी आला व तु माझे इन्स्टाग्रामवरील रिल्स व फॉलोअर्स कमी का केले असे म्हणून शिवीगाळ करत स्टीलच्या कडयाने डोक्यात मारले. भांडणाचा आवाज ऐकून मल्लिकार्जुन सुलतानपुरे हा तेथे आला व तु गजानन सोबत भांडण का करतो असे म्हणून फिर्यादीला शर्टाची गच्ची धरून शिवीगाळ करत चापटा मारल्या. यादरम्यान फिर्यादीचा मावस भाऊ सतिश वडलूर हा भांडण सोडविण्यास आला असता त्यालादेखील शिवीगाळ करून मारहाण केल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. पोलीस हवालदार दुधाळे हे गुन्ह्याचा पुढील तपास करीत आहेत.

# ऐन पावसाळ्यात पाण्याची बोंब!

## जिल्ह्यातील ३२ गावात ३३ टँकरने पाणीपुरवठा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.३ ऑगस्ट-**




सोलापूर जिल्ह्यात पावसाने हजेरी लावली असली, तरी ग्रामीण भागातील पाणीटंचाई अद्याप कायम असल्याचे वास्तव समोर आले आहे. जिल्ह्यातील ३२ गावांमध्ये सध्या ३३ टँकरद्वारे पिण्याच्या पाण्याचा पुरवठा केला जात असून, सुमारे ७५ हजार ५१८ नागरिकांना या व्यवस्थेवर अवलंबून राहावे लागत आहे. पावसाळ्यातही टँकरची गरज भासत असल्याने जलस्रोतांचे पुनर्भरण आणि दीर्घकालीन जलव्यवस्थापनाचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.

जिल्हा परिषदेच्या ग्रामीण पाणी पुरवठा विभागाच्या माहितीनुसार, अक्कलकोट तालुक्यात ४, बार्शीमध्ये १, करमाळ्यात ६, माढ्यात ७, माळिशरसमध्ये ४, उत्तर सोलापूरमध्ये ५, दक्षिण सोलापूरमध्ये ३ आणि सांगोला तालुक्यात ६ टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू आहे. विशेष म्हणजे मंगळवेढा, पंढरपूर आणि मोहोळ या तालुक्यांमध्ये सध्या कोणत्याही गावाला टँकरची आवश्यकता भासलेली नाही.

ऐन पावसाळ्यातही अनेक गावांतील विहिरी, बोअरवेल आणि पारंपरिक जलस्रोत पूर्ण क्षमतेने भरले नसल्याने प्रशासनाला टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू ठेवावा लागत आहे. दुष्काळी पट्ट्यातील गावांमध्ये ही समस्या अधिक गंभीर असून, सुरक्षित पिण्याच्या पाण्यासाठी नागरिकांना टँकरवरच विसंबून राहावे लागत आहे.

दरवर्षी उद्भवणाऱ्या या परिस्थितीवर कायम स्वरूपी तोडगा काढण्यासाठी जलसंधारण, पर्जन्यजल साठवण, शेततळी, नाला खोलीकरण आणि भूजल पुनर्भरणाच्या कामांना अधिक गती देण्याची आवश्यकता आहे. अन्यथा पावसाळ्यातही टँकरवर अवलंबून राहण्याची वेळ कायम राहू शकते, असे जलतज्ज्ञांकडून सांगण्यात येते.

# गरोदर महिलांसाठी गावाजवळच उपलब्ध होणार सोनोग्राफी सेवा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.३ ऑगस्ट-**

ग्रामीण भागातील गर्भवती महिलांना वेळेत आणि मोफत सोनोग्राफीची सुविधा उपलब्ध व्हावी, यासाठी जिल्हा परिषद आरोग्य समितीने महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. संबंधित परिसरातील उपलब्ध सोनोग्राफी केंद्रांशी प्राथमिक आरोग्य केंद्रांचा समन्वय करुन प्रत्येक गरोदर महिलेला आवश्यक तपासणी वेळेत मिळावी, अशा सूचना जिल्हा परिषदेचे शिक्षण व आरोग्य समितीचे सभापती चेतनसिंह केदार-सावंत यांनी दिल्या.

आंधळगाव प्राथमिक आरोग्य केंद्रात झालेल्या आरोग्य समितीच्या बैठकीत मंगळवेढा तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्रांच्या कामकाजाचा सविस्तर आढावा घेण्यात आला. आरोग्य कर्मचाऱ्यांची रिक्त पदे, उपलब्ध सुविधा, सेवांमधील अडचणी आणि ग्रामीण भागातील आरोग्य सेवा अधिक सक्षम करण्याबाबत सखोल चर्चा झाली.

आषाढी वारीदरम्यान वारकऱ्यांना अखंड आणि दर्जेदार आरोग्य सेवा उपलब्ध करून देणाऱ्या आरोग्य विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या कार्याचे सभेत विशेष कौतुक करण्यात आले. त्यांच्या उल्लेखनीय सेवेसाठी अभिनंदनाचा ठरावही एकमताने मंजूर करण्यात आले.

या बैठकीस जिल्हा परिषद सदस्य व्यंकटराव भालके, सविता कोकाटे, सोनाली कडते, करुणा शिवशरण, प्रशांत कडते, जनार्दन शिवशरण, जिल्हा वैद्यकीय अधिकारी डॉ. सतीश कोपुरवाड यांच्यासह सर्व तालुका वैद्यकीय अधिकारी आणि आरोग्य विभागाचे अधिकारी उपस्थित होते.



# जवाहरलाल नेहरु वसतिगृहातील सुविधांचा घेण्यात आला आढावा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.३ ऑगस्ट -**

जिल्हा परिषद सोलापूरच्या अखत्यारीतील जवाहरलाल नेहरू विद्यार्थी वसतिगृहाची पाहणी करून विद्यार्थ्यांना अधिक सुरक्षित, स्वच्छ आणि दर्जेदार सुविधा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक सूचना देण्यात आल्या असून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक पायाभूत सुविधा सक्षम करण्यावर यावेळी विशेष भर देण्यात आल्याचे सोलापूर जिल्हा परिषद उपाध्यक्ष इंद्रजीत पवार यांनी सांगितले.

विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध असलेली निवास व्यवस्था, स्वच्छता, पिण्याच्या पाण्याची सुविधा, सुरक्षा व्यवस्था, मूलभूत सोयी-सुविधांची सविस्तर पाहणी करण्यात आली. विद्यार्थ्यांच्या दैनंदिन गरजांचा आढावा घेत सुविधांमध्ये आवश्यक ते बदल व सुधारणा करण्याबाबत संबंधित अधिकाऱ्यांना निर्देश देण्यात आले. विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शैक्षणिक वातावरणासोबत सुरक्षित आणि सुसज्ज निवास सुविधा मिळणे ही प्रशासनाची जबाबदारी असल्याचे यावेळी अधोरेखित करण्यात आले. वसतिगृहातील सुविधा अधिक परिणामकारक आणि दर्जेदार करण्यासाठी आवश्यक उपाययोजना तातडीने राबविण्याच्या सूचनाही देण्यात आल्या. यावेळी कार्यकारी अभियंता असिफ खैरदी, सहाय्यक अभियंता चेतन वाघमारे, भाजप ओबीसी मोर्चाचे जिल्हाध्यक्ष विनायक सुतार यांच्यासह जिल्हा परिषद बांधकाम विभागाचे संबंधित अधिकारी उपस्थित होते.

### आवश्यक सुधारणा करण्याच्या सूचना

विद्यार्थ्यांना केवळ निवासाची सुविधा देणे पुरेसे नाही, तर त्यांना सुरक्षित, स्वच्छ आणि अभ्यासासाठी पोषक वातावरण उपलब्ध करून देणे ही जिल्हा परिषदेची जबाबदारी आहे. जवाहरलाल नेहरू विद्यार्थी वसतिगृहातील सुविधांचा आढावा घेऊन आवश्यक सुधारणा तातडीने करण्याच्या सूचना संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या आहेत. विद्यार्थ्यांच्या हिताशी कोणतीही तडजोड केली जाणार नाही. असे जिल्हा परिषद उपाध्यक्ष इंद्रजीत पवार यांनी सांगितले.

### आवश्यक दुरुस्ती व सुधारणा प्राधान्याने घेणार

वसतिगृहातील इमारत, पिण्याचे पाणी, स्वच्छता आणि इतर मूलभूत सुविधांची तांत्रिक पाहणी करण्यात आली आहे. पाहणीत आढळलेल्या त्रुटी दूर करून आवश्यक दुरुस्ती व सुधारणा प्राधान्याने करण्यात येतील. विद्यार्थ्यांना अधिक सुरक्षित आणि दर्जेदार सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी बांधकाम विभागाकडून आवश्यक ती कार्यवाही केली जाईल.असे कार्यकारी अभियंता असिफ खैरदी यांनी सांगितले.

# प्रक्षाळ पूजेनिमित्त श्रीविठ्ठल-रुक्मिणी मुर्तींना करण्यात आले अलंकार परिधान

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर दि.३ ऑगस्ट -**

आषाढी एकादशी दिनांक २५ जुलै रोजी संपन्न झाली. दरवर्षी यात्रेला भाविकांची होणारी गर्दी लक्षात घेता, चांगला महुर्त व दिवस पाहून श्रींचा पलंग काढून भाविकांना चोवीस तास दर्शन उपलब्ध करून देण्यात येते. त्यानुसार दि.१६ जुलै रोजी श्रींचा पलंग परंपरेनुसार काढण्यात आला होता व श्री विठ्ठलास लोड व श्री रूक्मिणीमातेस तक्या देण्यात आला होता. काकडा आरती, पोशाख, धुपारती, शेजारती इत्यादी राजोपचार प्रक्षाळपुजेपर्यंत बंद ठेवून भाविकांना जास्तीत जास्त वेळ दर्शन उपलब्ध करून देण्यात येत होते.

सोमवार, दि. ३ ऑगस्ट रोजी मुहूर्तानुसार श्री .विठ्ठलाची व श्री. रूक्मिणी मातेची प्रक्षाळपुजा अनुक्रमे मंदिर समिती सदस्य ह.भ.प. प्रकाश जवंजाळ व सहअध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांच्या हस्ते संपन्न झाली. सदर पुजेच्या सुरवातीला प्रभारी कार्यकारी अधिकारी सचिन इथापे यांच्या हस्ते श्रींस पहिले स्नान घालण्यात आले.




श्री विठ्ठलास सोन्याचा मुकुट, कौस्तुभ मणी, मोत्याचा तुरा, नाम निळाचा, दंडपेट्या जोड मोठा, हिऱ्याची कंगन जोड, शिरपेच मोठा दहा लोक असलेला, बाजीराव कंठी, मोत्याची कंठी दोन पदरी, मोठी एक पदरी पदकास लोलक असलेली मस्त्य जोड, तोडे जोड, सूर्य कळ्यांचा हार, पैंजण जोड, अष्टपैलू मण्याची कंठी, आठ पदरी तुळशीची माळ.

श्री रुक्मिणी मातेस सोन्याचा मुकुट, वाक्य जोड, तोडे जोड, चांदवड जोड, चिंचपेटी तांबडी, जवमणी पदक, जवेच्या माळ, लक्ष्मी हार, पुतळ्याची माळ, मोहरांची माळ, हायकोल, सरी कंबर पट्टा इत्यादी अलंकार परिधान करण्यात आले.


मंदिर समितीच्या श्री संत तुकाराम भवन येथील अन्नछत्रांमध्ये विशेष भोजन प्रसाद ठेवण्यात आला होता. त्याचा सुमारे १५०० ते २००० भाविकांनी लाभ घेतला. याशिवाय, देवाचा शिणवटा/थकवा घालविण्यासाठी आर्युवेदीक काढा श्रीस नैवेद्य म्हणून रात्री शेजारतीवेळी दाखविण्यात येणार आहे. आजपासून श्री.विठ्ठलास व श्री.रूक्मिणी मातेस पहाटे होणारी काकडा आरती, नित्यपुजा, महानैवेद्य, पोषाख, धुपारती व शेजारती इथेपर्यंतचे सर्व राजोपचार परंपरेनुसार सुरू करण्यात येत आहेत.

या पूजेच्या वेळी मंदिरात सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर, सदस्या शकुंतला नडगिरे, संभाजी शिंदे, ह.भ.प.प्रकाश जवंजाळ, विभाग प्रमुख भीमाशंकर सारवडकर, सहाय्यक विभाग प्रमुख संदीप कुलकर्णी, पांडुरंग दशपुत्रे आदी उपस्थित होते.

## ज्ञानामृत आनंदलहरी १५२२

**हरिचे दर्शन पाहू डोळा भरूनी ।**
**मस्तक चरणीं ठेवूनिया ।**

आपण कोण आहोत याचा खरा परिचय होत नसल्याने निःस्वार्थ भावनेने कांही करणे हे संसारात अडकलेल्या जीवाच्या बाबतीत तसे खरोखरच अवघड आहे. निःस्वार्थ भावने देवाणघेवाण तर सोडाच पण बरेच लोक ईश्वराची भक्ती किंवा दान धर्म ही निःस्वार्थ भावने करीत नाही. ईश्वराची भक्ती करण्यामागे कांहीतरी इच्छित लपलेले असते. किंवा स्पष्टपणे ईश्वराला कांहीतरी मागण्या घालून त्या पूर्ण व्हाव्यात म्हणून त्याची भक्ती केली जाते. दानधर्माच्या बाबतीत चार आण्याचे दान आणि बारा आण्याची प्रसिध्दी ! हा तर आपणा सर्वांचा नित्याचा अनुभव आहे. बऱ्याच ठिकाणी अत्यंत छोटासा दानाचा, सेवेचा कार्यक्रम; पण खूप गाजावाजा करून केला जातो. अर्थात, दान, धर्म, मदतीच्या मागे प्रसिध्दी दडल्याचे स्पष्ट जाणवते. सर्वच लोक असे करतात असे नव्हे. थोडक्यात निःस्वार्थ भावाने कांही करण्याची मानसिकता दुर्मिळ असल्याचे आपणाला मान्यच करावे लागेल. असे असले तरी सेनाजीसारखे महात्मे संत, महात्म्यांची, रंजल्या गांजल्यांची सेवा, ईश्वराची भक्ती निःस्वार्थ भावने करतात. यांना मोक्ष, मुक्ती, आर्थिक समृध्दीची गरज नसते. म्हणूनच खऱ्या अर्थाने असे महात्मे, मोक्ष सायुज्यता' सेना म्हणे नये चित्तीं', याप्रमाणे वागत असल्याने ते सुखी, समाधानी असतात. आपली मानसिकता पक्की असेल तर आपणालाही असे वागता येणे शक्य आहे. खरे आनंद अशा वागण्यातच आहे.



महाराष्ट्राचे आराध्य दैवत असणारा पंढरीचा पांडुरंग हरिभक्तांचे सर्वस्व असतो. हरिभक्तांना पंढरीचा पांडुरंग म्हणजे जीव की प्राण वाटतो. त्याला पाहण्यात, भेटण्यात त्याचे नामस्मरण करण्यात या भक्तांना सर्वस्वी आनंद होतो. पंढरीचा पांडुरंग हा केवळ सांगण्या, बोलण्या, ऐकण्याचा विषय नसून तो प्रत्यक्ष अनुभवण्याचा विषय आहे. हा विषय संसारात अडकलेल्या प्रत्येक जीवाने अनुभवणे आवश्यक आहे. हा विषय प्रत्यक्ष अनुभवला तर ताण, तणाव चिंता कमी होते. स्वार्थ, द्वेष, काम, क्रोध, अहंकार, मत्सर कमी होऊन समता, बंधुता, निःस्वार्थ प्रेम वाढीस लागतात. म्हणून सेनाजी सर्व भक्तजणांना विनंतीपूर्वक सल्ला देतात की, आपण सर्व सांसारिक जीवांनी पंढरीला जावे. त्याचे दर्शन डोळे भरून घ्यावे. त्याच्या समचरणावर चिंता, ताणतणावाने सांसारिक ओझ्याने भरलेले मस्तक टेकवावे. पंढरीच्या समचरणात सांसारिक जीवाचे सर्व ओझे सहन करण्याची ताकद आहे. त्याचबरोबर मनःपूर्वक निःस्वार्थ भावने दर्शन घेणाऱ्याच्या मनात मानवता निर्माण करण्याचे सामर्थ्य आहे. सेनाजींच्या, हरिचे दर्शन पाहू डोळा भरूनी । मस्तक चरणीं ठेवूनिया ।, सेना म्हणे माझी हीच आशा । देवा घ्यावी पूर्ण सेवा पांडुरंगा । , या म्हणण्या प्रमाणे प्रत्येकांनी एकदा तरी पंढरी दर्शन अनुभवावे. तसेच पंढरी हे साक्षात पृथ्वीवरील भूवैकुंठ असल्याने त्याचे दर्शन घ्यावे. तसेच पांडुरंगानी आपलीही सेवा स्वीकारुन घ्यावी अशी अपेक्षा करावी असे आम्हास याप्रसंगी वाटते.

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

# सहकारातून विकासाची नवी दिशा

## सेवक पतसंस्थेच्या सभेत पालकमंत्री गोरे यांचे प्रतिपादन; वार्षिक कामकाजाचा घेतला आढावा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ ऑगस्ट-**

सहकार ही केवळ आर्थिक व्यवहारांची व्यवस्था नसून परस्पर विश्वास, पारदर्शकता आणि सामूहिक प्रगतीचे प्रभावी चळवळ असल्याचे त्यांनी सांगितले. सभासदांचा विश्वास जपत आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, पारदर्शक कारभार आणि लोकाभिमुख उपक्रमांच्या माध्यमातून पतसंस्थेने भविष्यातही आदर्श निर्माण करावा, असे आवाहन पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी केले.

सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक सेवक सहकारी पतसंस्थेची ९१ वी वार्षिक सर्वसाधारण सभा उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. या सभेला राज्याचे ग्रामविकास व पंचायतराज मंत्री तथा सोलापूरचे पालकमंत्री जयकुमार गोरे प्रमुख उपस्थित होते. संस्थेच्या वार्षिक कामकाजाचा आढावा, आर्थिक प्रगती, सभासदांच्या हितासाठी राबविण्यात आलेले उपक्रम आणि भविष्यातील विकास आराखड्यावर यावेळी चर्चा करण्यात आली. त्यावेळी ते बोलत होते. सभेदरम्यान संस्थेच्या आर्थिक वाटचालीचा आणि विविध उपक्रमांचा आढावा घेण्यात आला. सभासदांच्या हिताला प्राधान्य देत संस्थेने सातत्याने सक्षम कामगिरी केली असून,



आगामी काळात अधिक व्यापक विकास साधण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला. याप्रसंगी नवनियुक्त विधानपरिषद आमदार राजेंद्र राऊत यांचा मान्यवरांच्या उपस्थितीत भव्य सत्कार करण्यात आला. कार्यक्रमास आमदार सचिन कल्याणशेट्टी, आमदार देवेंद्र कोठे, माजी आमदार राजन पाटील, दीपक पाटील, राम सातपुते, म हापौर विनायक कोंड्याल, जिल्हा परिषद अध्यक्ष दीपक वैद्य, विजय गरड, भाजप सोलापूर पूर्व जिल्हाध्यक्ष शशिकांत चव्हाण, शहराध्यक्ष रोहिणी तडवळकर, नगरसेवक नरेंद्र काळे, माजी उपमहापौर दिलीप कोल्हे उपस्थित होते.



## श्रीकांत बंडगर यांची पंजाब कुस्ती प्रशिक्षकपदी निवड

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ ऑगस्ट-**

खेडेगावातील एका सामान्य कुटुंबातून आलेल्या श्रीकांत बंडगर यांची पंजाब कुस्ती प्रशिक्षकपदी शासकीय निवड झाली.

त्यांच्या या उत्तुंग आणि अभिमानास्पद यशाबद्दल गोल तालीम बहुउद्देशीय सेवाभावी संस्था' व मित्रमंडळींच्या वतीने त्यांचा नागरी सत्कार करण्यात आला. या सत्कार समारंभादरम्यान माजी नगरसेवक सुरेश पाटील यांनी कुस्तीपटूंच्या व्यथा मांडत खेळाडूंना शासकीय पाठबळ मि ळण्याची जोरदार मागणी केली. याप्रसंगी गोल तालीम बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष योगेश सलगर, काशिनाथ स्वामी, विकास चीनकेरी, श्रीकांत कट्टीमनी, राघवेंद्र कडली, सुरज पाटील, रत्नाकर नरवडे, बाळू माने, नागेश सूळ, ओम धुळे, हिरालाल अटे, अनिरुद्ध कुंदुर, विठ्ठल यमगर, अमोल बंडगर, दिनकर बंडगर, विनायक जाधव उपस्थित होते.

## आयुक्त डॉ. ओम्बासे यांची मतदान केंद्रांवर पाहणी

### एसआयआर २०२६ : एकही पात्र मतदार वंचित राहू नये

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ ऑगस्ट-**

विशेष सखोल पुनरीक्षण -२०२६ मोहिमेअंतर्गत सोलापूर महानगरपालिकेचे आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी रविवारी शहरातील विविध मतदान केंद्रांना भेट देत सुरू असलेल्या मतदार यादी पुनरीक्षणाच्या कामाची प्रत्यक्ष पाहणी केली. प्रत्येक पात्र नागरिकाचे नाव मतदार यादीत समाविष्ट व्हावे आणि कोणताही मतदार वंचित राहू नये, यासाठी अधिकारी-कर्मचाऱ्यांनी समन्वयाने काम करण्याचे निर्देश त्यांनी दिले.

भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार १ ऑगस्ट ते १ सप्टेंबरदरम्यान विशेष सखोल पुनरीक्षण मोहीम राबविण्यात येत



आहे. या पार्श्वभूमीवर आयुक्तांनी एम्प्लॉयमेंट चौक येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर मेमोरियल स्कूल, जुळे सोलापूरमधील भारती विद्यापीठ बाल विकास मंदिर, नई जिंदगी परिसरातील नॅशनल उर्दू स्कूल, सोशल स्कूल तसेच राम वाडी येथील अण्णासाहेब पाटील महाविद्यालय (कॅम्प प्रशाला) येथील मतदान केंद्रांना भेट दिली.

यावेळी त्यांनी बूथ लेव्हल अधिकारी यांच्याकडून मतदार यादी पुनरीक्षणाच्या कामाचा आढावा घेतला. मतदान केंद्रांवर मतदार याद्या नागरिकांच्या पाहणीसाठी उपलब्ध आहेत का, मतदार नोंदणी, नाव दुरुस्ती, पत्ता बदल यासाठी येणाऱ्या नागरिकांना आवश्यक मार्गदर्शन मिळत आहे का, अर्ज व कागदपत्रांची पूर्तता सुरळीत होत आहे का, याची त्यांनी प्रत्यक्ष खात्री केली.

या पाहणी दौऱ्यात अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे, विभागीय अधिकारी जावेद पानगल, राघवेंद्र गयाधनकर, शाम कन्ना, प्रकाश सावंत, रजाक पेंढारी, अमर कादे, उपस्थित होते.

## पदवीसोबत कौशल्यही महत्त्वाचे : डॉ. ढेरे

### एलबीपीएम महाविद्यालयात क्रिएटिव्ह स्किलिंग ट्रेनिंग प्रोग्रामचा शुभारंभ

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ ऑगस्ट-**

आजची स्पर्धा ही केवळ पदवीची नाही, तर कौशल्याची आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता, डिजिटल तंत्रज्ञान आणि सर्जनशील विचारशक्ती ही उद्याच्या जगाची नवी भाषा आहे. या भाषेवर प्रभुत्व मिळवणारे विद्यार्थीच भविष्याचे नेतृत्व करतील. कृत्रिम बुद्धिमत्तेच्या युगात शिकणे थांबले, तर प्रगतीही थांबते. त्यामुळे प्रत्येक विद्यार्थ्यांनी काळाच्या पुढे राहण्याची तयारी ठेवली पाहिजे असे प्रतिपादन प्राचार्य डॉ. सुरेश ढेरे यांनी केले.

सातरस्ता मोदीखाना येथील रयत शिक्षण संस्थेच्या लक्ष्मीबाई भाऊराव पाटील महिला महाविद्यालय आणि अगस्त्य इंटरनॅशनल फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'क्रिएटिव्ह स्किलिंग ट्रेनिंग प्रोग्राम'च्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. यावेळी प्रशिक्षक ऋषिकेश जेऊरकर यांची प्रमुख उपस्थिती होती. या प्रशिक्षण कार्यक्रमात डिजिटल स्किल्स, क्रिएटिव्ह स्किल्स, कृत्रिम बुद्धिमत्ता, नवतंत्रज्ञानाचा वापर, संवाद कौशल्य, नवोपक्रम आणि रोजगाराभिमुख कौशल्यांचे प्रशिक्षण दिले जाणार आहे. या कार्यक्रमास डॉ. नागोराव भुरके, डॉ. संतोष मारकवाड, प्रा. राशद शेख यांची उपस्थिती होती.



**कौशल्य विकास हीच सर्वात मोठी गुंतवणूक**

यावेळी प्राचार्य डॉ. ढेरे म्हणाले की, शिक्षणाचा खरा उद्देश केवळ पदवी देणे नाही, तर व्यक्तीला सक्षम, स्वावलंबी आणि समाजोपयोगी बनविणे हा आहे. येणाऱ्या काळात कृत्रिम बुद्धिम त्ता अनेक क्षेत्रांचे स्वरूप बदलणार आहे. अशा वेळी विद्यार्थिनींनी बदलांना घाबरण्याऐवजी त्यांना स्वीकारून नव्या संधींचे स्वागत केले पाहिजे. महाविद्यालयातून नोकरी शोधणाऱ्या नव्हे, तर रोजगार आणि संधी निर्माण करणाऱ्या विद्यार्थिनी बाहेर पडल्या पाहिजेत. त्यासाठी कौशल्य विकास हीच सर्वात मोठी गुंतवणूक आहे.

## सुप्रभात

### आजचा दिवस

वार : मंगळवार,
दि. ४ ऑगस्ट २०२६
विक्रम संवत् २०८३ ।
शके -१९४८
संवत्सर - पराभव
मास - आषाढ कृ. षष्ठी
ऋतु - वर्षा ।
नक्षत्र- रेवती (२१.५३)
योग - धृती (१९.३२)
करण - गरज (१०.३२)
राहू काळ : मंगळवार
स. ०३.०० ते ०४.३०
दिनविशेष :
१८५४: जपानच्या जहाजांवर अधिकृतपणे 'हिनोमारा' राष्ट्रध्वजाचा वापर सुरू झाला.१८७०: लंडन येथे 'ब्रिटिश रेड क्रॉस सोसायटी'ची स्थापना झाली.१९१४: पहिल्या महायुद्धात जर्मनीने बेल्जियमवर चढाई केली व युनायटेड किंगडमने जर्मनीविरुद्ध युद्ध पुकारले. जन्म१७३०: पानिपतच्या तिसऱ्या युद्धातील मराठ्यांचे सरसेनापती सदाशिवराव भाऊ यांचा जन्म.१८१८: प्रसिद्ध फॅशन ब्रँड 'लुई व्हिटोन'चे संस्थापक लुई व्हिटोन यांचा जन्म.



## ए.जी. पाटील अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांचा 'वाहन वेग शोध प्रणाली' प्रकल्प

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ ऑगस्ट-**

ए. जी. पाटील इन्स्टिट्यूटम धील इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन अभियांत्रिकीच्या कु. ए. एस. पाटील, कु. एस. एम. पठाण आणि कु. आर. बी. पवार यांनी प्रा. पी. बी. साबळे यांच्या मार्गदर्शनाखाली 'व्हिकल स्पीड डिटेक्शन सिस्टीम' हा नाविन्यपूर्ण प्रकल्प विकसित केला आहे. या प्रकल्पासाठी प्रकल्प सम न्वयक प्रा. आर. बी. बिराजदार यांचे मार्गदर्शन लाभले.

या प्रणालीमध्ये सेन्सर तंत्रज्ञान, मायक्रोकंट्रोलर आधारित नियंत्रण प्रणाली, डिजिटल स्पीड मापन आणि रिअल-टाइम डेटा प्रक्रिया तंत्रज्ञानाचा वापर करण्यात आला आहे. याद्वारे वाहनांचा वेग अचूकपणे मोजता येतो आणि वेगमर्यादा उल्लंघन करणाऱ्या वाहनांची माहिती त्वरित मिळवणे शक्य होते. रस्ते अपघात कमी करणे, वाहतूक नियंत्रण अधिक प्रभावी करणे आणि स्मार्ट ट्रॅफिक व्यवस्थापनात मदत करणे हे या प्रकल्पाचे प्रमुख उद्दिष्ट आहे. विद्यार्थ्यांच्या या समाजोपयोगी उपक्रमाचे संस्थेमार्फत कौतुक करण्यात आले. या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष एस. ए. पाटील, सचिव एस. एस. पाटील, कॅम्पस डायरेक्टर डॉ. एम. ए. चौगुले, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्ही. व्ही. पोतदार आणि विभागप्रमुख डॉ. आर. व्ही. दरेकर यांनी विद्यार्थी आणि प्रकल्प मार्गदर्शक प्रा. पी. बी. साबळे यांचे अभिनंदन केले.

## न्यू बुधवार पेठेतील मंत्री चंडक कॉम्प्लेक्समध्ये वृक्षारोपण



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ ऑगस्ट-**

पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत न्यु बुधवार पेठेतील मंत्री चंडक कॉम्प्लेक्समधील गणेश मंदिर परिसरात रविवारी (दि. २) सकाळी वृक्षारोपण कार्यक्रम पार पडला. प्रभागाचे नूतन नगरसेवक गौतम कसबे यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी मंत्री चंडक कॉम्प्लेक्सचे चेअरमन अ‍ॅड. संजीव सदाफुले यांच्या हस्ते नगरसेवक गौतम कसबे यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी सदाफुले यांनी कॉम्प्लेक्समधील प्रलंबित नागरी सुविधा व विकासकामांचा आढावा मांडत ती लवकरात लवकर पूर्ण करण्याची मागणी केली. कार्यक्रमास उपाध्यक्ष अमोल सावंत, कोषाध्यक्ष अभिमन्यू शिंदे, शैलेंद्र सोनकांबळे, सुनके, महाकाळ, राजेंद्र आगरकर, रत्नदीप कांबळे, अरुण भालेराव, नुले, चित्तरंजन सातपुते, प्रा. धनंजय शहा, अ‍ॅड. सिद्धांत सदाफुले, अश्विन सोनवणे, राजू नारायणकर, श्रीनिवास कसबे उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी चंदन आबुटे, सुनके, अभिमन्यू शिंदे आणि शाम शिंगे यांनी परिश्रम घेतले. अभिमन्यू शिंदे यांनी आभार मानले.

## सोलापूरचे मनीष रावत विजेते

### पुण्यातील पहिल्या राज्य मानांकित टेबल टेनिस स्पर्धेतील कामगिरी

**सोलापूर, दि. ३ ऑगस्ट -**

पुण्यातील प्रसिद्ध डेक्कन जिमखाना येथे स्वर्गीय डॉ. प्रमोद मुळे यांच्या स्मरणार्थ आयोजित पहिल्या राज्य मानांकित टेबल टेनिस स्पर्धे त येथील मनीष रावत यांनी ५५ वर्षांखालील गटात शानदार विजेतेपद पटकावले.

या राज्यस्तरीय स्पर्धेत राज्यातील ४२५ खेळाडूंनी भाग घेतला होता. अंतिम फेरीत मनीष रावत यांनी नागपूरच्या बसाब चौधरी यांचा ३-० अशा सरळ सेटमध्ये दणदणीत पराभव करत विजेतेपदावर आपले नाव कोरले. सामन्यादरम्यान त्यांनी आपल्या सर्व्हिसमध्ये केलेले वैविध्य आणि त्याचा यशस्वीरीत्या



शॉटमध्ये करून मिळवलेले गुण उपस्थितांच्या विशेष आकर्षणाचा विषय ठरले. त्यांच्या या चमकदार खेळाने सर्व प्रेक्षकांची मने जिंकली, तसेच उपस्थितांनी त्यांच्या उत्कृष्ट फिटनेसचेही भरभरून कौतुक केले.मनीष रावत हे सध्या सोलापूर आयकर विभागात अधिकारी म्हणून कार्यरत आहेत. त्यांच्या या यशाबद्दल सोलापूर जिल्हा टेबल टेनिस संघटनेचे अध्यक्ष डॉ. राजीव प्रधान आणि सचिव झेड. एम. पुणेकर यांनी अभिनंदन केले.

## अर्थ, परमार्थ आणि विज्ञान ही अमूल्य वचने



अमृतवाणी

'गले मे सोने की चेन, आदमी बेचैन, जिसके गले में चैन नहीं वो आराम से सो रहा है।' बालपण व तरुणपण निघून जाते, पण संपूर्ण बुद्धी केवळ धनसंचय करण्यात खर्च होते. पैसा कमावताना हृदय व मेंदूचा वापर करून विचारपूर्वक निर्णय घ्यावा, कारण पैसा कमावण्यातच खरा पुरुषार्थ नाही, असे प्रतिपादन जैन मुनी सुप्रभसागर महाराज यांनी केले.

शुक्रवार पेठेतील महावीर सांस्कृतिक भवन मध्ये श्रावकांना म ार्गदर्शन करताना ते बोलत होते. ते म्हणाले, जाहिरातींच्या जगात लहान अक्षरांमध्ये 'टर्म्स अँड कंडिशन्स' असतात. इन्शुरन्स काढायला लावून मेडिक्लेम न मिळणे, नुसती इन्व्हेस्टमेंट करायला लावून शेवटी कोर्ट-कचेरीत वकिलाची फी भरावी लागणे हे या जगाचे वास्तव आहे. पैसा कमावताना पाप करू नका, यामुळे असाता कर्माचा उदय होतो. दुसऱ्यांचे गळे कापून किंवा वेड्यात काढून कमावलेला पैसा कसाईच्या पापासमान आहे. लोखंड (माया) गोळा करणारे लोखंड बनू नका, तर पुण्यरूपी व धर्मरूपी चुंबक बना. अपार पैसा पूर्वजन्मी देव, शास्त्र आणि गुरूंच्या पूजेचे फळ म्हणून मिळतो. प्रचंड संपत्ती असली तरी शेवटच्या क्षणी पाणी पाजायलाही जवळ कोणी नसते. 'बिना धर्म पुण्य नही, बिना पुण्य पाप का क्षय नहीं, पाप छोडे, पाप से बचे...' जेवमध्ये कमी पण डोक्यात जास्त पैसा शिरला आहे. संसारात दया, दान आणि धर्माशिवाय सुख मिळत नाही. 'कळतंय पण वळत नाही, वळवायला शिका.' मायाचारी, हेराफेरी व दुसऱ्यांना फसवणे टाळा. पुण्याचा सदुपयोग करून सत्पात्र दान करा आणि जिनवाणीची सेवा व भक्ती करा. धर्म सिद्धांत म्हणजे फ्रिक्वेन्सी मॉडेलिंग होय. यात संख्यात, असंख्य आणि अनंत चा समावेश आहे. अनंत पुद्गल परमाणु तीन लोकांत व्याप्त आहेत. मन, वचन आणि काया हे संवेदना ग्रहण व प्रसारण करण्याचे माध्यम आहेत, ज्यामध्ये मनाचे कंपन अधिक, वचनाचे मध्यम आणि कायाचे कंपन कमी असते. अशा एकूण २३ वर्गणा (फ्रीक्वेन्सीज) आहेत, ज्यांना कार्मण वर्गणा म्हणतात.

# अनुकंपा भरतीतील ८३ उच्चशिक्षितांचा 'गट क'चा मार्ग बंद

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ ऑगस्ट-**

राज्य शासनाने अनुकंपा नियुक्तीबाबत जुलै २०२५ मध्ये लागू केलेल्या नव्या सर्वसमावेशक धोरणामुळे जिल्हा परिषदेतील अनुकंपा भरतीत नियुक्त झालेल्या ८३ उच्चशिक्षित कर्मचाऱ्यांच्या अपेक्षांना मोठा धक्का बसला आहे. शैक्षणिक पात्रता असूनही रिक्त जागा नसल्यामुळे 'गट ड' (परिचर/शिपाई) पदावर नियुक्ती मिळालेल्या या उमेदवारांना पुढे 'गट क'मध्ये समायोजन मिळण्यार नसल्याचे ग्रामविकास विभागाने स्पष्ट केल्याने त्यांना शिपाई पदावरच सेवा सुरू ठेवावी लागणार आहे.

यापूर्वीच्या शासन निर्णयानुसार रिक्त जागा उपलब्ध झाल्यानंतर संबंधित कर्मचाऱ्यांचे 'गट ड' मधून 'गट क'मध्ये समायोजन होण्याची अपेक्षा होती. मात्र १७ जुलै २०२५ रोजी जारी करण्यात आलेल्या नव्या शासन निर्णयाने यापूर्वीचे सर्व आदेश अधिक्रमित केल्याने ही शक्यता संपुष्टात आली आहे. यासंदर्भात जिल्हा परिषदेने विभागीय आयुक्त, पुणे यांच्या माध्यमातून ग्रामविकास विभागाकडे म ार्गदर्शन मागविले होते. विभागाने दिलेल्या मार्गदर्शनाला २२ जून २०२६ रोजी उत्तर प्राप्त झाले असून त्यात समायोजनाची तरतूद नसल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

२०२५ मध्ये जिल्हा परिषदेत दोन टप्प्यांत अनुकंपा भरती प्रक्रिया राबविण्यात आली. या प्रक्रियेत १६८ उमेदवारांना सेवेत सामावून घेण्यात आले. मात्र 'गट क'च्या जागा उपलब्ध नसल्याने २४ जुलै २०२५ रोजी ४० आणि २५ सप्टेंबर २०२५ रोजी ४३ अशा एकूण ८३ पात्र उमेदवारांना परिचर पदावर नियुक्ती द्यावी लागली.

या भरती प्रक्रियेत चौथी उत्तीर्ण ते अभियांत्रिकी, पदव्युत्तर, बी. फार्मसीसारख्या उच्च शिक्षण घेतलेल्या उमेदवारांना एकाच पदासाठी अर्ज करावा लागला. शैक्षणिक पात्रता असूनही रिक्त पदांचा अभाव असल्याने अनेक उच्चशिक्षित तरुणांनी शिपाई म्हणून सेवेत प्रवेश केला. त्यापैकी ४६ उमेदवारांनी शंभर रुपयांच्या बॉण्डवर परिचर पद स्वीकारण्याचा विकल्पही दिला होता.

**तरच पदोन्नतीची संधी**

नव्या धोरणामुळे आता 'गट ड'मधून 'गट क'मध्ये थेट समायोजनाचा मार्ग बंद झाला असून संबंधित कर्मचाऱ्यांसाठी सेवेतील पदोन्नती हाच पुढील पर्याय उरला आहे. नियम ानुसार आवश्यक सेवा पूर्ण केल्यानंतरच त्यांना पदोन्नतीची संधी मिळू शकते.

**शासनाने स्वतंत्र धोरण आखण्याची मागणी**

या निर्णयामुळे अनुकंपा भरतीतील उच्चशिक्षित कर्मचाऱ्यांमध्ये नाराजीचे वातावरण असून, त्यांच्या शैक्षणिक पात्रतेचा योग्य वापर होण्यासाठी शासनाने स्वतंत्र धोरण आखावे, अशी मागणी कर्मचारी वर्तुळातून पुढे येत आहे.

## ध्येयाच्या पूर्ततेसाठी प्रयत्नांचे पाठबळ हवे



अक्षय वाणी

यत्न तो देव जाणावा, प्रयत्नांती परमेश्वर, प्रयत्ने वाळूचे कण रगडीता तेलही गळे...या साऱ्या म्हणी मधून प्रयत्नांचे महत्त्व सांगितलेले आहे. प्रयत्न म्हणजे सातत्य. प्रत्येक गोष्टीत सातत्य हवे. न थकता,न कंटाळता प्रयत्न केल्यास असाध्य देखील साध्य होते. हरिवंशराय बच्चन यांची 'कोशिश करनेवालोंकी कभी हार नही होती' या कवितेचा संदर्भ घेऊन प्रयत्न या विषयावर सोमवारी परमपूज्य अक्षयश्रीजी महाराज यांनी प्रवचन दिले.

बलिदान चौकातील जैन स्थानकात आयोजित अक्षय चातुर्मासात ते बोलत होते. ते पुढे म्हणाले, प्रयत्न म्हणजे पुढे जाणे. प्रयत्न करत राहणे, पुन्हा पुन्हा प्रयत्न करणे. प्रयत्न केल्यावर कोणतीच गोष्ट आपल्याला अशक्य नाही. प्रयत्नांच्या पाठबळावरच यशाचे अंतिम शिखर गाठता येते. यशाचे अंतिम शिखर गाठण्यासाठी शर्थीने प्रयत्न करावे लागतात. सातत्य हाच यशाचा गमक होय. आपल्या ध्येयाच्या पूर्ततेसाठी प्रयत्नांचे पाठबळ हवेच. म्हणून कोणतीही गोष्ट हाती घेतली की ती अर्धवट सोडू नका. त्या ध्येयापर्यंत पोहोचण्यासाठी अडथळे, संकटे पार करावी लागतात. आपण आत्मविश्वासाने त्या मार्गावर चालत राहिलो तर निश्चितच यश मिळते. सातत्यामुळे सुरुवातीला अडचणींचा वाटणारा मार्ग देखील नंतर प्रशस्त बनतो. जीवनात सावधानता बाळगावी. साधना करताना तर अत्यंत सावधगिरी बाळगली पाहिजे. ज्याप्रमाणे शेतकरी धान्य पिकवताना सावधगिरी बाळगतो त्याप्रमाणे सावधगिरी बाळगणे महत्त्वाचे असते.जीवनात देखील आरंभापासून शेवटपर्यंत अगदी जागरूकतेने वागले पाहिजे तरच साधकाचे शेवटपर्यंत तग लागेल.

**- महेश पुरवंत**

# बाभुळगावातील जुगार अड्ड्यावर छापा

## १३ जणांवर गुन्हा, दोन लाखांचा मुद्देमाल जप्त



**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि. ३ ऑगस्ट -**

बार्शी तालुका पोलीस ठाण्याला अवैध धंद्यांविरोधातील मोहिमेत मोठे यश मिळाले आहे. बाभुळगाव येथे सुरु असलेल्या जुगार अड्ड्यावर पोलिसांनी धाड टाकून १३ जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. या कारवाईत रोख रक्कम, पत्ते व इतर साहित्य असा एकूण २ लाख ३२ हजार ९३० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

बार्शी तालुका पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी तथा सहाय्यक पोलीस निरीक्षक अक्षय सोनवणे यांनी ही विशेष मोहीम हाती घेतली आहे. बाभुळगाव येथे काही इसम अवैधरित्या पत्त्यांचा जुगार खेळत असल्याची गोपनीय माहिती मिळाल्यानंतर त्यांनी तात्काळ पोलीस पथकासह संबंधित ठिकाणी छापा टाकला.

चांगदेव मुकुंद लोंढे, धनंजय भगवान शिंदे, निलेश गजेंद्र शिंदे, किशोर विक्रम शिंदे, गोरखनाथ अजिनाथ शिंदे, सिद्धेश्वर चंद्रा शिंदे, गणेश मिटू नवले, विजय हरिदास अडसूळ, चंद्रकांत दशरथ झिने, लक्ष्मण पांडुरंग झिने, भरत पंढरीनाथ शिंदे, विजय विठ्ठल शिंदे आणि पांडुरंग श्रीधर उघले (सर्व रा. बाभुळगाव, ता. बार्शी) अशी आरोपींची नावे आहेत.

ही कारवाई सोलापूर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, अप्पर पोलीस अधीक्षक विजय कबाडे आणि उपविभागीय पोलीस अधिकारी सुहास जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. कारवाईत सहाय्यक पोलीस निरीक्षक अक्षय सोनवणे, पोलीस उपनिरीक्षक आबासाहेब शिरगिरे तसेच राजेंद्र मंगरुळे, अरुण डुकळे, सागर वाकळे, शशिकांत लोकरे, महेश माने आणि शिवशंकर खराडे यांनी सहभाग घेतला.

# विनायक स्वामी यांच्या वाढदिवसानिमित्त मूक-बधिर शाळेत अन्नदान

**तभा वृत्तसेवा,**
**वळसंग, दि. ३ ऑगस्ट -**

अक्कलकोट शहरातील डबरे गल्लीतील सामाजिक कार्यकर्ते विनायक स्वामी यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून आई प्रेमा स्वामी व श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली एका स्थानिक मूक- बधिर शाळेत अन्नदान करण्यात आले.



वाढदिवसाचा बडेजाव न करता, विनायक स्वामी यांनी या विशेष मुलांसोबत आपला आनंद साजरा केला. विद्यार्थ्यांना समोशांचे वाटप करण्यात आले. गरमागरम आणि स्वादिष्ट समोसे मिळताच मुलांच्या चेहऱ्यावर आनंद उमटला. आपल्या भावना शब्दांत व्यक्त करता येत नसल्या तरी मुलांनी आपल्या बोलक्या डोळ्यांनी आणि हातांच्या खानाखुणांनी विनायक स्वामी यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या.

अमोलराजे भोसले म्हणाले, की 'अशा निरागस मुलांच्या चेहऱ्यावरील आनंद हाच वाढदिवसाचा सर्वात मोठा आणि मौल्यवान ठेवा आहे.' कौतुकास्पद उपक्रमाबद्दल शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षक, कर्मचारी आणि पालकांनी विनायक स्वामी यांचे विशेष आभार मानले, याप्रसंगी सोमनाथ मंगरुळे, विनायक भोसले, युवराज सोनटक्के, ओमकार देशमुख, राज राठोड, आदित्य देशमुख ,बॉबी कलशेट्टी, समर्थ कडगंची व परिसरातील अनेक नागरिक आणि त्यांचे स्नेही उपस्थित होते.

# हनुमंत जाधव यास जागतिक कुस्ती स्पर्धेत कास्य पदक

**तभा वृत्तसेवा,**
**माळशिरस, दि. ३ ऑगस्ट -**



गोदबा पाटील प्रतिष्ठान संचालित कुस्तीप्रशिक्षण केंद्र, खुडूसचा मल्ल हनुमंत जाधव याने जागतिक कुस्ती स्पर्धेत कास्य पदक मिळवून गोदबा पाटील कुस्ती केंद्राचे नाव जागतिक पातळीवर नेले आहे. त्याच्या या यशाबद्दल सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

हनुमंत जाधवने ४५ किलो वजन गटात लखनऊ (उत्तर प्रदेश ) येथे झालेल्या , वर्ल्ड चॅम्पियनशिप निवड चाचणी कुस्ती स्पर्धेत त्याने सूर्य फोगट दिल्ली (0.१0) , वंश हरियाणा (४.१२) व अंतिम कुस्ती साहिल हरियाणा (६.१0) या राज्यातील मल्लांवर विजय संपादन करून सुवर्ण पदक मिळिवले होते. त्याची अझरबैजान या देशात होणाऱ्या वर्ल्ड चॅम्पियन कुस्ती स्पर्धेसाठी निवड झाली होती. नुकत्याच या वर्ल्ड चॅम्पियन कुस्ती स्पर्धेत कजाकिस्तान, इराणच्या मल्लांवर मात करीत कास्य पदक मिळवले.

त्याच्या या यशाबद्दल पालकमंत्री जयकुमार गोरे, माजी आमदार राम सातपुते, श्री श्री साखर कारखान्याचे चेअरमन शेषागिरी राव, माजी सभापती मच्छिंद्र ठवरे यांनी अभिनंदन केले. त्याला महादेव ठवरे, बापूराव ठवरे, सागर वाघ, भैय्या गोफणे, सुरज मुलानी, तुषार झंजे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

### हनुमंतच्या यशाचा अभिमान

हनुमंत हा मल्ल चांदज (ता.माढा) येथील असून तो खुडूस येथे गोदबा पाटील प्रशिक्षण केंद्रात सराव करीत आहे. त्याचे आजोबा अंकुश जाधव यांना कुस्तीची आवड होती. मोलमजुरी करून त्याचा खर्च करीत आहे. त्याने जिद्दीने यश संपादन केले याचा आम्हाला अभिमान आहे.

**- राजेंद्र जाधव, वडील**

# शेत व पाणंद रस्त्यांच्या दुतर्फा वृक्षारोपण बंधनकारक

**सोलापूर, दि. ३ ऑगस्ट -**

महाराष्ट्र शासनाने हरित महाराष्ट्र, समृद्ध महाराष्ट्र मोहिमेंतर्गत यापुढे राज्यातील सर्व शेत व पाणंद रस्त्यांच्या दोन्ही बाजूंना वृक्षारोपण करणे बंधनकारक केले आहे. राष्ट्रीय वन धोरणानुसार, सन २०२६ ते २०४७ या कालावधीत ३०० कोटी वृक्षारोपण करून राज्याचे सध्या २१.२५ टक्के असलेले वन आणि वृक्षाच्छादन ३३ टक्क्यांपर्यंत वाढवण्यासाठी शासनाने महत्त्वाकांक्षी मोहीम राबवण्याचा निर्णय घेतला आहे. शेत किंवा पाणंद रस्त्यांचे काम हाती घेण्यापूर्वी तो रस्ता पूर्णपणे अतिक्रमणमुक्त असणे बंधनकारक करण्यात आले आहे.

# साखरपुड्यातच उरकला विवाहसोहळा

## वेळापुरात कांबळे, सरवदे कुटुंबियांचा आदर्श निर्णय

**तभा वृत्तसेवा,**
**पिलीव दि ३ ऑगस्ट -**

माळशिरस तालुक्यातील वेळापूर येथील उमेश कांबळे यांची कन्या आदिती हिचा नुकताच साखरपुडा झाला. विशेष म्हणजे सासर व माहेरच्या दोन्ही परिवारांच्या संमतीने साखरपुड्यातच विवाह सोहळाही उरकण्यात आला. अशाप्रकारे विवाहासाठी वेगळा मोठा खर्च टाळून आदर्श निर्माण केला.

एक ऑगस्ट रोजी आदितीचा वाढदिवस होता. तिचा साखरपुडा पिलीव येथील मयुर ध्वज सरवदे यांचा मुलगा विशाल याच्या बरोबर ठरला होता. सरवदे हे पिलीव येथील उद्योग व्यवसायातील आर्थिक दृष्ट्या सक्षम असणारे कुटुंब आहे. ठेकेदार उमेश सरवदे ,त्यांचे दोन्ही बंधुही व्यवसायिक त्यामुळे मोठ्या धामधुमीत लग्न करायला काहीच अडचण तर नव्हतीच; पण उद्योजक उमेश सरवदे यांनी मुलीच्या कुटुंबीयांना आपण या साखरपुडयातच विवाह करुयात, अशी विनंती केली. त्याला मुलीच्या आई-वडील व नातलगांनीही होकार दिला. मग काय एका तासातच सर्व विवाहाची तयारी झाली; आणि साखरपुड्यातच लग्न उरकण्यात आले.




दोन्ही कुटुंबांच्या या निर्णयामुळे समाजात आदर्श घालुन लग्नावर बेफाम होणारा खर्च, उधळण थांबून लागलीच साखरपुड्यातच विवाह उरकला याची चर्चा पिलीव व वेळापूर परिसरात होत आहे. विवाह सोहळ्यासाठी पिलीव जिल्हा परिषद गटाचे सदस्य चंद्रकांत जाधव, बोरगाव जिल्हा परिषद गटाचे नागेश भोसले, वेळापूर जिल्हा परिषद गटाचे मिलींद सरतापे, माळशिरस पंचायत समितीचे उपसभापती अमोल मदने-पाटील, पिलीव पंचायत समिती गणाचे सदस्य शिवराज पुकळे, माजी जिल्हा परिषद सदस्य बाळासाहेब धाईंजे, माजी जिल्हा परिषद सदस्य गणेश पाटील, माजी जिल्हा परिषद सदस्य सतीश माने-देशमुख, आरपीआय नेते नंदकुमार केंगार, अकलुजच्या नगरसेविका मनीषा तिकुटे, नगरसेवक नाशिक सोनवणे, आरिफखान पठाण, माळशिरस तालुका भाजपा मंडल अध्यक्ष नितीन मोहिते, किरण गायकवाड, किरण धाईंजे, भैय्यासाहेब मोरे, रणधीर काटे, ॲड. सत्यजित गलाडे, कुमार भैस, राजेंद्र जामदार, कल्याण जावळे, विजय बनसोडे, रणजित सरवदे, प्रफुल्ल बाबर आदींसह सरवदे व कांबळे यांचा मित्र परिवार मोठ्या संख्येने उपस्थित होता.

## महत्वाचे...



### श्री वर्धमान जैन सार्वजनिक वाचनालयात लेखन प्रेरणा दिन साजरा

**बार्शी, दि. ३ ऑगस्ट-**

येथील श्री वर्धमान जैन र्वजनिक तालुका वाचनालय येथे दि. १ऑगस्ट रोजी लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या पुण्यतिथी व साहित्यसम्राट लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त लेखन प्रेरणा दिन म्हणून साजरा करण्यात आला. प्रथमतः लोकमान्य टिळक व साहित्यसम्राट लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेला मोत्याची माळ अर्पण करुन प्रतिमेचे पूजन श्री जैनाश्रमचे माजी अध्यक्ष अजित कुंकूलोळ व वाचनालयाचे अध्यक्ष किशोर श्रीश्रीमाळ यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी सभासदांनी अण्णाभाऊ साठे यांच्या पुस्तकांचे वाचन करुन लोकमान्य टिळक यांना अभिवादन करण्यात आले. सूत्रसंचालन ग्रंथपाल सुरेश यादव यांनी केले. तर सहा ग्रंथपाल शितल लुकडे यांनी आभार मानले. क्लार्क विराज पतंगे यांनी परिश्रम घेतले.



### जिजाऊ गुरुकुलची पहिली पालक सभा उत्साहात

**बार्शी, दि. ३ ऑगस्ट-**

जिजाऊ गुरुकुल, खांडवी येथे नर्सरी ते इयत्ता बारावीपर्यंतच्या विद्यार्थ्यांच्या पालकांची पहिली पालक सभा संपन्न झाली. सभेच्या प्रारंभी उपस्थित पालकांचे स्वागत करण्यात आले. त्यानंतर नर्सरी ते बारावीपर्यंतच्या सर्व विभागप्रमुख यांनी आपल्या विभागाचे शैक्षणिक नियोजन, अध्यापन पद्धती, विद्यार्थ्यांची शैक्षणिक प्रगती, शिस्त, स्पर्धा परीक्षा याविषयी मार्गदर्शन केले. आंतरराष्ट्रीय दर्जाच्या शाळांच्या धर्तीवर या सभेमध्ये विद्यार्थ्यांचे शैक्षणिक मूल्यमापन, उपस्थिती व शिस्त, सुरक्षित प्रवास, बोर्डिंगमधील दिनचर्या, अभ्यासाचे नियोजन, डिजिटल माध्यमांचा जबाबदारीने वापर, जीवनकौशल्ये, संवादकौशल्य, मानसिक आरोग्य, करिअर मार्गदर्शन, पालक-शाळा संवाद व्यवस्था, विद्यार्थ्यांच्या वैयक्तिक गुणवत्तेचा विकास आणि राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय स्तरावरील स्पर्धांसाठी तयारी या विषयांवर चर्चा करण्यात आली. यावेळी शालेय समितीची निवड करण्यात आली नवनिर्वाचित समितीचे स्वागत व सत्कार करण्यात आला. यावेळी अध्यक्ष संभाजी घाडगे, सचिवा वर्षा घाडगे, प्र. अ. किशोर कदम, फिजिकलं कोच जे. बी. शिंदे मेजर व जिजाऊ गुरुकुल परिवारातर्फे अभिनंदन केले.



### प्रशांत गिड्डे यांच्या पुढाकारातून पालखी मार्ग सुकर

**मोडनिंब, दि. ३ ऑगस्ट-**

मोडनिंब (ता. माढा) जवळील पालखी मार्गावरील अरण-आष्टी जवळपास ३५0 मीटर रस्त्यावरील अपूर्ण भाग मनसेचे जिल्हाध्यक्ष प्रशांत गिड्डे यांनी स्वखर्चातून तयार करून वारकऱ्यांची अनेक वर्षांची गैरसोय दूर केली.अनेक दिवसांपासून हा रस्ता रखडला होता. रस्त्यावरून आषाढी एकादशीसाठी आलेले लाखो वारकरी संत सावता माळी महाराजांचे दर्शन घेऊन पंढरपूरला पायी जातात. आषाढी वारीच्या कालावधीत या रस्त्याचे काम पूर्ण झाल्यामुळे या रस्त्यावरून पंढरपूरला जाणारे वारकरी, दररोज ये-जा करणारे परिसरातील नागरिक समाधान व्यक्त करीत आहेत. अनेक वेळा शासकीय कार्यालयामध्ये पत्र व्यवहार केला. परंतु हा रस्ता शासकीय कागदाच्या फाईलमध्ये अडकला. आता आपण हा रस्ता केल्याशिवाय पर्याय नाही म्हणून मी माझ्या स्वखर्चाने या रस्त्याचे काम करून घेतल्याचे प्रशांत गिड्डे यांनी सांगितले.

### माढा-वैराग रोडचे रेल्वे गेट नं ४२ तात्पुरत्या कामासाठी दोन दिवस बंद

**माढा, दि. ३ ऑगस्ट-**

कुर्डूवाडी-सोलापूर रेल्वे मार्गातील माढा-वैराग रोडवरील रेल्वे गेट नं ४२ बुधवार दिनांक ५ ऑगस्ट २०२६ सकाळी 0८ वाजल्यापासून ते शुक्रवार दिनांक ७ ऑगस्ट२0२६ सकाळी 0८ वाजेपर्यंत तात्पुरत्या कामासाठी बंद करण्यात येणार आहे. माढा वैराग मार्गावरून प्रवास करणाऱ्या नागरिकांसाठी रेल्वे प्रशासनाच्या वतीने



नागरिकांना तसेच वाहनांना वाहतूक करण्यासाठी पर्यायी वाहतूक व्यवस्था माढा - बार्शी राज्य राज्यमार्गवरील रेल्वे गेट नं ४0 तसेच माढा महातपूर मार्गावरील रेल्वे भुयारी मार्ग (रेल्वे किमी ३९0/0-१) येथून करण्यात आली आहे. माढा-वैराग मार्गावरील रेल्वे गेट नंबर ४0 येथे रेल्वे रुळाच्या देखभालीच्या कामासाठी सदर कालावधीत तात्पुरत्या स्वरूपात बंद ठेवण्यात येणार आहे. सदर काम पूर्ण होईपर्यंत या मार्गाचे वाहतूक बंद असल्याने पर्यायी मार्गाचा वापर करावा. रेल्वे प्रशासनाच्या वतीने या संदर्भातील माहिती माढा नगरपंचायत, माढा बस स्थानक, माढा तहसील कार्यालय व माढा पोलीस स्टेशन यांना पत्राद्वारे कळवण्यात आली आहे.

## महत्वाचे...




### ब्राह्मण महासंघ शाखा बार्शीतर्फे आमदार राजेंद्र राऊत यांचा सत्कार

**बार्शी, दि ३ ऑगस्ट -**

ब्राह्मण महासंघ शाखा बार्शीच्यावतीने स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघातून राजेंद्र राऊत यांची आमदार म्हणून निवड झाल्याबद्दल सत्कार करण्यात आला. प्रारंभी आमदार राऊत यांच्या हस्ते बार्शीचे ग्रामदैवत श्री भगवंत, समाजाचे आराध्य दैवत भगवान परशुराम व स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. आमदार राजेंद्र राऊत म्हणाले की, बार्शी तालुक्याचा सर्वांगीण विकास हेच आपले ध्येय असून त्यासाठी आपण प्रामाणिकपणे कार्य करणार आहे. याप्रसंगी जिल्हा परिषद अध्यक्ष दिपक वैद्य, नगराध्यक्षा तेजस्विनी कथले, सभापती मिनाक्षी रोंगे, माजी खासदार शिवाजी कांबळे, प्रशांत कथले यांचाही सत्कार करण्यात आला. यानंतर प्रवीण शिरसीकर, दिनकर सापनाईकर यांनी तर पेशवा युवा मंचच्यावतीने सूर्यकांत देशमुख, सुशील बडवे व मनोज बडवे यांनी सत्कार केला. प्रास्ताविकात अमोल कुलकर्णी यांनी आमदार राऊत यांनी परशुराम भवनासाठी ३0 ते ३५ लाखांचा निधी, लोकमान्य टिळक पुतळ्यासाठी शिडीची व्यवस्था केल्याचे सांगितले. याप्रसंगी डॉ. हेमंत साने, माजी खासदार शिवाजी कांबळे, रमाकांत कुलकर्णी यांनी विचार व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अनिल काळे यांनी तर आभारप्रदर्शन किरण देशमुख यांनी केले.



### पिलीव येथे 'एसआयआर'अंतर्गत याद्यांच्या वाचनासाठी विशेष ग्रामसभा

**पिलीव, दि. ३ ऑगस्ट -**

माळशिरस तालुक्यातील पिलीव येथे मतदार याद्यांचे संक्षिप्त पुनर्निरीक्षण कार्यक्रमांतर्गत यादीचे वाचन करण्यासाठी मंडल अधिकारी विजय एकतपुरे यांच्या अध्यक्षतेखाली विशेष ग्रामसभा पार पडली. यावेळी ग्रामविकास अधिकारी भंडलकर उपस्थित होते. तसेच पिलीव येथील २११ ते २१५ पर्यंतच्या सर्व मतदार यादीतील दुबार, मयत, स्थलांतरित मतदारांच्या नावांचे वाचन झाले. मंडलाधिकाऱ्यांनी पिलीव गावातील एकही मतदार वंचित राहु नये यासाठी सर्वांनी ७ तारखेपर्यंत सर्व कामे पुर्ण करावीत, असे सांगितले. यावेळी माळशिरस तालुका मंडल अध्यक्ष नितीन मोहिते, भाजप शहराध्यक्ष प्रमोद भैस, अतुल नष्टे, संजय पाटील, दामोदर लोखंडे, विनोद लोखंडे, समशेरसिंग रजपूत, तलाठी खाडे, बीएलओ गोरवे, चौरे, घोळ, कोल्हे, धसाडे, सोमनाथ देशमुख, अण्णा कोपनर उपस्थित होते. ग्रामविकास अधिकारी भंडलकर यांनी आभार मानले.




### मो. रफी फॅन्स क्लबतर्फे सुनिल फल्ले यांचा सन्मान

**बार्शी, दि. ३ ऑगस्ट-**

महान गायक स्वर्गीय मोहम्मद रफी यांच्या पुण्यतिथीनिमित्त शुक्रवार दि. ३१ जुलै रोजी मोहम्मद रफी फॅन्स क्लब तळेगाव दाभाडे येथे मोहम्मद रफी यांच्या गीतांचा कार्यक्रम आयोजित केला होता. सदर कार्यक्रमात मोहम्मद रफी यांची गीते सादर करण्यात आले. सदर कार्यक्रमात जवळपास ३0 सदस्यांनी गाण्यांची पेशकश केली. कार्यक्रमात बार्शीचे सुनिल फल्ले यांनी ही गीत सादर केले. त्याचवेळी त्यांनी ११,000 गीते पूर्ण केल्याबद्दल स्मृतिचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी ग्रुप सदस्य नगराध्यक्ष संतोष दाभाडे, नगरसेविका हेमलता खळदे, लायन्स क्लब अध्यक्षा अमृता कुलकर्णी, मो. रफी फॅन्स क्लबचे पदाधिकारी सूर्यकांत काळोखे, बिजेंद्र किल्लावाला, नितीन खळदे, बाळासाहेब लोणकर, सुरेश शेंडे, सुनील महाजन, विनायक हेंद्रे, राधेश्याम भांडरी, तुषार केंद्रे, आरिफ सय्यद, सतीश देशपांडे, यश हंबीर, वैशल शहा, सुभाष वाळूंज, रशीद पठाण, अरुण कुलकर्णी, रमेश डोळे, शैलजा फुलकर उपस्थित होते. यावेळी महेश चौरे, गिरीश चौरे, दीपाली चौरे, बेबीताई फल्ले उपस्थित राहून सुनिल फल्ले यांचे अभिनंदन केले.

### मराठा मंदिर श्री शहाजी प्रशालेच्या मुख्याधापकपदी योगेश कबाडे

**अक्कलकोट, दि. ३ ऑगस्ट-**

येथील ऐतिहासिक वारसा लाभलेल्या मराठा मंदिर श्री शहाजी प्रशालेच्या मुख्याध्यापकपदी योगेश कबाडे यांची नियुक्ती करण्यात आली. मराठा मंदिर श्री शहाजी प्रशालेचे मुख्याध्यापक आर.एस. पडवळकर यांची मराठा मंदिर निर्मलराजे कन्या प्रशालेत बदलीने नियुक्ती झाल्याने रिक्त झालेल्या जागेवर योगेश कबाडे यांची नियुक्ती करण्यात आली. नूतन मुख्याधापक योगेश कबाडे यांनी सहशिक्षक म्हणून २६ वर्षे व पर्यवेक्षक म्हणून वर्षभर काम केले आहे. त्यांच्या या निवडीबद्दल मराठा मंदिरचे उपाध्यक्ष विलासराव देशमुख, उपाध्यक्ष दिपक देशमुख, मराठा मंदिर विद्यावर्धिनीचे अध्यक्ष योगेश पवार, सचिव मनोहर साळवी, आमदार सचिन कल्याणशेट्टी, माजी मंत्री सिध्दाराम म्हेत्रे, अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जनमेजयराजे विजयसिंहराजे भोसले, कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे भोसले, वटवृक्ष देवस्थान चे अध्यक्ष महेश इंगळे यांनी अभिनंदन केले.

# आपला जिल्हा

**सोलापूर तरुण भारत**, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## महादेव मस्तुद यांची शिवालयाला ५ हजारांची देणगी

**बार्शी दि. ३ ऑगस्ट-**

आयुष्यभर शाळेचे सेवक म्हणून काम करणारे महादेव मस्तुद यांनी वाढदिवसानिमित्त धसपिंपळगावातील महादेव मंदिराच्या जीर्णोद्धार कार्याला ५ हजार रुपयांची देणगी दिली. हा मदत रंग कामासाठी वापरली जावी अशी इच्छा व्यक्त केली.

सार्वजनिक जीवनामध्ये अन्यायावर तुटून पडणारे सामाजिक कार्यकर्ते अशी महादेव मस्तुद त्यांची ओळख आहे. त्यांनी आपला सेवेचा बाणा या देणगीच्या निमित्ताने जपला. त्यांच्या या श्रद्धा आणि भक्तीने दिलेल्या देणगीमुळे ग्रामस्थांनी त्यांचा भर पावसात केक कापून, पुष्पहार घालून, फटाक्यांची आतिषबाजी करत सत्कार केला. जन्मभूमी ग्रामविकास आघाडीचे प्रमुख सचिन धस व धनाजी वाघमोडे यांच्या हस्ते हा सत्कार केला. यावेळी जन्मभूमी प्रतिष्ठानचे कार्याध्यक्ष अण्णासाहेब पाटील, दादासाहेब कसबे, राहुल धस, राम देवकते, नकुल जगदाळे, गुलाब धस, दिनेश धस, राम गरड, समाधान पवार, पांडू लोमटे, भाऊसाहेब पुंड, गणेश जाधव, दादा वीर, सलीम मुलानी आदी उपस्थित होते.

गावकऱ्यांकडून महादेव मास्तुद यांचा सत्कार





### महत्त्वाचे...



## संजय पुजारी मित्र परिवारातर्फे विद्यार्थ्यांना मोफत बॅग वाटप

**सोलापूर, दि. ३ ऑगस्ट-**

दक्षिण सोलापूर तालुक्यातील तेलगाव (भीमा) येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत एस.पी. फाऊंडेशनचे संस्थापक अध्यक्ष संजय पुजारी यांच्या वाढदिवसानिमित्त विद्यार्थ्यांना मोफत शालेय बॅग वाटप करण्यात आले. विद्यार्थ्यांना बॅग वाटप करून तसेच केक कापून वाढदिवस साजरा केला. कार्यक्रमात इयत्ता चौथी शिष्यवृत्ती परीक्षेत पात्र ठरलेल्या विद्यार्थ्यांचा सत्कारही संजय पुजारी यांच्या हस्ते करण्यात आला. मुलांनी स्वप्न डोळ्यांसमोर ठेवून अभ्यास करा. शाळेसाठी जी काही मदत लागेल ती एस.पी. फाऊंडेशनच्या माध्यमातून करण्याचा मी प्रयत्न करेन, असे यावेळी पुजारी यांनी सांगितले.



## फॅबटेक स्कूलमध्ये अण्णाभाऊ साठे, लोकमान्य टिळक यांना अभिवादन

**सांगोला, दि. ३ ऑगस्ट-**

फॅबटेक पब्लिक स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज, सांगोला येथे लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती आणि लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या पुण्यतिथीनिमित्त अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात लोकशाहीर अण्णाभाऊ साठे व लोकमान्य टिळक यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण व अभिवादन करून करण्यात आली. यावेळी प्राचार्य सिकंदर पाटील, शिक्षक किरण कोडक, पंचाक्षरी स्वामी, संजय देशमुख ,निसार इनामदार, मुक्ता सिद्धभट्टे, रेश्मा तोडकर उपस्थित होते.



## मिलिंद सुरवसे यांचा सत्कार

**बार्शी दि. ३ ऑगस्ट-**

वखारिया विद्यालय, उपळे दुमाला येथील सेवक मिलिंद सुरवसे हे निवृत्त झाल्याबद्दल त्यांचा सत्कार सोहळा विद्यालयात पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक दयानंद रेवडकर होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून पं. स. चे माजी सदस्य विलास गाटे आणि जनसंपर्क अधिकारी कैलास नेवाळे उपस्थित होते. कार्यक्रमात रोहिणी डोईफोडे, रुकसार बागवान, बुरगुटे मॅडम, यश पवार व सारिका बुरगुटे यांचाही सत्कार केला. मिलिंद सुरवसे यांचा प्रशालेतर्फे सपत्नीक सत्कार करण्यात आला. तसेच भेटवस्तू देऊन भावी वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या. मुख्याध्यापक रेवडकर यांनी सुरवसे यांच्या कामाची प्रशंसा केली.



## आदर्श मुख्याध्यापक पुरस्काराने चारुदत्त जगताप सन्मानित

**सांगोला, दि. ३ ऑगस्ट-**

सांगोला विद्यामंदिर प्रशाला व ज्युनिअर कॉलेजचे प्राचार्य चारूदत्त जगताप यांना एकनाथ स्वाभिमानी शिक्षक सेना, महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने जिल्हास्तरीय आदर्श मुख्याध्यापक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. सांगोला येथे आयोजित समारंभात मंगेश चिवटे आणि शिक्षणाधिकारी सचिन जगताप यांच्या हस्ते जगताप यांना सन्मानचिन्ह आणि प्रशस्तीपत्र प्रदान करून गौरविण्यात आले. चारूदत्त जगताप यांना तालुका, जिल्हा, राज्य आणि राष्ट्रीय स्तरावरील विविध पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे. त्यांच्या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष प्रा.प्रबुद्धचंद्र झपके, उपाध्यक्ष ॲड. विजयसिंह चव्हाण, सचिव मल्लिकार्जुन घोंगडे, सहसचिव प्रशुद्धचंद्र झपके, खजिनदार शंकरराव सावंत, सदस्य शीलाकाकी झपके, विश्वेश झपके, उपमुख्याध्यापक प्रदीप धुकटे, उपप्राचार्य शिवशंकर तटाळे, पर्यवेक्षक काकासो नरूटे, शुभांगी घोंगडे यांनी अभिनंदन केले.

# जीवरक्षकांची नियुक्ती, स्थलांतरित कुटुंबियांना अन्नाची पाकिटे

* मंदिर समितीचे सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांची माहिती
* पंढरपूर शहरात मंदिर समितीकडून मदत कार्य; पूर नियंत्रण यंत्रणा कार्यरत

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.३ ऑगस्ट-**

सद्यस्थितीत चंद्रभागा नदीच्या पाणी पातळीत वाढ झालेली आहे. प्रशासनाकडून चंद्रभागा नदी काठच्या नागरिकांचे सुरक्षितस्थळी स्थलांतर केले केले आहे. दरम्यान श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती मार्फत स्थलांतरीत नागरिकांना अन्नाची पाकिटे वाटप केली जात आहेत. तसेच चंद्रभागा नदीपात्रात जीवरक्षकांचीही नियुक्ती केल्याची माहिती मंदिर समितीचे सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी दिली.सद्यस्थितीत, पंढरपूर शहर व परिसरात पूरस्थिती निर्माण झाली आहे.

**बचावकार्यासाठी पुरक सुविधांची उपलब्धता**

चंद्रभागा नदीपात्रात भाविकांच्या सुरक्षतेच्या दृष्टीने जीवरक्षक नियुक्त करण्यात आलेले आहेत. तसेच स्थानिक प्रशासनामार्फत बोट उपलब्ध करून दिली आहे. इतर अनुषंगीक सोई सुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहे.

**- प्रवीणकुमार घम,** व्यवस्थापक, मंदिर समिती.

चंद्रभागा नदीच्या पातळीने धोक्याने पातळी ओलांडली असल्याने स्थानिक प्रशासनामार्फत अनेक कुटुंबांना सुरक्षित स्थळी स्थलांतरित केले आहे. सध्या उद्भवलेली पूरजन्य परिस्थिती हटवण्यासाठी व बचाव कार्यासाठी तसेच मानवतावादी भूमिकेतून मंदिरे समिती मार्फत बाधित कुटुंबियांना अन्न पाकिटांचे वाटप केले आहे. यावेळी मंदिर समितीच्या सदस्या



शकुंतला नडगिरे, संभाजी शिंदे, हभप ज्ञानेश्वर देशमुख जळगांवकर, नगराध्यक्षा प्रणिता भालके, व्यवस्थापक प्रविणकुमार घम, मुकेश अनेचा व विभाग प्रमुख अरुण सरगर उपस्थित होते.

# जिल्हा परिषदेच्या स्थायी समितीची आज बैठक

**अपुऱ्या निधीसह योजनांच्या अंमलबजावणीचे आव्हान !**

**रखडलेल्या योजनांवर सदस्य सरकारला धारेवर धरणार का ?**

**लोकप्रतिनिधींसह कार्यकर्त्यांचा 'सेस'वर डोळा**

ग्रामीण भागातील वाड्या - वस्त्यांचा विकास व्हावा यासाठी ग्रामविकास विभागामार्फत योजना राबवल्या जातात. परंतु त्याची अंमलबजावणी म्हणावी तशी होते का नाही. हेदेखील पाहणे तितकेच महत्त्वाचे आहे. अशातच गावातील विविध विकास कामांच्या पूर्ततेसाठी ग्राम विकास विभागासह आमदारांचा फंड खासदारांचा फंड उपलब्ध असतो. परंतु अशा परिस्थितीत देखील जिल्हा परिषदेच्या सेस फंडावर आमदारांसह कार्यकर्त्यांचा जास्त भार दिसून येत आहे. जिल्हा परिषदेच्या सेस फंडामधून कामे करून घ्या असा, आग्रह नेत्यांचा दिसून येत आहे.

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.३ ऑगस्ट-**

सोलापूर जिल्हा परिषदेच्या स्थायी समितीची आज होणारी बैठक ग्रामविकासाच्या दृष्टीने महत्त्वाची आहे. जलजीवन मिशनच्या रखडलेल्या कामांपासून ते ग्रामपंचायतींमधील प्रशासकीय अडचणी, निधीअभावी संथावलेल्या विकासकामांपर्यंत अनेक प्रश्नांवर सदस्य जाब विचारण्याची शक्यता आहे. बैठकीत केवळ विषयांची चर्चा होणार की ठोस निर्णयही घेणार, याकडे ग्रामीण भागाचे लक्ष लागले आहे.

ग्रामविकास विभागामार्फत विविध योजना राबवित आहेत. मात्र निधीचा तुटवडा, प्रशासकीय अडचणींमुळे अनेक योजना कागदावरच अडकून पडल्या आहेत. गावांच्या विकासावर परिणाम होत असल्याने नाराजी वाढत आहे. जलजीवन मिशनअंतर्गत जिल्ह्यातील अनेक पाणीपुरवठा योजनांची कामे ५० ते ७५ टक्क्यांपर्यंत पूर्ण आहेत. मात्र २०० हून अधिक कामांची बिले अद्याप प्रलंबित आहेत. ग्रामीण पाणीपुरवठा



विभागाने सुमारे १३५ कोटी रुपयांच्या निधीची मागणी केली असताना केवळ ६ कोटी रुपयांचा निधी मिळाल्याने ठेकेदार आर्थिक अडचणीत आले आहेत. परिणामी नागरिकांना योजनांचा लाभ मिळण्यास विलंब होत आहे.

राज्यातील ७५० हून अधिक ग्रामपंचायतींवर प्रशासक कार्यरत असल्याने अनेक विकासकामांचे प्रस्ताव आणि आर्थिक मंजुरी रखडल्याची परिस्थिती आहे. काही गावांमध्ये विकास कामे झाले आहेत. परंतु सहीचा अधिकार नसल्यामुळे निधी अखर्चित राहिले आहेत. आषाढी वारीदरम्यान वारी मार्गावरील काही ग्रामपंचायतींचे अधिकार ग्रामसेवकांना दिले तरी इतर ग्रामपंचायतींच्या अधिकारांचा प्रश्न अद्याप कायम आहे. स्थानिक पातळीवरील निर्णय प्रक्रियेलाही फटका बसत आहे. जल जीवन मिशन, १५ वा वित्त आयोग, नाविन्यपूर्ण योजना आदींसह इतर योजनांची अंमलबजावणीही अपेक्षित गतीने होत नाही.

बैठकीत सदस्यांनी या सर्व प्रश्नांवर आक्रमक भूमिका घेत प्रशासनाकडून वस्तुस्थिती जाणून घेणे, प्रलंबित बिलांसाठी पाठपुरावा करणे, रखडलेल्या योजनांना गतीसाठी कालबद्ध कृती आराखडा आणि प्रशासकीय अडथळे दूर करण्याबाबत ठोस निर्णयाची मागणी करण्याची शक्यता आहे. यानंतरच खऱ्या अर्थाने स्थायी समितीतील चर्चेनंतर ग्रामीण विकासाला नवी दिशा मिळते की प्रश्न पुन्हा एकदा कागदावरच राहतात, याचे उत्तर स्पष्ट होणार आहे.

## संत सहवासाने मिळते जीवनाला योग्य दिशा : डॉ. जोग



**श्री संत साहित्य सेवा संघातर्फे पुरस्कार वितरण**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.३ ऑगस्ट-**

संतकृपेचा महिमा मोठा आहे. संतांचा क्षणभराचा सहवासही जीवनाला दिशा देतो,असे प्रतिपादन प्रा. डॉ. अश्विनी जोग यांनी केले. श्री संत साहित्य सेवा संघातर्फे देण्यात येणाऱ्या दोन पुरस्कारांचे वितरण ज्ञानप्रबोधिनीच्या चैतन्य भुवन सभागृहात झाले.

यावेळी व्यासपीठावर प्रा. डॉ. अश्विनी जोग, दत्तस्वरूप आप्पाबाबा रुईभर महाराज, शिवानंद दसाडे, रोहन उपळेकर, श्री संत साहित्य सेवा संघाचे अध्यक्ष सु. स. देशमुख उपस्थित होते.

यंदाचा संतसेवा सातत्यनिष्ठा सन्मानार्थ सांगाति पुरस्कार(द्वितीय वर्ष) शिवानंद दसाडे यांना तर श्रीसंत साहित्य सेवा पुरुषोत्तम पुरस्कार(सोळावे वर्ष) रोहन उपळेकर यांना प्रदान करण्यात आला. शाल, हार, श्रीफळ, पुष्पगुच्छ, पुरस्कार मानपत्र आणि प्रत्येकी ११ हजार रुपये सन्माननिधी असे या पुरस्काराचे स्वरूप होते.

प्रा. डॉ. जोग म्हणाल्या, ज्याच्या अंतःकरणात ईश्वरभक्तीची ओढ असते त्यांचे जीवन धन्य होते. रोहन उपळेकर यांनी गुरुसेवेने, संतसाहित्याच्या अभ्यासाने आणि प्रसाराने संत साहित्याची समृद्ध परंपरा अधिक व्यापक केली आहे असे त्या म्हणाल्या. यावेळी रोहन उपळेकर, शिवानंद दसाडे,अध्यक्ष सु.स. देशमुख यांनीही मनोगत व्यक्त केले. याच कार्यक्रमात डॉ. अपर्णा कल्याणकर लिखित 'सद्गुरू श्रीमाणिकप्रभू', विठ्ठल जोशी लिखित 'स्वानंद'- स्व. डॉ. रा. ल. जोशी (अण्णा) यांचे जीवन चरित्र' तसेच दा. का. थावरे संपादित 'ज्ञानदेवांची गुरुभक्ती' द्वितीय आवृत्ती या तीन पुस्तकांचे प्रकाशन झाले. यावेळी श्री संत साहित्य सेवा संघाचे कोषाध्यक्ष रमेश विश्वरूपे, सचिव गणेश सांगलीकर, डॉ. माधवी रायते, डॉ.अपर्णा कल्याणकर,ज्ञानेश थावरे, प्रा. मनोज कुलकर्णी, प्रमोद कामतकर, संजीव कुसुरकर, सतीश पोफळे उपस्थित होते. डॉ. गणेश सांगलीकर यांनी प्रास्ताविक केले. डॉ. माधवी रायते यांनी ईशस्तवन सादर केले. प्रा. मनोज कुलकर्णी यांनी सूत्रसंचालन तर प्रमोद कामतकर यांनी आभार मानले.

## वितरिका क्र. ८ ला 'टेल टू हेड' पध्दतीने पाणी सोडण्याची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**मोडनिंब, दि. ३ ऑगस्ट-**

सीना-माढा उपसा सिंचन योजनेच्या वितरिका क्रमांक ८ मध्ये टेल टू हेड पद्धतीने पाणी सोडण्यात यावे, अशी मागणी पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्याकडे पंचायत समितीचे माजी सभापती विक्रमसिंह शिंदे, संचालक मोहन मोरे व शेतकऱ्यांनी निवेदनाद्वारे केली.

शेतकऱ्यांनी यापूर्वी पाणी सोडूनही बैरागवाडी व जाधववाडी परिसरातील शेतकऱ्यांना पाणी पोहोचले नसल्याची व्यथा मांडली. त्यामुळे पिकांना पाणी मिळावे म्हणून टेल टू हेड पद्धतीने पाणी सोडण्याची मागणी केली. शेतकऱ्यांच्या मागणीची तातडीने दखल घेत पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना दूरध्वनीवरून त्वरित पाणी सोडण्याच्या सूचना दिल्याचे संचालक



मोहन मोरे यांनी सांगितले. त्यामुळे वितरिका क्रमांक ८ वरील बैरागवाडी, जाधववाडीसह परिसरातील शेतकऱ्यांना दिलासा मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# पंढरपुरात हजारापेक्षा अधिक तक्रारदारांचे 'समाधान'

**छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीरास प्रतिसाद; तहसीलदार सचिन लंगुटे यांची माहिती**

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.३ ऑगस्ट-**

पंढरपूर येथे येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा वाढदिवस तसेच माजी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या जयंतीनिमित्त रविवार दि.२ ऑगस्ट रोजी आयोजित छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. विविध योजनांच्या १ हजार २३ लाभांचे वितरण केल्याचे तहसीलदार सचिन लंगुटे यांनी सांगितले.

यश पॅलेस, कराड रोड पंढरपूर येथे पंढरपूर विधानसभा मतदासंघातील नागरिकांसाठी आयोजित शिबिरास आमदार समाधान आवताडे, प्रांताधिकारी सचिन इथापे, बी.आर. माळी, तहसीलदार सचिन लंगुटे, मदन जाधव, गटविकास अधिकारी अमोल जाधव, मुख्याधिकारी महेश रोकडे, तालुका कृषी अधिकारी सुर्यकांत मोरे, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. एकनाथ बोधले तसेच पंढरपूर, मंगळवेढा तालुक्यातील जिल्हा परिषद, पंचायत समिती, नगरपालिकेचे पदाधिकारी, नायब तहसिलदार, मंडलाधिकारी, तलाठी आणि कर्मचारी उपस्थित होते.

शिबिरामध्ये महसूल विभागासह विविध विभागांचे स्टॉल उभारले होते. या माध्यमातून नागरिकांना विविध शासकीय योजना, सेवा व सुविधांची माहिती देण्याबरोबरच पात्र लाभार्थ्यांना प्रत्यक्ष लाभाचे वितरण केले. नागरिकांना सातबारा उतारे ३१०, महिलांना शेतकरी दर्जा देण्याबाबतचे प्रमाणपत्र वाटप ४२, मुख्यमंत्री बळीराजा शेत/पाणंद रस्ते ७, राजमाता जिजाऊ महिला सक्षमीकरण योजना ३७, घरकुल लाभार्थ्यांच्या योजनेसाठी विशेष तरतूद २०, शेतीच्या कौटुंबिक वाटणीपत्रावरील नोंदणी फी माफ १३, राज्य शासकीय योजनांचा लाभ २६५, स्थानिक स्वराज संस्थेच्या शासकीय योजनांचा लाभ ५०, इतर विविध



योजनांचे लाभ २७९ असे एकूण १ हजार २३ लाभांचे वितरण करण्यात आले.

शासकीय योजनांचा लाभ पात्र लाभार्थ्यांपर्यंत थेट पोहोचविणे, नागरिकांच्या विविध प्रशासकीय अडचणींचे निराकरण करणे आणि महसूल विभागाच्या सेवा सुलभ व गतिमान पद्धतीने उपलब्ध करून देणे, हा या समाधान शिबिराचा प्रमुख उद्देश असल्याचे उपविभागीय अधिकारी सचिन इथापे यांनी सांगितले. यावेळी नागरिकांनी मोठ्या संख्येने भेट देऊन योजनांची माहिती घेतली. तसेच शासकीय योजनांसाठी लागणारी आवश्यक कागदपत्रे व निकष याचीही माहिती घेतली. शिबिरास विविध विभागांचे अधिकारी, कर्मचारी तसेच नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या समाधान शिबिरामधून एकाच वेळी मोठ्या संख्येने पात्र लाभार्थ्यांना योजनांचा लाभ मिळाल्यामुळे लाभार्थ्यांमधून समाधान व्यक्त करण्यात आले.

**शिबिरामुळे महसुली कामांना गती**

शासनाच्या विविध योजना व उपक्रम नागरिकांपर्यंत प्रभावीपणे पोहोचविण्यासाठी अशा शिबिरांची आवश्यकता आहे. शिबिराच्या माध्यमातून महसुली कामे तात्काळ मार्गी लागत असल्याने नागरिकांत समाधानाची भावना आहे.

**- समाधान आवताडे,**
आमदार पंढरपूर-मंगळवेढा
विधानसभा मतदारासंघ.





## दैनिक तरुण भारत वर्धापन दिनास हार्दिक शुभेच्छा..!



डी.ए.व्ही.कॉलेज मॅनेजिंग कमिटी, नवी दिल्ली संचलित

### सोलापूर जिल्ह्यातील विविध शैक्षणिक संकुल

- द.भै.फ. दयानंद कला व शास्त्र महाविद्यालय, सोलापूर
- डी.ए.व्ही. वेलणकर वाणिज्य महाविद्यालय, सोलापूर
- द.प्रे. भै. दयानंद शिक्षणशास्त्र महाविद्यालय, सोलापूर
- द.गो. भै. दयानंद विधी महाविद्यालय, सोलापूर
- पुष्पा गुप्ता दयानंद मॉडेल स्कूल, सोलापूर
- दयानंद काशिनाथ आसावा प्रशाला, सोलापूर
- रामभाऊ जोशी हायस्कूल, करकंब, पंढरपूर
- महात्मा आनंद स्वामी सरस्वती कनिष्ठ महाविद्यालय, करकंब

**- संस्थेची वैशिष्ट्ये -**

• नर्सरी ते पीएचडी पर्यंत शिक्षणाची सोय • NEP-२०२०ची अंमलबजावणी • सुसज्ज प्रयोगशाळा व ग्रंथालय • अद्यावत संगणक प्रयोगशाळा व हाय स्पीड इंटरनेटची सोय • प्रत्येक वर्गासाठी कौशल्य विकास आधारित कोर्सची सोय • उच्चशिक्षित व तज्ञ प्राध्यापक • शिष्यवृत्तीची सोय • NCC/ NCC सोय • मुला - मुलींचे स्वतंत्र वसतिगृह • सर्व खेळांसाठी सुसज्ज व सुविधा असणारे क्रीडांगण • स्पर्धा परीक्षेसाठी मार्गदर्शन • व्यक्तिमत्व विकासासाठी अनेक उपक्रम.

XI(Arts, Sci, Comm), B.A, B.Sc, B.Sc.(ECS), B.Com, BCA, MA, M.Com, M.Sc, MCS, BALLB, LLB, LLM, Ph.D या अभ्यासक्रमांची सोय.
संपर्क क्रमांक - ७०२०५०८४०८, ९९२२८९५४९९

शुभेच्छुक : **मा. डॉ. महेशजी चोप्रा**
स्थानिक सचिव, दयानंद शिक्षण संस्था, सोलापूर





सोलापूर तरुण भारत
वर्धापनदिनाच्या हार्दिक शुभेच्छा..!

**मा.समाधान महादेव ताटे**
यांची युवा मोर्चा सोलापूर पश्चिम
**जिल्हा सरचिटणीस**
पदी निवड झाल्याबद्दल
हार्दिक अभिनंदन



* शुभेच्छुक *
**रोहन दिपक खंदारे**



तरुण भारत वर्धापनदिनाच्या हार्दिक शुभेच्छा




दैनिक तरुण भारतच्या ४२व्या वर्धापन दिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा!



**हरीष अन्नलदास**
आंतरराष्ट्रीय डायव्हिंग प्रशिक्षक





तरुण भारतच्या ४२व्या वर्धापन दिनानिमित्त शुभेच्छा!

## २५ वर्षापासून

कार्यरत असलेले विश्वसनीय
कौस्तुभ ब्राम्हण वधुवर सूचक केंद्र



द्वारा :
**रविंद्र नाशिककर**
पत्रकार
११४/१० डॉ. गोगटे चाळ,
मुरारजी पेठ सोलापूर
मो. ९३७२१०२४७७

वेळ : सायंकाळी ६ ते ८



राष्ट्रीय विचाराचे एकमेव दैनिक
'सोलापूर तरुण भारत'

वर्धापनदिनाच्या हार्दिक शुभेच्छा..!





-: शुभेच्छुक :-

## दिलीपशेठ शांतीलाल गांधी

दर्शना सॉल्व्हेंट एस.प्रा.लि.बार्शी सोयाबीन प्रक्रिया उद्योग
संस्थापक अध्यक्ष : सौ.सुवर्णलता गांधी महाविद्यालय वैराग
अध्यक्ष : दि. बार्शी मर्चंटस् असोसिएशन लिमिटेड



-: संस्थापक :-



वामनराव शिंदे साहेब



सोलापूर
तरुण भारत
वर्धापन दिनास हार्दिक शुभेच्छा



आदर्श शिक्षण प्रसारक मंडळ, सांगोला संचलित

**वामनराव शिंदे साहेब आदर्श विद्यालय, सांगोला**
(स्थापना : १७ सप्टेंबर १९८६)

अध्यक्षा : श्रीमती कौशल्यादेवी शिंदे मॅडम
मुख्याध्यापक : विठ्ठलपंत शिंदे सर

**शहीद अशोक कामटे बहुद्देशीय सामाजिक संघटना, सांगोला**

कार्यक्षेत्र - महाराष्ट्र राज्य - ४१३३०७
संस्थापक निलकंठ शिंदे सर




# भक्ती, संस्कृती आणि समृद्धीचा संगम




## सोलापूरच्या विकासाची नवी तीर्थगाथा

पद्माकर कुलकर्णी
भ्र. ९९२२४२४५३७

**महाराष्ट्र, कर्नाटक आणि आंध्र प्रदेश या तीन राज्यांच्या सीमावर्ती भागात वसलेले सोलापूर हे केवळ एक औद्योगिक शहर किंवा कापड उद्योगाचे केंद्र नाही, तर ते दक्षिण भारताचे एक प्रमुख आध्यात्मिक प्रवेशद्वार आहे. गिरणी कामगारांचे शहर म्हणून ओळखल्या गेलेल्या सोलापूरचा इतिहास आणि वर्तमान धर्म, संस्कृती आणि भक्तीच्या धाग्यांनी विणला गेला आहे. सोलापूरच्या भौगोलिक आणि आर्थिक विकासात येथील आणि आसपासच्या तीर्थक्षेत्रांचे योगदान कमालीचे मोठे असून, ते या जिल्ह्याच्या अर्थव्यवस्थेचा आणि सामाजिक रचनेचा मुख्य कणा बनले आहे.**

शिवयोगी श्री सिद्धरामेश्वर यांच्या पदस्पर्शाने पावन झालेले सोलापूर शहर, विठ्ठल दर्शनाने तृप्त होणारे पंढरपूर, स्वामी समर्थांच्या वास्तव्याने पुनित झालेले अक्कलकोट आणि अगदी जवळच असलेली तुळजापूरची भवानी माता व गाणगापूरचे दत्तपीठ; या सर्वांच्या केंद्रस्थानी सोलापूर वसलेले आहे. या धार्मिक त्रिकोणामुळे सोलापूर जिल्हा हा केवळ भाविकांच्या श्रद्धेचा विषय राहिला नसून तो एक मोठा आर्थिक आणि पायाभूत कॉरिडॉर बनला आहे. कोणत्याही शहराच्या विकासात पैशांचा प्रवाह आणि खेळती पुंजी महत्त्वाची असते.

सोलापूर जिल्ह्याला हे आर्थिक स्थैर्य देण्याचे काम येथील मंदिरांनी आणि तिथे वर्षभर येणाऱ्या कोट्यवधी भाविकांनी केले आहे. जिल्ह्याच्या या आध्यात्मिक वैभवात बार्शीच्या ऐतिहासिक भगवंत मंदिराचे योगदान अत्यंत मोलाचे आहे. जगातील एकमेव असे हे मंदिर आहे, जेथे श्रीविष्णूची भगवंत या रूपात पूजा केली जाते. या मंदिराची उत्कृष्ट हेमाडपंती स्थापत्यशैली आणि कार्तिकी एकादशीला भरणारी भव्य यात्रा बार्शी परिसरातील अर्थकारणाला मोठी गती देते. यासोबतच, संत चोखामेळा, संत दामाजीपंत आणि संत कान्होपात्रा यांच्यासारख्या थोर संतांच्या वास्तव्याने पावन झालेली मंगळवेढा ही संतांची भूमी जिल्ह्याच्या सांस्कृतिक वैभवात भर घालते.

दामाजीपंतांच्या दुष्काळकाळातील औदार्याची गाथा आजही येथील मातीत जिवंत आहे. याच वारकरी परंपरेचा आणखी एक महत्त्वाचा दुवा म्हणजे अरण हे गाव, जे मकांदा मुळा भाजी, अवघी विठाई माझीफ असा संदेश देत शेतीलाच ईश्वर मानणारे संत शिरोमणी सावता महाराज यांची कर्मभूमी आहे. वारकरी संप्रदायासाठी हे एक अत्यंत पवित्र श्रद्धास्थान असून वर्षभर हजारो शेतकरी व भाविक येथे दर्शनासाठी येतात.

दुसरीकडे, भीमा आणि सीना नद्यांच्या पवित्र संगमावर वसलेले हत्तरसंग कुडल हे केवळ आध्यात्मिक केंद्र नसून चालुक्यकालीन प्राचीन मंदिरे आणि कोरीव दगडी वास्तुकलेचा उत्कृष्ट नमुना आहे. येथील हरिहरेश्वर मंदिर इतिहास संशोधक, पर्यटक आणि निसर्गप्रेमींसाठी मोठे आकर्षण ठरत असून ग्रामीण पर्यटनाला यामुळे नवी दिशा मिळत आहे.

धार्मिक पर्यटनातून मिळणाऱ्या या आर्थिक सुबत्तेमुळे स्थानिक बाजारपेठांना मोठी गती मिळाली आहे. अक्कलकोट, पंढरपूर, मंगळवेढा, बार्शी आणि सोलापूर शहरात दररोज हजारो भाविक येतात. आषाढी-कार्तिकी वारी किंवा सिद्धेश्वर यात्रेसारख्या मोठ्या उत्सवांमध्ये ही संख्या लाखांच्या घरात जाते. यामुळे सोलापूरमधील हॉटेल व्यवसाय, लॉजिंग, बोर्डिंग आणि खानावळींना वर्षभर मोठा व्यवसाय मिळतो. साध्या धर्मशाळेपासून ते आधुनिक सुविधा असलेल्या हॉटेल्सपर्यंत सर्व स्तरातील व्यवसायांची यामुळे भरभराट झाली आहे. या प्रवाशांमुळे परिवहन क्षेत्राला, म्हणजेच रेल्वे, खाजगी बसेस, ट्रॅव्हल्स आणि स्थानिक ऑटोरिक्षा चालकांना संजीवनी मिळाली आहे.

सोलापूर रेल्वे स्थानक हे दक्षिण आणि उत्तर भारताला जोडणारे मोठे जंक्शन असल्याने भाविकांची पहिली पसंती रेल्वेला असते. या आर्थिक चक्राचा फायदा स्थानिक गृहउद्योगांना आणि लघुउद्योगांनाही मोठ्या प्रमाणावर होतो. सोलापूरची प्रसिद्ध शेंगा चटणी, कडक भाकरी, मंगळवेढ्याची प्रसिद्ध मालदांडी ज्वारी, अक्कलकोटचे प्रसिद्ध खवा पेढे आणि जगप्रसिद्ध सोलापुरी चादरी व टॉवेल्स या गोष्टींना भाविकांमुळे एका रात्रीत मोठी बाजारपेठ मिळाली आहे.

देवदर्शनासाठी येणारा प्रत्येक प्रवासी जाताना सोलापूरची आठवण म्हणून काही ना काही रेदी करतोच, ज्यामुळे स्थानिक महिला बचत गट आणि व्यापाऱ्यांचे हात बळकट होतात.

तीर्थक्षेत्रांच्या या गर्दीमुळे शहराच्या पायाभूत सुविधांचाही मोठा कायापालट झाला आहे. सोलापूर शहर आणि जिल्ह्याला जोडणाऱ्या रस्त्यांचे जाळे मजबूत होण्यामागे या तीर्थक्षेत्रांची भूमिका मुख्य राहिली आहे.

सोलापूर- पुणे राष्ट्रीय महामार्ग, सोलापूर-तुळजापूर चारपदरी रस्ता आणि पंढरपूर- मंगळवेढ्याला जोडणारे पालखी मार्ग यांचा विकास केवळ भाविकांच्या सुलभ प्रवासासाठी केला गेला असला, तरी याचा थेट फायदा स्थानिक शेतकरी, व्यापारी आणि इतर उद्योगांना झाला आहे. दळणवळण जलद झाल्याने मालाची वाहतूक सुलभ झाली आहे. तसेच, भाविकांच्या सोयीसाठी सोलापूर रेल्वे विभागाचे दुहेरीकरण आणि विद्युतीकरणाचे काम वेगाने झाले असून वंदे भारत सारख्या आधुनिक ट्रेन्स सोलापूरला जोडल्या गेल्या आहेत.

अगदी सोलापूरच्या हवाई सेवेला गती मिळण्यामागेही धार्मिक पर्यटनाची वाढती गरजच कारणीभूत आहे. मस्मार्ट सिटीफअंतर्गत झालेल्या विकासकामांमध्येही सिद्धेश्वर मंदिर परिसराचे सुशोभीकरण आणि तलावाचे शुद्धीकरण प्राधान्याने हाती घेण्यात आले, ज्याने शहराचे सौंदर्य वाढवले.

सोलापूरच्या विकासाकडे केवळ भौतिक दृष्टीने पाहून चालणार नाही, तर त्याचा सामाजिक आणि सांस्कृतिक विकासही तितकाच महत्त्वाचा आहे. सोलापूरचा मगड्डा उत्सवफ किंवा श्री सिद्धेश्वर यात्रा हे केवळ धार्मिक सोहळे नसून ते हिंदू- मुस्लिम आणि मराठी- कन्नड- तेलगू संस्कृतीच्या अभेद्य एकतेचे प्रतीक आहेत. या यात्रेत मानाच्या नंदीध्वजांची मिरवणूक काढली जाते, ज्यात सर्वधर्मीय आणि भाषिक लोक एकत्र येतात. यामुळे सीमाभागातील भाषिक वाद बाजूला सारून एकोप्याची भावना वाढीस लागते.

अक्कलकोटच्या अन्नछत्रात दररोज हजारो लोक जात-पात, धर्म विसरून एकाच पंगतीत जेवतात. हा सामाजिक समतेचा धडा सोलापूरच्या मातीने देशाला दिला आहे, जो कोणत्याही प्रगतीशील समाजाचा पाया असतो. अर्थात, तीर्थक्षेत्रांमुळे सोलापूरचा विकास वेगाने होत असला, तरी भविष्यात काही आव्हानांवर मात करणे गरजेचे आहे. मोठ्या प्रमाणात येणाऱ्या भाविकांमुळे कचरा व्यवस्थापन आणि जलप्रदूषणाचा प्रश्न निर्माण होतो.

पंढरपूरमधील चंद्रभागेचे पात्र, हत्तरसंग कुडल येथील नदी संगम आणि सोलापूरचा सिद्धेश्वर तलाव स्वच्छ ठेवण्यासाठी अधिक आधुनिक यंत्रणेची गरज आहे. तसेच, मंदिरांचे दर्शन पासेस आणि निवास व्यवस्था यांचे पूर्णपणे संगणकीकरण करून भाविकांना अधिक उत्तम सुविधा देता येतील. सोलापूर, अक्कलकोट, हत्तरसंग कुडल, मंगळवेढा, पंढरपूर, अरण आणि बार्शी यांना जोडणारे एक मधार्मिक पर्यटन सर्किटफअधिक प्रभावीपणे राबवून पर्यटकांना तीन ते चार दिवस सोलापुरात रोखून धरता येईल अशा योजना आखायला हव्यात.

थोडक्यात सांगायचे तर, सोलापूरच्या विकासाची गाडी ही उद्योग आणि अध्यात्म अशा दोन रुळांवरून धावत आहे. उद्योगांमुळे शहराला आधुनिकता मिळाली, तर अक्कलकोट, पंढरपूर, मंगळवेढा, बार्शी, अरण आणि हत्तरसंग कुडल या तीर्थक्षेत्रांमुळे जिल्ह्याला आर्थिक स्थिरता आणि सांस्कृतिक वारसा लाभला. मंदिरांचे कलश केवळ भक्तीने उंचावलेले नाहीत, तर त्यांनी सोलापूरच्या विकासाचा आलेखही उंचावला. भविष्यात जर धार्मिक पर्यटनाचे योग्य नियोजन आणि पायाभूत सुविधांचा मेळ घालण्यात आपण यशस्वी झालो, तर सोलापूर हे देशातील सर्वात मोठे आणि विकसित अध्यात्मिक व आर्थिक केंद्र म्हणून नावारूपास येईल यात शंका नाही.



## शेंगापूर..!!

कृष्णदेव

सोलापूरला आतेभावाच्या मुलाच्या लग्नासाठी गेलो होतो. लग्न आटोपलं आणि मी स्टेशनवर जाण्यासाठी रिक्षात बसणार इतक्यात आतेभाऊ ओरडला दादा.. अरे शेंगा चटणी घेतलीस ना? आम्ही लग्नाला आलेल्या सगळ्या पाहुण्यांना लाडू चिवड्याची ऐवजी शेंगाचटणी दिलीय!

अरे, घेतलीय बाबा.. तुझीच नाही खैरमोड्याची लसूण शेंगाचटणी एक किलो आणि नसलेची मुद्दा शेंगा चटणी एक किलो पण घेऊन चाललोय! आता तुम्ही म्हणाल चटणी आणि किलोमध्ये..! हा काय प्रकार आहे? जास्तीतजास्त शंभर किंवा दिडशे ग्रॅम! पण सोलापुरात मात्र शेंगाच्या चटणीचा भाव किलोमध्ये सांगतात आणि किलोमध्येच घेतली जाते! तसं कोणत्याही गावाला गेलं की त्या गावाहून येताना त्या गावाची खास चव आपण बरोबर घेऊन येत असतो.

लोणावळ्याला गेलं की आपण चिक्कीशिवाय परत येत नाही, पुण्यात आलं की बाकरवडी घेतल्याशिवाय बॅग भरत नाही तसं सोलापूरहून येताना एखादातरी किलो शेंगाचटणी आणल्याशिवाय आपल्याला बायको घरात प्रवेश देत नाही! तशी ती महाराष्ट्रात सगळीकडे शेंगदाण्याची चटणी, दाण्याची चटणी अशा विविध नावानं ओळखली जाते आणि प्रत्येक घरात ताटात वाढली जाते. पण सोलापुरची ही शेंगाचटणी आता आख्ख्या महाराष्ट्रात फॅमिली ब्रँड झालाय! आता काहीं चिकित्सक पुणेकर शेंगाचटणी म्हणजे ती टरफलासकट करतात काय? असा




कुजट शेंगदाण्यासारखा शेरा मारतीलच! पण पुणेरी शेरा काहींही असला तरी सोलापुरकरांसाठी ती शेंगाचटणीच...

किंबहुना ह्या शेंगाचटणीमुळं सोलापूरची ओळख आता शेंगापूर म्हणून व्हायला लागली आहे! पुर्वी सोलापूर हे नाव चादरीसाठी प्रसिद्ध होतं पण चादरीची जागा आता शेंगाचटणीनं घेतली आहे. (चादरीचा संबंध झोपण्याशी तर शेंगाचटणीचा संबंध खाण्याशी.. दोन्ही मानवी जीवनातील सुखाचे अविभाज्य घटक!) अर्थात शेंगदाणा किंवा भुईमूग हा पदार्थ सोलापूरच्या खाद्यसंस्कृतीचा अविभाज्य घटक आहे.

केवळ शेंगाचटणीच नव्हे शेंगापोळी शेंगाआमटी, शेंगालाडू आणि शेंगाउसळ (जी उपवासाला करतात.) अशा विविध खाद्यप्रकारानं सोलापूरचं खाद्यजीवन व्यापलेलं आहे. इतकचं नव्हे तर सोलापुरात कोणत्याही भाजीची अथवा कोशिंबीरची रेसिपी शेंगदाण्याच्या कुटाशिवाय परिपूर्ण होत नाही. मग ती मेथी पालकची रस्साभाजी असो नाही तर वांग्याची भरली भाजी! (एकदा बायकोनं शेंगदाण्याचा कुट न घातलेले पदार्थ वाढल्यामुळे नवऱ्यानं न जेवता नुसत्या टरफलावर दिवस काढला होता असं ऐकलयं!) चायनीज डिश जशी सर्वात्मका (सर्वात मका!) असते तसा सोलापुरातल्या कोणत्याही पदार्थ हा शेंगदाणात्मक असतो! त्याला कारणही तसचं आहे. सोलापूर आणि आजुबाजुच्या भागातपिकणाऱ्या शेंगदाण्याला जी गोडसर आणि रवाळ चव असते ती जगाच्या पाठीवर कुठही पिकणाऱ्या शेंगदाण्यात नाही. मग ते शेंगदाणे गुजराती असोत नाही तर धारवाडी! आणि मग या शेंगदाण्यापासून बनवलेला कुठलाही पदार्थ अवीट चवीचा असणार यात नवल ते काय... आणि सोलापुरकरांची ही लाडकी शेंग वयाच्या प्रत्येक टप्प्यावर आपला रंग माझा वेगळा दाखवत असते. वेलीला नुकत्याच लागलेली शेंग, जिच्यात अजून दाणाही तयार झालेला नसतो तेंव्हा तिची नव्हाळी एखाद्या नवजात बाळासारखी तुकतुकीत रंगाची असते. तर टरफल धरलेली कोवळी शेंग आपल्याला काश्मिरी सफरचंदाच्या गुलाबी रंगाची आठवण करून देते. आणि तीच पुढे अंगापिंडानं भरली की एखाद्या गव्हाळ रंगाच्या तारूण्यानं मुसमुसलेल्या नवयुवतीसारखी भासायला लागते!

या प्रत्येक टप्प्यावर तिची चवही वेगळी आणि आणखी स्वादिष्ट होत जाते... तसा शेंगदाणा हा पदार्थ सर्वसमभाव मानणारा आहे. गरीबाच्या झोपडीतील चटणीभाकरीपासून ते पंचतारांकित हॉटेलमधल्या महागड्या मेनूपर्यंत त्याचा स्वच्छंद वावर असतो आणि सारख्याच चविष्टपणे त्याचा स्वाद घेतला जातो. पण झणझणीत शेंगाचटणी, घट्ट दही आणि ज्वारीची कडक भाकरी यांच जे सोलापूरी कॉंबीनेशन आहे त्याच्यापुढं जगातलं कोणतंही गावरान व्यंजन तुच्छ आहे असं माझं भीष्ममत आहे! ...ताटात वाढलेला शेंगदाण्याच्या मुद्दा चटणीचा गोळा, (ही चटणी मोठ्या उखळात शेंगदाण्याला तेल सुटेपर्यंत कुटून केलेली असते आणि तिचा गोळा झालेला असतो.) बाजूला मातीचा लहानसा वाडगा आणि त्या छोट्या वाडग्यातच बनवलेलं घट्ट दही आणि समोर तुकडा मोडताना कडकड आवाज करणारी पांढऱ्याशुभ्र ज्वारीची कडक भाकरी! क्षुधादेवी तुमच्यावर प्रसन्न झाली नाही तरच नवलं..!!

शेंगदाण्यापासून बनवलेले वेगवेगळे स्वादिष्ट पदार्थ ही तर सोलापूरची खासियत आहेच. पण नुसत्या शेंगदाण्याचेही विविध चविष्ट प्रकार तुम्हाला सोलापुरातील छोट्या मोठ्या रस्त्यावर एखादं छोट लाकडी टेबलं टाकून विकायला बसलेले दिसतील.

साध्या शेंगा, भाजलेल्या शेंगा खाऱ्या शेंगा आणि ओल्या शेंगा! (यात शेंग आणि शेंगदाणे असे दोन्ही प्रकार तुम्हाला मिळतील.) यात भट्टीवर भाजलेल्या शेंगदाण्याची टेस्ट तर अप्रतिम! वेगवेगळ्या प्रकारच्या शेंगदाण्याच्या ढिगारयावर एका लहानशा गाडग्यात लाकडाच्या काटक्या (तुकडे) शटाकून ते मंद आचेवर सतत जळत ठेवलेले असतात. आणि गिर्हाईक आलं की त्यानं मागितलेल्या शेंगाच्या ढिगावर ते ठेऊन शेंगा गरम करायच्या आणि मग कगदाच्या पिरॅमिडमधून त्या सर्व्ह करायच्या! सोलापूरला जाऊन ज्यानं हे ठेल्यावरचे गरम आणि चटकदार शेंगदाणे खाल्ले नाहीत त्यानं कोल्हापूरला जाऊन कोल्हापुरी मिसळ न खाता परत येण्यासारखं आहे! आणि सोलापुरात पावसाळ्याच्या दिवसात गाडीवरच्या कढईत भाजलेल्या ओल्या शेंगा खाणं हाही एक असाच भन्नाट खाद्यानुभव आहे ! भूर भूर पाऊस पडत असावा..

आपण अर्धवट भिजून कुठल्यातरी आडोशाला थांबलेलं असावं आणि समोरच्या गाडीवर भाजत असलेल्या टरफलाच्या ओल्या शेंगाचा काहींसा करपट आणि खमंग वास आपल्यापर्यंत दरवळत यावा! त्या शेंगा विकत घेऊन तीची चव न बघणारा, दळभद्री इसम या पृथ्वीतलावर कुठेही भेटेल असं वाटत नाही! अशा या सोलापूर आणि सोलापुरकरांच्या बहुरंगी आणि बहुगुणी भुईमुगी शेंगेनं केवळ गरीबांचा बदाम म्हणून न राहता शेंगाचटणीच्या रूपात महाराष्ट्रातील तमाम खाद्यप्रेमींना आपला गुलाम करून टाकलय यात काहीं शंका नाही !!

# सोलापूरच्या सामाजिक परिवर्तनात वृत्तपत्र लेखकांचे योगदान



वृत्तपत्र हे आधुनिक समाजाचा आरसा मानले जाते आणि या आरशाची खरी चमक वृत्तपत्रातील वाचकांच्या पत्रव्यवहारातून दिसून येते. कोणत्याही वर्तमानपत्राचा खरा मुख्य आधार आणि प्राण हे त्याचे वाचकच असतात. म्हणूनच संपादकीय पानावरील वाचकांच्या पत्रांना आणि त्यांच्या दृष्टिकोनाला नेहमीच एक हक्काचे, मानाचे आणि वाजवी स्थान दिले जाते. आजच्या युगात जागतिक वृत्तपत्रेही वाचकांच्या या प्रतिक्रियांची दखल अत्यंत गांभीर्याने घेऊ लागली आहेत. मराठी वृत्तपत्रसृष्टीच्या इतिहासात अगदी दर्पणकार बाळशास्त्री जांभेकरांच्या काळापासून वाचकपत्रांचे महत्त्व अधोरेखित झाले आहे. सकाळचे संस्थापक नानासाहेब परुळेकर नेहमी म्हणायचे की, वाचकांची पत्रे ही समाजाची नाडी आहे. सोलापूरच्या जागरूक पत्रलेखकांनी हीच नाडी अचूक ओळखून गेल्या अनेक दशकांपासून शहराच्या आणि जिल्ह्याच्या विकासात अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावली आहे.

सोलापूर जिल्ह्यातील या विखुरलेल्या लेखणीच्या शिपायांना संघटित करण्यासाठी आणि पत्रलेखनाला एक वैचारिक व्यासपीठ मिळवून देण्यासाठी ६ जानेवारी १९८४ रोजी सोलापूर जिल्हा वृत्तपत्र लेखक मंच या संस्थेची स्थापना करण्यात आली. या ऐतिहासिक संघटनेचे पहिले अध्यक्षपद चं. भा. वेणेगुरकर यांनी भूषवले. त्यानंतरच्या काळात अवधूत म्हमाणे, प्रा. डॉ. श्रीकांत येळेगावकर, पद्माकर कुलकर्णी आणि श्रीमती सुधा वेणुगुकर यांसारख्या ज्येष्ठ मार्गदर्शकांनी अत्यंत निष्ठेने प्रयत्न करून ही संघटना वाढवली आणि आज ती एका वटवृक्षासारखी उभी आहे. दरवर्षी २२ ऑगस्ट हा दिवस देशभरात वृत्तपत्र लेखक दिन म्हणून साजरा केला जातो, ज्याचे सोलापूरच्या मातीतील औचित्य या मंचाच्या कार्यामुळे अधिकच वाढते.

फैयाज शेख
भ्र. ९३२५७५८८८२

दैनिकांमधून रोज प्रसिद्ध होणारी ही पत्रे केवळ सामान्य प्रतिक्रिया नसतात, तर तो नागरिकांच्या नित्याच्या प्रश्नांचा, नागरी समस्यांचा आणि ज्वलंत सामाजिक- राजकीय विषयांचा जिवंत आवाज असतो. आज सोलापूरचे लेखक साहित्यिक, आरोग्य, स्वच्छता, शैक्षणिक, सामाजिक आणि राजकीय अशा विविध विषयांवर सातत्याने अभ्यासपूर्ण लेखन करत असतात.

शहरातील आणि ग्रामीण भागातील अनेक लेखकांची हजारो पत्रे आजवर प्रसिद्ध झाली असून, त्यांनी स्थानिक प्रशासनाला जागे करण्याचे आणि विकासकामांना गती देण्याचे मोठे काम केले आहे. विशेष म्हणजे, स्वतःचा वेळ आणिपैसा खर्च करून, कोणत्याही मानधनाची वा लाभाची अपेक्षा न ठेवता ही मंडळी केवळ समाजसेवा या पवित्र भावनेतून अविरतपणे लिहीत असतात. स्वखर्चाने ही सेवा करताना मिळणारा आत्मिक आनंद हाच या लेखकांच्या लेखणीचा मुख्य ऊर्जास्रोत आहे.

सोलापूरच्या पत्रलेखकांनी केवळ वृत्तपत्रांतील स्तंभापुरते मर्यादित न राहता आपल्या समृद्ध अनुभवांचे आणि लिखाणाचे दस्तऐवजीकरण पुस्तकांच्या रूपात करून मराठी साहित्यात मोलाची भर घातली आहे. यामध्ये ज्येष्ठ लेखक अशोक कोर्टीकर यांचे मप्रहरीफहे पुस्तक अत्यंत गाजले असून त्याचा उल्लेख आज पत्रकारिता पदवी अभ्यासक्रमातही आदरपूर्वक केला जातो. याच परंपरेला पुढे नेत माझ्या स्वतःच्या पत्र संदेश व जनमत या दोन पुस्तकांसह प्रा. अशोक म्हमाणे यांचे पत्र संवाद, अरुण धुमाळ यांची पत्रामृत व पत्र प्रबोधन ही दोन पुस्तके आणि बाळासाहेब उबाळे यांचे मला काही सांगायचे आहे ही वाचकांच्या पत्रांवर आधारित पुस्तके प्रकाशित झाली आहेत.

आज ही सर्व पुस्तके नवीन पिढीच्या पत्रलेखकांसाठी अभ्यासिका आणि मार्गदर्शक दीपस्तंभ ठरत आहेत, ज्यांचा आधार घेऊन अनेक नवोदित लेखक आपले लिखाण समृद्ध करत आहेत. बदलत्या काळासोबत आज पत्रलेखनाचे तंत्र आणि स्वरूपही कमालीचे बदलले आहे. पूर्वी कागद- पेनाने लिहिली जाणारी पत्रे आज व्हॉट्सपवर टाईप करून किंवा ई-मेलद्वारे थेट दैनिकांच्या संपादकीय विभागाकडे क्षणार्धात पोह-ोचतात. लिखाणाच्या स्वरूपातही आधुनिकता आली असून, केवळ समस्येचे वर्णन करण्याऐवजी त्या समस्येचे छायाचित्र आणि त्यावर आधारित नेमके पत्रलेखन याला आज वृत्तपत्रांमध्ये विशेष महत्त्व दिले जात आहे.

वृत्तपत्रेही समाजात बदल घडवणाऱ्या या पत्रांसाठी आठवड्यातून एक दिवस विशेष सदर किंवा हक्काचे पान राखून ठेवतात, ही या लेखणीची मोठी ताकद आहे. नव्या लेखकांना दर्जेदार लिखाण करता यावे, यासाठी सोलापूर जिल्हा वृत्तपत्र लेखक मंचाच्यावतीने जिल्हा स्तरावर सातत्याने कार्यशाळा आयोजित केल्या जातात. वृत्तपत्रात पत्र निवडले जाण्यासाठी वाक्ये छोटी आणि सोपी असावीत, गुंतागुंतीची रचना टाळावी, अभिव्यक्ती स्पष्ट असावी आणि आपण जसे सहज बोलतो तसेच लिहिण्याचा प्रयत्न करावा, असे थेट मार्गदर्शन या कार्यशाळांमधून केले जाते. मंचाच्यावतीने दरवर्षी वर्षभरातील उत्कृष्ट पत्रांचा पुरस्कार देऊन गौरव केला जातो. तसेच सामाजिक, शैक्षणिक व साहित्यिक क्षेत्रात उल्लेखनीय काम करणाऱ्या व्यक्तींचा योग्य सन्मान केला जा-तो आणि ज्येष्ठ पत्रलेखकांना तात्यासाहेब तेंडुलकर पुरस्कार देऊन गौरविण्यात येते.

सध्या सोलापूर जिल्हा वृत्तपत्र लेखक मंचाच्या माध्यमातून शहराच्या आणि जिल्ह्याच्या विविध प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी एक अत्यंत सक्षम आणि कटिबद्ध कार्यकारिणी कार्यरत आहे. यामध्ये अध्यक्ष म्हणून मी स्वतः फैयाज शेख, कार्यवाह अरुण धुमाळ, सह- कार्यवाह प्रा. धनंजय शहा, उपाध्यक्ष मयुरेश कुलकर्णी, कार्याध्यक्ष रामकृष्ण आघोर आणि कोषाध्यक्ष म्हणून अशोक म्हमाणे अविरत परिश्रम घेत आ-हेत. यासोबतच सदस्य म्हणून डॉ. रामचंद्र धर्मसाले, अशोक खानापुरे, सुनील पुजारी, प्रा. गणेश लेंगरे, रंगसिद्ध कोरे, श्रीवल्लभ करकमकर, विठ्ठल वठारे, मल्लिनाथ किनगी, प्रेमचंद्र मेने, प्रांजली मोहेकर, महेजबीन मुल्ला, अन-ुराधा निकम आणि सल्लागार समितीमध्ये डॉ. श्रीकांत येळेगावकर, अरविंद जोशी, पद्माकर कुलकर्णी, अवधूत म्हमाणे हे सर्वजण एकत्रितपणे सक्रिय योगदान देत आहेत. सोलापूरच्या उज्ज्वल भविष्यासाठी आणि विकासासाठी हे लेखणीचे शिपाई आपले योगदान असेच पुढे चालू ठेवतील.

(अध्यक्ष, सोलापूर जिल्हा वृत्तपत्र लेखक मंच)



# माझ्या गावाचा विकास, सर्वांची जबाबदारी!





सोलापूर या गावाची अत्यंत मोठी कीर्ती असून या गावाचे नाव सर्वच क्षेत्रात उज्ज्वल आहे. सोलापूरवासियांचे श्रद्धास्थान असलेले श्री सिध्दरामेश्वरांच्या पद स्पर्शाने पावन झालेली ही भूमी आहे. त्यामुळे सोलापूर शहराला खुप मोठे महत्व आहे. आणि याबरोबरच जगभर प्रसिद्ध असणारे श्री क्षेत्र पंढरपूर व अक्कलकोट येथील श्री स्वामी समर्थ महाराज या दोन्ही तीर्थ क्षेत्राला अनेक भाविक दर्शनासाठी खुप दूरवरून येतात. म्हणून सर्व दृष्टीने सोलापूर हे गाव समृद्ध संपन्न आहे.



वंदना कुलकर्णी
सोलापूर

भुईकोट किल्ला हा ऐतिहासिक किल्ला शहराच्या मध्यवर्ती असून सोलापूर हे टेक्सटाईल सिटी म्हणून ओळखले जाते. सोलापुरी चादरी आणि टॉवेल महाराष्ट्रात प्रसिध्द आ-हेत. तसेच डाळिंब उत्पादनासाठी सोलापूर प्रसिद्ध आहे. बहुभाषिक शहर म्हणून नाममुद्रा उमटवली आहे. या सोलापूर शहराला सांस्कृतिक, साहित्यिक, ऐतिहासिक अशी वैभवशाली परंपरा लाभली असून. हुतात्म्यांचे शहर म्हणूनही ओळखले जाते. म्हणून म्हणावे वाटते....

**सोलापूर ही नगरी आहे खुप छान**
**गिरणगाव म्हणून तिला मोठा मान**

एके काळी ते सोलापूरची शान वेगळीच होती .कारण गिरण्या चालू होत्या .सधन सोलापूर होते.आज औद्योगिक दृष्ट्या थोडे कमी असले तरी मानवाची मन सधन आहेत. ही पण एक त्या गावची श्रीमंती असते. आणि ती आहे. पण पुढे असे घडले की गिरण्या बंद पडल्या आणि अनेक कुटुंबाची पडझड झाली.

कर्ता पुरुष घरी बसल्यामुळे अनेक समस्या निर्माण झाल्या. मात्र प्राप्त परिस्थिती स्वीकारून अनेक कुटुंब पुन्हा नव्याने संसाराची वाट चालू लागले.म्हणून असे वाटते की, विकास झाला नाही तर, नागरिकांचे प्रश्न कसे सुटणार असा प्रश्न निर्माण होतो.

आज मला अत्यंत महत्वाच्या मुद्यावर व्यक्त व्हावे वाटते व्यक्त होण्याची संधी दैनिक तरुण भारतने लेखनाच्या माध्यमातून दिली आहे. याचे मनस्वी समाधान वाटले. सोलापूरमधील डफरीन चौकात एका फलकावर लिहिले आहे आजी आजोबांचे शहर म्हणजे काय? हे वाचल्यानंतर मनात अनेक प्रश्न तयार खहोतात. आजी आजोबांचे शहर म्हणजे कशाच्या अनुषंगाने म्हटले आहे.

तर आज तरुण मुलांच्या अनेक समस्या आहेत. अनेक, शैक्षणिक गरजा आहेत की त्या इथे पूर्ण होत नाहीत. अशीच परिस्थिती झाली आहे, आणि ते खरंच आहे कारण मुले, शिक्षणासाठी, नौकरीसाठी परगावी रहात आहेत. आणि इकडे गावाकडे वयस्कर आई वडील दोघेच रहात आहेत.

सोबत कोणी नसते, काही ठिकाणी तर एकटेही रहातात, काही मुलांना नाविलाजाने जावे लागते. त्याचे महत्वाचे कारण म्हणजे सोलापूरला कंपन्या नाहीत आणि काही असतील तर त्यात मुलांना वेतन कमी आहे, पण काही मुलांना आपले कुटुंब सोडून जाण्याची मानसिकता नसते म्हणून आहे त्या परिस्थितीत तडजोड करत असतात. तसेच काही मुलांवर कुटुंबाची जबाबदारी असते म्हणून ही इथेच रहातात नौकरीच्या संधी उपलब्ध होत नाहीत. म्हणून परगावी रहातात नौकरीसाठी वणवण फिरावे लागते. ही खंत वाटते.




गावाचा विकास झाला पाहिजे हे अगदी बरोबर आहे कारण गावाचा विकास झाला तरच या गावचा तरुण येथे राहील. आपला गाव व आपल्या आई वडिलांना सोडून जावे लागणार नाही. म्हणून सोलापूरला लवकरात लवकर आय टी पार्क व्हावेत. म्हणजे त्याला पुणे, मुंबई, हैदराबाद, बेंगलोर आशा ठिकाणी जाऊन रहावे लागणार नाही. बारावी झाल्यावर काय करायचे आहे असे एखाद्या मुलाला विचारले की तू आता काय करणार? तो लगेच म्हणतो पुण्याला जायचे.. कारण पुण्याला कंपन्या आहेत.

आय टी पार्क आहेत, जर इथे काही गोष्टी मिळाल्या तर इथला तरुण म्हणणार नाही. काय आहे सोलापूरमध्ये, हे वाक्य जेव्हा मी ऐकते तेव्हा मन अस्वस्थ होते. पण आपल्या गावाविषयी आपल्या मनात नेहमी प्रेम आदर, सदभावना असलीच पाहिजे असे कोणी म्हणु नये म्हणून... त्यासाठी गावाचा विकास होणे गरजेचे आहे. दोन तीन कंपन्या, नवनवीन उद्योग व्यवसाय सुरू झाले तर तरुण गाव सोडून जाणार नाही.

शिक्षणाच्या सर्व संधी उपलब्ध झाल्या पाहिजेत. मग नक्कीच शहराचा विकास होईल हे वास्तव आहे एक उदा:म्हणून सांगते मुलाला नौकरी लागली, पुण्याला घर घेतले आई वडिलांनी सोलापूरचे घर विकले सर्वजण मिळून एकत्र राहू लागले आणि काहीच महिन्यात तो परदेशी नौकरीसाठी निघून गेला आणि आई वडील परत सोलापूरला येऊन राहिले. थकलेले शरीर काय करायचे? असे अनेक प्रश्न आहेत. शहरात सिटी बस सेवा पाहिजे, पर्यटक सोलापूरला येतात तेव्हा त्यांच्यासाठी पर्यटन स्थळ दाखवायला बस सेवा झाली तर खुप चांगले आहे.

विमानसेवा न खंडित होता सातत्याने चालू राहणे हे पण महत्वाचे आहे. आणि प्रशासन जेव्हा नागरिकांसाठी इतक्या सुविधा देत असते तेव्हा नागरिकांनी पण त्यांना सहकार्य करावे. माझा देश, माझा गाव म्हणून आपली पण काही भूमिका आहे. हे देखील लक्षात घेणे गरजेचे आहे. माझे कुटुंब माझी जबाबदारी, तसेच माझा गाव माझी जबाबदारी असे असणे महत्त्वाचे ठरते.

आपले शहर स्वछ ठेवणे, नम्रता, विनम्रता कृतज्ञता, पाळणे, वाहतुकीचे नियम पाळणे, पाण्याचा अपव्यय टाळणे, मानवता धर्म पाळणे, सहकार्याची भावना ठेवणे ही जबाबदारी ही नागरिकांची आहे. शहराच्या विकासासाठी दोन्हीकडून प्रयत्नशील असणे महत्त्वाचे ठरते.




# कृष्णा-मराठवाडा सिंचन प्रकल्प : धाराशिवच्या जलक्रांतीचे नवे पर्व...

धाराशिव जिल्ह्याचा इतिहास पाहिला, तर दुष्काळ, पाण्याची टंचाई आणि शेतीतील अनिश्चितता हेच चित्र वारंवार समोर येते. अनेक दशकांपासून तुळजापूर, उमरगा आणि लोहारा या भागातील शेतकरी आभाळाकडे डोळे लावून शेती करत आले. पाऊस चांगला झाला तर पीक, अन्यथा कर्ज, नुकसान आणि स्थलांतर, अशी परिस्थिती या भागाची ओळख बनली होती. मात्र आता हे चित्र बदलण्याची आशा निर्माण झाली आहे. कृष्णा-मराठवाडा सिंचन प्रकल्प हा केवळ एक सिंचन प्रकल्प नसून, तो मराठवाड्याच्या विकासाचा, जलसुरक्षेचा आणि शेतकऱ्यांच्या भविष्याचा पाया ठरत आहे.

या प्रकल्पाच्या योजना क्रमांक २ मधील रामदारा ते एकुरका या सहाव्या टप्प्याच्या कामाला राज्य शासनाने मंजुरी दिली आहे. त्यामुळे या महत्त्वाकांक्षी योजनेच्या पूर्णत्वाकडे आणखी एक महत्त्वाचे पाऊल पडले आहे. या टप्प्यामुळे तुळजापूर, उमरगा आणि लोहारा या तीन तालुक्यांतील तब्बल ७ हजार हेक्टरहून अधिक शेती सिंचनाखाली येणार आहे. पाण्याअभावी कोरडवाहू शेती करणाऱ्या हजारो शेतकरी कुटुंबांसाठी हा निर्णय आशेचा किरण ठरला आहे. कृष्णा नदीच्या पाण्यावर मराठवाड्याचा न्याय्य हक्क अनेक वर्षांपासून मान्य असला, तरी त्या पाण्याचा प्रत्यक्ष लाभ या भागाला मिळण्यात मोठा विलंब झाला. विविध न्यायालयीन प्रक्रिया, प्रशासकीय अडचणी आणि निधीच्या प्रश्नांमुळे हा प्रकल्प अनेक वर्षे रखडला.

महायुती सरकारने या प्रकल्पाला प्राधान्य देत आवश्यक निधी उपलब्ध करून दिला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या विशेष लक्षामुळे ११ हजार ७०० कोटी रुपयांच्या कामांना सुधारित प्रशासकीय मान्यता मिळाली. त्यानंतर प्रकल्पाची कामे वेगाने सुरू झाली आणि आज ती अंतिम टप्प्यात पोहोचली आहेत.

मराठवाड्याच्या वाट्याला आलेल्या २१ टीएमसी पाण्यापैकी पहिल्या टप्प्यात ७ टीएमसी पाणी आणण्याचे काम सुरू असून, त्यातील २.२४ टीएमसी पाणी तुळजापूर, उमरगा आणि लोहारा तालुक्यांसाठी उपलब्ध होणार आहे. कृष्णा-मराठवाडा सिंचन प्रकल्पाच्या योजना क्रमांक २ मध्ये एकूण सहा टप्पे आहेत. घाटणे, पडसाळी, सावरगाव, पांगरदरवाडी आणि सिंदफळ हे पहिले पाच टप्पे अंतिम टप्प्यात असून, आता रामदारा ते एकुरका या सहाव्या टप्प्यालाही शासनाने मंजुरी दिली आहे.

या टप्प्याचा समावेश प्राधान्यक्रमात व्हावा, अशी मागणी जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांच्याकडे करण्यात आली होती. त्यांनी सकारात्मक निर्णय घेतल्याने सहाव्या टप्प्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

या टप्प्यासाठी सुमारे ४२० कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित असून, या माध्यमातून ३५ गावांना सिंचनाचा लाभ मिळणार आहे. या योजनेचा लाभ तुळजापूर तालुक्यातील १५, उमरगा तालुक्यातील १४ आणि लोहारा तालुक्यातील ६ अशा एकूण ३५ गावांना होणार आहे.

या भागातील बहुतांश शेती आजही पावसावर अवलंबून आहे. पावसाचा खंड पडला की पिकांचे नुकसान होते. त्यामुळे शेतकऱ्यांचे आर्थिक चक्र विस्कळीत होते. सिंचन उपलब्ध झाल्यानंतर मात्र या भागातील शेतीचा चेहरामोहरा बदलणार आहे.

तुळजाभवानी मातेच्या चरणी असलेल्या रामदरा तलावात कृष्णेचे पाणी दाखल होण्याचा क्षण हा केवळ धार्मिक नव्हे, तर विकासाच्या दृष्टीनेही ऐतिहासिक ठरणार आहे.







